तिचे तीर्थजळ तू प्राशन केलेस का? तू ते थेंब केवळ मस्तकावर शिंपडलेस आणि ''अगाध शक्ति, अघटित लीला'' हे सुंदर पद रचलेस.

**गणू:** बाबा, तुमचे चरणतीर्थ मला अमृताच्या मोलाचे आहे.

**बाबा:** पण ते तू कां बरे प्राशन केले नाहीस? का, तर तू एक सोज्वळ शुद्ध ब्राह्मण आहेस आणि मी मुसलमानासारखा दिसणारा एक फकीर आहे, म्हणूनच ना?

**गणू:** बाबा, गंगेचे तीर्थ मस्तकी धारण करणे, पुरे झाले नाही काय?

---

**श्री साईबाबांच्या जीवनकथेचा पुढील भाग येथून सुरू.**

शिरडीच्या द्वारकामाईत वसणारे बाबा हे भक्तांचे गोपाळकृष्ण होते. या कृष्णावर अखंड धारावत् मधुराभक्ती करणारी एक प्रेमधारा १९०५-६ च्या सुमारास शिरडीच्या परिसरातून वाहू लागली. या प्रेमधारा राधेला जगाने राधाकृष्णाआई या नावाने ओळखले. या राधाकृष्णाआईचे मूळ नाव सुंदराबाई क्षीरसागर. ऐन तारुण्यात वैधव्याची कुऱ्हाड कोसळल्यावर त्या कृष्णभक्तीत स्वत:चे अस्तित्व विसरल्या. त्या पंढरपूरच्या होत्या. नानांची पंढरपूर येथे तहसीलदार म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांची दृष्टी या कृष्णभक्त स्त्रीच्या भावजीवनाकडे वळली. बाबांसारख्या साक्षात् कृष्णावताराच्या सेवेत तिला आणले तर तिच्या भक्तीचे व आयुष्याचे सोने होईल, या भूमिकेतून त्यांनी राधाकृष्णाआईला बाबांच्या परिसरात आणून सोडले. राधाकृष्णीची भक्ती साईकृष्णावर अनन्यपणे जडली. तिने आपले तन-मन-धन बाबांच्या मूक उपासनेत आणि एकनिष्ठ सेवेत विलीन केले. बाबांच्या भक्तिग्रंथाचे हे सोनेरी पान होते. ही भक्तिधारा अगदी आगळी होती. तिची भक्ती शामाची सख्यभक्ती नव्हती. चांदोरकरांची ज्ञानभक्ती नव्हती. ती राधेची मधुराभक्ती होती. जणू पूर्वजन्मीच्या त्या गोकुळच्या राधामाईच होत्या. त्या दूर राहून शिरडीतील रस्ते झाडीत, द्वारकामाईची देखभाल करीत, भक्तांची उठबस पहात, लोकांकडून सामुदायिक सेवेची कामे करवून घेत. त्यांनी शिरडीला हळूहळू लोकसंग्रही, वैभवशाली संस्थेचे स्वरूप देण्यास सहाय्य केले. बाबांनी त्यांना मशिदीची पायरी चढू दिली नाही. तरीही त्या द्वारकाधीशाला त्यांनी सर्वस्व समर्पण केले. जणू जन्माजन्माच्या पायऱ्या चढत ही चंद्रभागा या पंढरीनाथाच्या पायाजवळ आली व चरणांची पायधूळ बनली

## ''ऐकते तुझी पाउले!''

वर्ष: १९०५-६)

**त्या अनंत वाटेवरी**
**चालसी सख्या श्रीहरी**
**वाजती तुझी पाउले,**
**तुझी पाउले!**

त्या अस्तित्वाच्या कधी न सरणाऱ्या मार्गावर हे प्राणांच्या स्वामीराजा, मला तुमच्या पावलांची चाहूल लागली होती. हे श्रीहरी, प्राणप्रिया! किती युगे आली



आणि गेली, पण माझ्या अंतरीचा हा ध्यास तसाच धुमसत राहिला. तुझ्या-माझ्या ऐकतेचे ते स्वप्न तसेच अंत:चक्षूंसमोर तरळत राहिले.

**तूं येशील माझ्या घरी**
**ही आशा धरुनी उरी**
**मी रात्रंदिन जागले–**
**ऐकते तुझी पाउले!**

**राधाकृष्णा:** हे द्वारकेच्या श्रीहरी मी अनंत जन्मांतून तुमच्या चरणांचा साद ऐकत होते. त्या चरणांचा वेध घेत घेत मी तुमची चरणधारा तुमच्या पावलांशी आले आहे. मला स्वीकारा! धन्य करा!

**ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले,**
**तुझी पाउले॥**
**जीवाचा करूनी कान**
**डोळ्यांत आणूनी प्राण**
**मी जन्मजन्म कंठिले,**
**ऐकते तुझी पाउले॥**

या आत्म्याला असाच आपल्या अस्तित्वाचा वेध अनंत काळापासून लागला होता. पंचेन्द्रियांत प्राण एकवटून मी अनेक जन्म आपल्या आगमनाचा वेध घेत होते. या अखंड वेध घेण्यात किती जन्म गेले, कोण जाणे!

त्या अज्ञानाच्या, निराकाराच्या अज्ञेय सीमा ओलांडून तू माझ्या निदिध्यासाने सगुण साकार होशील व माझ्या हृदयाच्या दाराने, माझ्या अंतर्यामीच्या देव्हाऱ्याच्या उंबरठ्यावर आपले पाऊल ठेवशील, ही माझी आशा मला जगवीत होती.

**मी तुझीच जन्मांतरी**
**समजले पुरी अंतरी**
**ना तुला जरी पाहिले–**

ऐकते तुझी पाउले!

तुझी सगुण, साकार, सावयव आकृती मी अद्याप चर्मचक्षूंनी पाहिली नसली तरी माझ्या अंतर्यामी मी तुझ्या माझ्यातील एकतेचे मर्म जाणले होते. मी तुझीच आहे व तू माझा आहेस, हे देवभक्ताचे अतुट नाते मी जाणले होते.

संपेल काल विरहाचा
उगवेल दिवस सोन्याचा
सांगती तुझी पाउले–
ऐकते तुझी पाउले

तुझ्या त्या दैवी पदन्यासांचा पायरव हे एक प्रसादचिन्हच होते. तो शकून सांगत होता की हा जीवा-शिवाच्या दुराव्याचा क्षण अखेर संपणार आहे आणि आपल्या मीलनाचा, सोन्याचा वासर उगवणार आहे. या सायुज्याच्या क्षणाचे अमृत माझ्या प्राणांना आधार देत माझ्या जीवाला जगवीत होते.

(राधाकृष्णेने या आर्तभावाने आणि तीव्र उपासनेने बाबांशी आत्मिक जवळीक साधली होती. त्यांना काही आत्मसिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्या एक साधकावस्थेचे उच्च रूप बनल्या होत्या. त्या व्यवहारही सांभाळीत होत्या. भक्तांच्या सहाय्याने शिरडीचा संतसंसार त्यांनी सांभाळला. बाबांची पूजा, आरती, चावडी, पालखी हे विधी, तसेच छत्र-चामरे, अबदागीर, भालदार-चोपदार, ललकाऱ्या, वाद्ये, रोषणाई, गजर आणि जल्लोष यांच्या एकाएका पायरीवर या निष्ठावंत सेविकेने भक्तीचा नवा प्रपंच उभारला. बाबा पाठवीत त्या प्रसादावर वा अन्नावर ही तपस्विनी संतोषाने गुजराण करीत होती. बाबांच्या निर्वाणापूर्वी एक-दोन वर्षे या योगिनीची जीवित यात्रा गूढपणे समाप्त झाली. बाबांनी तिच्या गुणदोषांचा स्वीकार करून तिला संसृती सागराच्या पैलतटावर पोहचविले.)

---

## "मी दातार उदार!"

एका चोराने जडजवाहीर चोरले. कोर्टापुढे त्याला हजर केल्यावर त्याने श्री साईबाबांनी ते आपल्याला दिल्याचे सांगितले. तेव्हा धुळे कोर्टाने साईबाबांना साक्षीस बोलाविले. बाबांनी समन्स पेटत्या धुनीत टाकले. समन्स पाठवूनही बाबा कोर्टापुढे धुळ्यास साक्षीला न गेल्याने कोर्टाने बाबांवर वॉरंट बजाविले. कोपरगांवचा चीफ कॉन्स्टेबल ते समन्स घेऊन आला व बाबांस धुळ्यास येण्याचा आग्रह करू लागला. बाबा येईनात. बाबांना पकडून नेण्याचे कॉन्स्टेबल गणपत रामजी याला धैर्य नव्हते. बाबांनी त्याला शिव्या देऊन वॉरंट मसणात नेऊन फेकून देण्यास सांगितले. त्याची मतीच गुंग झाली. यावेळी दासगणू महाराज तेथे हजर होते. त्यांनी गणपत रामजीला चांदोरकरांचा सल्ला घ्यावयास सांगितले.

चांदोरकरांनी त्याला बाबा हे अलौकिक पुरुष आहेत, इतरांसारखे त्यांना वागविणे गैर असल्याचे सांगितले. शिरडीस कमिशनर पाठवून बाबांची साक्ष घ्यावी, असा एक महाझर अर्ज अनेक भक्तांच्या सह्यांसह धुळे कोर्टास पाठविण्यात आला. नाना जोशी नावाचे एक फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट व असिस्टंट कलेक्टर बाबांची साक्ष घेण्यास शिरडीस (एक सदस्य कमिशन) आले. ते येण्यापूर्वीच बाबांनी अंतर्ज्ञानाने जाणून टेबल-खुर्च्या मागवून मशिदीत हंगामी कोर्ट तयार केले. कमिशनर जोशी व बाबांचा संवाद पुढीलप्रमाणे झाला.

वर्ष: १९०६) (स्थळ: द्वारकामाई-मशीद

**कमिशनर:** आपले नाव?

**साईबाबा:** मला 'साईबाबा' म्हणतात.

**कमिशनर:** वडिलांचे नाव?

**साईबाबा:** साईबाबा.

**कमिशनर:** गुरुचे नाव?

**साईबाबा:** वेंकूशहा.

**कमिशनर:** आपला पंथ वा धर्म?

**साईबाबा:** कबीर.

**कमिशनर:** जात व वंश?

**साईबाबा:** परवर दिगार अल्ला.

**कमिशनर:** प्रतिज्ञेवर सांगाल?

**साईबाबा:** सत्य.

**कमिशनर:** आरोपीला जाणता?

**साईबाबा:** मी प्रत्येकाला जाणतो.

**कमिशनर:** आरोपी सांगतो, तो तुमच्या समवेत रहात होता. हे खरे आहे?

**साईबाबा:** मी प्रत्येकाबरोबर रहातो. सर्वजण माझे आहेत.

**कमिशनर:** आपण त्याला जवाहीर दिले आहे काय?

**साईबाबा:** होय, दिले. प्रत्येक वस्तू माझी आहे.

**कमिशनर:** त्याच्यावर चोरीचा आरोप असता तो सांगतो आहे की चोरीचा माल आपण त्याला दिला?

**साईबाबा:** हे तुम्ही काय मांडले आहे? या सर्व गोष्टींचा माझ्याशी काय संबंध? (कमिशनर उत्तरांनी स्तंभित झाले. त्यांनी शिरडीची ग्राम-डायरी मागविली. तिच्यावरून तो इसम शिरडीत आल्याची नोंद दिसली नाही.)

**कमिशनर:** चोरीच्या वेळी आरोपी शिरडीत नव्हता. आपण त्याला जवाहीर दिले नाही?


**साईबाबा:** होय, तसेच.

साक्ष संपली. आरोपीवर गुन्हा शाबीत होऊन त्यास शिक्षा झाली. ही सर्व कथा दासगणू यांनी स्वमुखे सांगितली आहे. (शिरडीचे साईबाबा– डॉ. गवाणकर)

बाबा हे साक्षात् गुरुतत्त्व होते. परमेश्वरांच्या स्वरूपाशी बाबांचे तादात्म्य त्यांच्या वागणुकीवरून व्यक्त होत असे. ते स्वत:ला अल्लाचे बंदे मानीत, पण ईश्वर तादात्म्याने (अनलहक) ते बोलू लागले की त्यांचे दिव्यत्व तेजाने तळपे, प्रकाशमान होई. धुळे कोर्टाच्या कमिशनपुढील त्यांची साक्ष अत्यंत बोलकी सत्यस्वरूप प्रकट करणारी आहे.

---

राधाकृष्णाआईच्या भावावस्थेचे चित्रण सुरूवातीला एका उपकथेद्वारा वाचकांपुढे मांडले आहे. या १९०६ पासून १९०९ पर्यंतच्या कालखंडात बाबांच्या भक्तीला हळूहळू पूजा, आरत्या, राजभोग, रथ, उत्सव, चावडीमिरवणूक असे बाह्य वैभवशाली स्वरूप येत गेले. त्याचा विस्तार सध्याच्या सांप्रदायिक व परंपरागत उपासनाविधीत होत गेला. बाबांच्या नाथ व कबीरपंथी विरक्त करनी व रहनीचे असे पर्यवसान व्हावे, हे मोठे आश्चर्यकारक व अनाकलनीय रूपांतर असले, तरी शेवटी भक्तपरिवारच संताचा संप्रदाय आपल्या प्रेमाने, हट्टाने व आग्रहाने घडवीत असतो, हे सत्य कबूल करावे लागेल. धूळीच्या



खड्डयात झोपणारे, निंबातळी बसणारे, मशिदीत अतर्क्य लीला करणारे बाबांचे १८५८ पासून १९०६ पर्यंतच्या ४८ वर्षांतील हे प्रगत बदलते जीवन ऐतिहासिकदृष्टीने न्याहाळण्याजोगे आहे. यावेळी शिरडीत २३ व्या वर्षी स्थिरपद झालेले बाबा सत्तरीचे वय ओलांडून गेलेले होते. आपल्यामागून उपासनेची ही यंत्रणा परंपरेने चालू राहिली तर त्यातही बाबा चैतन्यशाली मृत्युंजय शक्तीद्वारा भक्तांशी सामुदायिक संपर्क ठेवून एक नवी परंपरा निर्माण करण्याच्या विचारात भक्तांच्या अट्टाहासाशी सहमत झाले असावेत. यावेळी माधव अडकरांची ''आरती साईबाबा'' ही सिद्ध आरती, तुकाराम, ज्ञानोबा यांसारख्या संतांचे सर्वत्र लोकप्रिय अभंग, पंढरीच्या विठ्ठलावरील भक्तीपर पदे इत्यादींचा समावेश करून सगुणोपासनेस प्रारंभ झाला. नंतर भीष्मांनी याला स्वत:च्या पदांची व पारंपारिक पदांची भर घालून रीतसर 'सगुणोपासने'चे स्वरूप दिले, ते आणखी दोन वर्षांनी १९०८ मध्ये.

## जयदेव, जयदेव, जय बाबा साई! भक्तीच्या बुडवावे प्रेमप्रवाही

वर्ष : १९०६-७) (स्थळ : मशिदीत शामा, तात्या, म्हाळसापती, जोग, गणू इत्यादी भक्त बाबांची आरती गात आहेत. (ही आरती 'श्री साईगीतायना'तून घेतलेली असल्याने पारंपारिक स्वरूपाची नाही.)

गणू : जयदेव, जयदेव, जय बाबा साई  
भक्तीच्या बुडवावे प्रेमप्रवाही  
पाथरी गावात झाली नवलाई  
मानवता झाली मानवदेही  
त्रैमूर्ती अवतार फकीररूपे येई  
विश्वाला मुक्तीची द्यावया ग्वाही।  
जयदेव, जयदेव....

जोग : वैराग्याची मूर्ती साई शुकमुनी  
साक्षात् आदिनाथ अवतरले भूवनी  
वर्णिती साक्षात्कार कबीर मुखामधूनी  
दिगंत पसरली लीलांची द्वाही!  
जयदेव, जयदेव....

शामा : पूर्णब्रह्म रामकृष्णावतार  
श्रीपाद श्रीवल्लभ ब्रह्मांडाधार  
किंवा श्री शिवयोगी स्वानंदाकार  
शंखचक्रधारी हरि शेषशायी॥  
जयदेव, जयदेव....

तात्या, म्हाळसापती :  
वैकुंठ कैलास श्री साईचरण  
पतितांचे तारण, भक्तोद्धरण  
भक्तचकोरासाठी अमृतशिंपण  
वरदाभय हस्त सदा भक्तशिरी राही।  
जयदेव, जयदेव....

— श्री साईगीतायन

आरतीनंतर प्रसादवाटप होते. चावडीसोहळ्यासाठी प्रचंड जनसमुदाय उभा आहे. टाळ, मृदंग, खंजिरी ह्या वाद्यांचा गजर. हलकऱ्यांच्या दिवटया पेटल्या आहेत. निशाणे, तोरणे, दीपमाळा उजळल्या आहेत. मशिदीच्या दारात बाबांचा श्यामकर्ण घोडा उत्साहाने खिंकाळत आहे. गणू वर्णन करतात :

(गीत)

ढोल, दमामे, टाळ,  
नौबती वाजतसे खंजिरी,  
निघाली बाबांची स्वारी॥

पालखी रथासह भक्ती शृंगारिली  
तोरणे निशाणे भवती उंचावली  
नळे, फटाके, चंद्रज्योती फुटती मार्गावरी॥  
निघाली....

खिंकाळे प्रेमे श्यामकर्ण अंगणी  
बाबांस उठविती तात्या मशिदीतूनी  
छत्रचामरे, चवऱ्या ढाळिती  
श्री बाबांच्या शिरी॥ निघाली....

जरतारी शेला घालिती अंगावरी  
उधळिती गुलाला प्रभूच्या अंगी शिरी  
तेज झळकते दिव्य गुरुंच्या  
श्रीमुखकमलावरी॥ निघाली....

बसविती साईंना चावडीत आसनी  
सजविती रत्नमय सुवर्ण आभूषणी  
श्री गुरुशक्ती प्रगट जाहली  
नामाच्या गजरी॥ निघाली....

— श्री साईगीतायन

(बापूसाहेब जोगांनी कस्तुरीगंधाची उर्ध्वरेषा काढलेली, निमोणकरांनी हाती छत्र धरलेली, तात्यांनी केशर उटी लावलेली, षोडशोपचार पूजा झालेली बाबांची शृंगारलेली काया मुखावर दिव्य गुरुशक्तीच्या तेजाने झळकत असे. चावडीतील हे मिरवणुकीनंतरचे दृश्य अद्वितीय असे. बाबा चिलमीचा झुरका घेऊन वर्तुळाकार भक्तांत फिरवीत.)

बाबांसारख्या विरक्त ज्ञानयोगी संताच्या भक्तजीवनात राधाकृष्णेच्या व इतर व्यावहारिक, बाह्यसांप्रदायिकता प्रिय असलेल्या सधन, शिक्षित आणि साधनसंपन्न भक्तांच्या आगमनाने शिरडीची नवी उपासनासंस्था उभी राहिली. आरती, उत्सव, पूजा, रथ, मिरवणूक अशा बाह्य भक्ती-प्रथा स्वीकृत होऊन शिरडीचे संस्थानस्वरूप विकसित व्हावयाचे हे बीजारोपणच होते. दासगणूंची पदे, भीष्मांच्या आरत्या, अभंग इत्यादींमधून ही दृश्य सामुदायिक उपासना प्रत्यक्ष आकाराला आली. भीष्मांच्या १९०८ मधील शिरडीतील आगमनाची ही उपकथा या जागी अत्यंत समर्पक आणि समयोचित ठरेल, कारण व्यक्तिगत भावउपासनेला सामुदायिक भक्तिउपासनेत बुडविण्याचा स्पष्ट आदेश बाबांकडून भीष्म यांना मिळाला. भीष्मांनी ज्ञानोबा, तुकोबांचे अभंग, पारंपारिक आरत्या, स्वत:ची व गणूची पदे यातून 'साईसगुणोपासना' रचिली.

## ''मला आणि इतरांना दिल्यावाचून स्वत: खाऊ नकोस''

वर्ष: १९०८) (स्थळ: द्वारकामाईत भक्तांसह बाबा

**बाबा:** बापूसाहेब, शामा! अरे, सच्चिदानंदाचे येथे आगमन होत आहे. (भीष्म प्रवेश करतात.)

**भीष्म:** (जोग, शामा चकितपणे पहातात.) बाबा, माझा आपल्याला प्रणाम आहे!

**बाबा:** जय सच्चिदानंद! शामा, बापूसाहेब, हाच तो सच्चिदानंद!

**भीष्म:** बाबा, आपण मला स्वप्नात झालेल्या सच्चिदानंदाच्या दृष्टांताचे स्मरण यापूर्वीच्या आपल्या भेटीतच करून दिले होते. माधवराव, बापूसाहेब बाबा हे सर्वसाक्षी आहेत. त्यांच्यापासून काही लपविता येत नाही.

**बाबा:** (सस्मित) अरे, आम्ही दाही दिशा फिरत असतो, त्यामुळे आम्हाला सर्व समजते. अरे भाऊ, सारी शहरे – नागपूर, पुणे, मुंबई, सातारा ही रामाचीच स्थाने आहेत.

**भीष्म:** बाबा, मी नागपूरचा असलो, तरी साईरामाच्या शिरडीचा निवासी झालो आहे.

**बाबा:** तर मग ही घे चिलीम! एक झुरका घे पाहू!

**भीष्म:** (नाखुषीने झुरका घेतात.) हा आपला प्रसाद आहे. (आनंदाने) काय चमत्कार! मला आनंदाची धुंदी चढत आहे. (ध्यानस्थ बसतात.)

**बाबा:** तू एकटाच लाडू खातोस. आम्हाला आणि इतरांना काही देत नाहीस. मला तुझ्याकडून पाच लाडू हवे आहेत.

**भीष्म:** (गोंधळून) बाबा, मला समजत नाही. साठे, तुम्ही तरी सांगा समजावून!

**साठे, जोग:** भीष्म, बाबांना लाडू तयार होत आहेत म्हणून सांगा! तुम्ही ती पाच कवने रचली नाहीत का ? तीच बाबांना हवीत. बाबांना ह्या रचना तुम्ही तुमच्यापुरत्या न ठेवता साईंची उपासना म्हणून साईबाबांच्या चरणी ठेवाव्यात व इतरांना प्रसाद म्हणून वाटाव्यात, असे सांगायचे आहे.

**भीष्म:** बाबा, मला एक पूजा व आरतीचे पुस्तक तयार करावेसे वाटते. त्यात आपण गुरुदत्तात्रेय, विठ्ठल आणि विष्णूस्वरूप असल्याचे दर्शवून ज्ञानोबा आणि तुकोबा यांची पदे, अभंग घालायचे आहेत. मानसपूजा, आरत्या, भूपाळ्या यांचा त्यात मी समावेश करीन. गणूदासांची सुंदर गीतेही मी त्यात गुंफीन.

**बाबा:** अल्ला भले करील! तू हा प्रसाद स्वत:पाशी न ठेवता सर्वांना दे! सर्वांना त्या भजनाच्या आनंदात आणि आरत्यांच्या गजरात तुझा सच्चिदानंद भेटव! पुढे काका ही सगुणोपासना छापतील. नंतर अण्णा येईल आणि तोही लोकांना पारायणाला प्रवृत्त करील. माझी ही पाखरे एक-दोन वर्षांत शिरडीत येतील. आता तू तुझी पदे वाच!

**भीष्म:** बाबा, मी पाच पदे लिहिली आहेत. त्यांच्या सुरवातीच्या ओळी वाचतो.

(१) ''समर्थ गुरु साईनाथ पुरवी मनोवासना''

(२) ''जयदेव, जयदेव, दत्ता अवधूता, साई अवधूता''

(३) ''साईनाथ महाराज, आता कृपा करा गुरुराज''

(४) ''मनोहर ध्यान किती हे साईंचे, पाठीशी चांदीचे सिंहासन''

(५) श्रीमत् साई परेश मूर्ति नयनी आणोनिया पाहिली''

बाबा, आपले आशीर्वाद गृहीत धरून ह्या आरत्या, पूजा, मानसपूजा व पदे मी रचिली आहेत. आपली आज्ञा समजून मी ही उपासना काकड आरत्या, धुपारत्या, सांजारत्या व शेजारत्यांसह वर्षभरात तयार करून ठेवीन. ह्या छापून लोकांपर्यंत पोहोचाव्या म्हणून आपण वरदान द्या!

**बाबा:** भाऊ, तू काम कर! हरि तुला यश देईल. पण हे लाडू सर्वांसाठी आहेत, केवळ एकट्यासाठी नाहीत, याची आठवण ठेव! मला दाखविल्याशिवाय आणि माझ्या लेकरांना प्रसाद दिल्यावाचून जो घास घेत नाही, तो मला प्राणाहूनही प्यार होतो.

**भीष्म:** बाबा, सर्वजण वंदन करतो. (सर्व जातात.)

(भीष्म हे पदरचना करीत. ते कीर्तनकारही होते. त्यांना बाबांनी ते ब्रह्मरूप असल्याचा अनुभव दिला. भीष्मांनी **'सगुणोपासना'** रचली. ती शिरडीत अखंड गाजते आहे. काकासाहेब दीक्षित हे १९०९-१० च्या सुमारास दाभोलकरांच्या संसर्गाने शिरडीत दाखल झाल्यावर त्यांनी **'सगुणोपासना'** ही केवळ शब्दबद्ध न ठेवता स्वखर्चाने छापून पुस्तकबद्धही केली. सगुणोपासनेत बाबांना विष्णू, दत्त वा विठ्ठल म्हणून उपासिले आहे. यातील आरत्या, अभंगांत अनेक प्रचलित पदांचे व रचनांचे प्रतिबिंब पडले आहे. त्यात गणूंची पदेही आहेत. भीष्मांच्या स्वतंत्र रचनाही आहेत.)

शिरडी येथे वैयक्तिक आर्त प्रेमभक्तीच्या उपासनेला श्री साईबाबांनी आरती, पूजा, धूप, दीप, उत्सव, रथ, चावडी अशा सामुदायिक उपासनेची जोड दिल्याचा वृत्तांत मागील उपकथेत आला आहे. सर्वसाधारण अज्ञ भाविकाला पूजा, उत्सव, आरत्या अशा व्यापक, विस्तारित आराधना प्रिय असतात. त्यामुळे अनेक माणसे एकाच वेळी भक्तिभावाकडे आकर्षित होतात. हीच **'समापत्ति'** होय! या मुख्यत: बाह्य एकाग्रतेकडून आंतरिक जप व ध्यानाच्या सखोल उपासनेकडे सामान्य मन हळूहळू वळते. तीव्र साधक प्रथमपासूनच आर्तता व **'प्रपत्ति'**कडे झुकलेला असतो. बाबांनी दोन्ही उपासनांना न्याय दिला, पण तोही भक्तांच्या आग्रहामुळेच. ते स्वत: पूर्ण विरक्त, पूर्णकाम होते. तरीही सामान्यांचे चुकते-मुकते भक्तिभावाचे पाऊल ते समजून, सांभाळून

घेत होते. एक उदाहरण घेऊ या!

दत्तसंप्रदायाचे व्यासमुनी टेंबेस्वामी, म्हणजे वासुदेवानंद सरस्वती, हे परम परिव्राजकाचार्य स्वामी, दत्तपुराण, दत्तमाहात्म्य इत्यादी संस्कृत, मराठी व्युत्पत्र दत्तोपासना ग्रंथाचे लेखक होत. आपल्या भारतभ्रमंतीत राजमहेंद्रीजवळ नांदेडचे प्रसिद्ध वकील पुंडलिकराव नांदेडकर हे मित्रांसह वासुदेवानंदांच्या दर्शनास गेले. या साईभक्ताचे स्वामींनी कुशल विचारून श्री साईंना एक श्रीफळ देण्यासाठी या अध्यात्मबंधूने पुंडलिकरावांपाशी भेट म्हणून दिले. त्यांच्या मित्रमंडळीने वाटेत चिवडा तिखट झाल्याने हा नारळ फोडून कोपरगांवजवळ ओढ्याकाठी फस्त केला. पुंडलिकराव हे या चुकीमुळे पस्तावले. द्वारकामाईत सर्व मंडळी पोहोचली.

## ''त्या श्रीफलाचे मोल सोन्या–चांदीनेही होणार नाही!''

वर्ष: १९०८) (स्थळ: द्वारकामाईत पुंडलिकराव मित्रांसह प्रविष्ट होतात.



**पुंडलिकराव:** (बाबांचे चरण वंदून हार-फुले अर्पण करतात.) बाबा, प्रणाम!

**बाबा:** ये पुंडलिका, येथे बैस! माझ्या बंधूंनी राजमहेंद्रीजवळ तुझ्यापाशी दिलेली ती माझी वस्तू मला दे! मी तिची केव्हापासून वाट पहात बसलो आहे.

**पुंडलिकराव:** (खजिलपणे मान खाली घालून) बाबा, क्षमा करा!

**बाबा:** पुंडलिका, ऐकलेस काय? मी माझ्या बंधूस्वामींनी दिलेला नारळ मागतो आहे. तो नारळ माझ्या सरकारचा, गुरुदत्तांचा आहे.

**पुंडलिकराव:** बाबा, आमच्याकडून घोर अपराध झाला आहे. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी यांनी आपल्यासाठी दिलेला तो नारळ आम्ही गमावला. स्वामींनी आपल्याला प्रणाम सांगून तो नारळ भेट दिला होता.

**बाबा:** तो प्रणाम माझ्या फकिराला पोहोचला. पण तो प्रसाद या फकिराच्या मठीत प्रत्यक्ष येऊन पोहचला नाही.

**पुंडलिकराव:** बाबा, चिवडा तिखट लागला म्हणून ह्या माझ्या सोबत्यांनी तो नारळ फोडून त्याचे खोबरे चिवडयात मिसळून खाऊन टाकले.

**बाबा:** अरे, ती सरकारची वस्तू तुम्हीं जपून ठेवली नाही, याला म्हणावे तरी काय? माझ्या सरकारचा यात अवमान झाला आहे.

**पुंडलिकराव:** बाबा, नारळ फोडताना तो स्वामींचा नारळ असेल याचे भान माझ्या मित्रांना राहिले नाही. क्षमा करा! (पाय धरतात.) मी दुसरा नारळ आपल्या चरणी ठेवतो.

**बाबा:** अरे, माझ्या बंधूंनी विश्वासाने दिलेला तो नारळ तुम्हाला सांभाळता येत नव्हता, तर तो घेतलात तरी कशाला? त्या नारळाचे मोल जगात सोन्याचांदीलाही नाही.

**पुंडलिकराव:** बाबा, चूक झाली.

**बाबा:** अरे, त्या नारळाचे मोल साऱ्या विश्वात दुसऱ्या कोणत्याही वस्तूला येणार नाही. तुम्ही माझ्या बंधूंचा विश्वासघात केला. माझ्या बंधूंचा मानस तुम्ही पुरा केला नाही.

**पुंडलिकराव:** बाबा, आमची चूक पदरात घ्या! आम्ही पश्चात्तापदग्ध आहोत. आम्हाला स्वामींच्या प्रणामाची व नारळाची किंमत समजली नाही.

**बाबा:** आता शोक करून काय फायदा! झाले गेले गंगेला मिळाले. मला फक्त बंधूंची इच्छा पुरी न झाल्याची खंत वाटते आहे. तुम्ही भूकेसाठी नारळ फोडून खाल्ला याचा मला राग नाही. तुमच्या मुखी श्रीफळ गेले, ते माझ्या मुलांच्याच कामी आले आहे. तुमच्या तृप्तीत ते फळ मला मिळाले आहे. आता खंत नको.

**पुंडलिकराव:** दयावंत माऊली! आम्ही तुमचे ऋणी आहोत. ही अपराधाची भावना आमच्या मनात घर करून राहील.

**बाबा:** बरे तर, आता जा! अल्ला कल्याणच करील! (सर्व जातात.)

(श्री बाबांची ही श्रीफळकथा फारच मार्मिक आहे. संताच्या हातची कृपाभेट ही अमोल असते. तिची पारख आणि किंमत केवळ संतजनच करू शकतात. सामान्यांना तिचे मोल कसे होणार! टेंबे महाराजांसारख्या दत्तावतारी संताने बाबांचे केलेले मोल व सन्मान यांचे तो नारळ प्रतीक होता. यानंतरच्या कालखंडात बाबांच्या जीवनातील शेवटच्या दशकाचा काळ येतो. या काळात बाबांचे चरित्रकार दाभोलकर, टिळकांचे सहकारी बॅ. खापर्डे, बाबांचे शिष्य व महान् योगी उपासनी महाराज इत्यादींच्या आगमनाने या जीवनाचा सोन्याचा कळस या कालखंडात घडत गेला व साईजीवनकथा अंतिम पर्वास पोहोचली.)

॥ एकाग्र नेत्र तू ।
लाव रे मजकडे ॥

# साईकृपा

॥ मी कृपाकटाक्षे ।
पाहीन रे तुजकडे ॥

वर्ष ७२ अंक ८-९ • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • नोव्हेंबर-डिसेंबर, १९९३


## गाडीखाली आलेल्या माझ्या मुलीस बाबांनी वाचविले !


(सौ. शुभदा रणदिवे, अंधेरी (पू.), मुंबई यांच्याकडून):




"साई तारी त्याला कोण मारी" याची प्रचिती आम्हाला तीन वर्षांपूर्वी आली. माझी छोटी मुलगी त्यावेळी चार वर्षांची होती. शाळेत जाण्यासाठी तिला मारूती व्हॅन लावली होती. व्हॅनने शाळेतून घरी यायच्या वेळेवर मी तिला घ्यायला बिल्डिंगच्या गेटवर जात असे. दिनांक ६ जुलै रोजी नेहमीप्रमाणे माझी मुलगी शाळेतून व्हॅनने आली. व्हॅनमधून ती गेटवर उतरली. त्याचदिवशी नेमका मला गेटवर जायला जरा उशीर झाला.... माझी मुलगी गेटमधून आत शिरत असतानाच ड्रायव्हरने गाडी रिव्हर्समध्ये गेटच्या आत घेतली.... अगदी तेव्हाच दुसरी एक गाडी बाहेर जात होती.... माझ्या मुलीला कुठे पळायला जागा नव्हती.... घाबरून जाऊन ती मट्कन खालीच बसली.... ज्या मारूतीमधून येऊन ती उतरली होती तिच्याच खाली ती आली.... ड्रायव्हरला केवढी भयंकर घटना होऊ घातली आहे, हे कळले नाही.... माझी मुलगी गाडीखाली कोलमडत गेली.... हे काळीज भेदणारं दृश्य एका भाजीवाल्याने पाहिलं.... तो तस्साच धावत आला.... त्याने सर्व शक्ती एकवटून दोन्ही हातांनी गाडी थोपविली. तोपर्यंत माझी शिवानी गाडीखालच्या सायलेन्सरकडे अडकून बसली होती. आरडाओरडा ऐकून जवळच काम करणारे मजूरही धावले. सर्वांनी मिळून गाडी उचलली आणि माझ्या शिवानीला बाहेर काढली. तिला अशा अवस्थेत पाहताच माझे तर हातपायच गळाले. तिला घेऊन तडक आम्ही दवाखाना गाठला. तिथल्या डॉक्टरने हॉस्पिटलमध्ये जायला सांगितले. हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तिला लागलीच ॲडमिट करण्यात आले. नंतर तिच्यावर ऑपरेशन्स वगैरे चालू झाले. तेव्हा, एवढ्याश्या जीवाला कोण यातना होत असतील, याची जाणीव होऊन माझा जीव पार घाबराघुबरा झाला. खरे सांगते, एकीकडे तिच्यासाठी साईबाबांचा सारखा धावा करीत होते.... निरनिराळ्या देवांना नवस बोलत होते.... तर दुसरीकडे देवांचा रागही येत होता.... कारण, अपघाताच्या आदल्याच दिवशी मी आईवडिलांना व मुलींना घेऊन साईबाबांच्या मंदिरात गेले होते.... मग 'हा असा प्रसंग' देवाने का उद्भविला ! माझ्या आईने माझी समजूत घातली, साईबाबांनीच वेळ-काळाला थोपविले व आपल्या शिवानीला वाचविले. नाहीतर एवढीशी मुलगी गाडीखाली येऊन परत आपल्या हातात मिळाली असती का ! हळूहळू माझ्या शिवानीच्या जखमा बऱ्या झाल्या. माझी बाबांवरील श्रद्धादेखील, जी डळमळीत झाली होती, ती उलट जास्तच दृढ झाली व माझी शिवानी बरी झाल्यावर आम्ही शिरडीला येऊ, या माझ्या नवसाप्रमाणे मुलीला घेऊन आम्ही शिरडीला गेलो आणि तिला बाबांच्या समाधीवर घातली.

खरंच, बाबांनी आम्हाला आतापर्यंत जसं वेळोवेळी संकटांतून तारलंय, तसाच त्यांचा आशीर्वाद नेहमी आम्हा सर्व भक्तांना सदैव मिळत राहो, हीच श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना. •


'श्री साईलीला'चा अंक मिळत नसल्यास किंवा वितरणा-संबंधीच्या अन्य तक्रारींसाठी वितरण व्यवस्थापक, 'श्री साईलीला', ८०४-बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४ यांच्याशी संपर्क साधावा. आपल्या तक्रारीची त्वरित दखल घेण्यात येईल.



कै. म्हाळसापती, श्रीसाईबाबा, कै. माधवराव देशपांडे

# बाबा बोलावतात तेव्हाच शिरडीला जाणे होते !

(श्री. गजानन धावडे, सयानी रोड, मुंबई यांच्याकडून):



**श्री** साईबाबांचे दर्शन भक्ताला मिळायला भाग्य लागते. जरी त्या भक्ताची इच्छा असली तरी त्याला बाबांचे दर्शन मिळणे कठीण असते. माझीसुद्धा एक-दोन वेळा अशीच परिस्थिती झाली. एके दिवशी माझ्या मित्राने मला शिरडीला येण्यासंबंधी विचारले. त्याला काय सांगायचे, हेच मला कळेना ! कारण मला शिरडी आणि बाबा यांविषयी काहीच माहिती नव्हती. लोक बोलायचे, शिरडीला जाऊन दर्शन घेऊन आल्यावर चांगले असते. मी माझ्या मित्राजवळ गाडीची चौकशी केली. गाडी रात्री ९ वाजता सुटणार होती. म्हणजे तसा बराच अवकाश होता. मला फार आनंद झाला. मी घरी येऊन सांगितले. गाडी लागल्यावर मी गाडीत जाऊन बसलो. तेवढ्यात माझा मित्र आला. आल्याआल्याच मला म्हणाला,

"गजानन, मला येता येणार नाही. तू आणि माझा भाऊ असे तुम्ही दोघे जा!"

मला फार वाईट वाटले. मी मनात बाबांना म्हणालो, आता बाबांचीच इच्छा होईल तेव्हा दर्शन घडेल ! असे माझ्याबाबतीत दोन-तीन वेळा घडले.

त्यानंतर दोन-तीन दिवसांनी माझ्याकडे एक मित्र आला. त्याने विचारले,

"बाबूराव, आप कभी शिरडी गये हो ?"

मी म्हणालो,

"जब तक बाबा का बुलावा नहीं आता तब तक शिरडी जाना नहीं होगा !"

तो म्हणाला,

"आप फिकर मत करना ! मैं आपको ले जाऊँगा !"

दुसऱ्या दिवशी तो मित्र आला व त्याने मला शिरडीची दोन तिकिटे काढायला सांगितली.

दुसऱ्या दिवशी आम्ही शिरडीला गेलो. बाबांचे दर्शन घेतले. मला खूप आनंद झाला. मी बाबांच्या चरणांवर लोटांगण घातले. त्यांना म्हणालो.... तुम्ही माझी किती दिवसांपासूनची इच्छा पूर्ण केली. या गोष्टीला २०-२५ वर्षे झाली असतील. तेव्हापासून मी बाबांचा भक्त झालो. त्यावेळेपासून आम्ही शिरडीला जाऊन बाबांचं दर्शन घ्यावं असं वाटलं की लागलीच शिरडीला जातो. मी प्रथमच शिरडीला जाऊन आल्यानंतर मी, माझ्या बायको-मुलांना घेऊन शिरडीला गेलो. तिथे आम्ही बाबांना झुणका-भाकरीचा नैवेद्य दाखविला. तेव्हापासून आम्ही दररोज घरी बाबांना नैवेद्य दाखवितो. अगदी त्यावेळेपासून बाबांनी आमच्या घरात दुःख काय ते जाणवू दिलेले नाही.

आमच्यावर कोणतेही संकट आले की आम्ही बाबांचे स्मरण करतो; आणि आमचा अनुभव असा आहे की बाबांची 'याद' करताच संकटाचा मागमूसही रहात नाही. असेच एकदा माझ्यावर संकट आले होते. माझ्या पोटात अशी काय जोराची कळ आली की मी पुढच्याच क्षणी मरतोय, असे मला वाटू लागले. मी तसाच तडक डॉक्टरकडे गेलो. डॉक्टरने आजाराचं निदान केलं.... "किडनी स्टोन!" आणि औषधाच्या तीन गोळ्या देत ते म्हणाले,

"ह्या गोळ्यांनी कमी वाटले नाही तर खंडेपारकर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हा !"

एक गोळी घेतल्यावर मला थोडा आराम वाटू लागला; पण थोड्या वेळातच पुन्हा दुसरी अशी जीवघेणी कळ आली की ती मला बिलकुल सहन होईना. म्हणून मी दुसरी गोळी हातात घेतली आणि बाबांच्या फोटोसमोर जाऊन उभा राहिलो. माझ्या डोळ्यांतून भळाभळा आसवं ढळू लागली. मी बाबांना म्हणालो.... आता ही मी गोळी घेत आहे. जर तुम्ही या गोळीपासून ही कळ दूर केली, तरच मी समजेन की तुमची माझ्यावर कृपा आहे.... असे म्हणून मी गोळी घेतली. बाबांना मी नवस केला होता की मी बरा झालो तर तीन महिन्याच्या आत दर्शनाला येईन म्हणून. बाबांच्या कृपेने मी बरा झालो आणि दर्शनही घेऊन आलो.

त्यानंतर मी व माझी पत्नी आम्ही रामनवमीला शिरडीला गेलो. उत्सवाच्या निमित्ताने अखंड पारायणासाठी 'लकी' नंबर काढण्यात आले होते. त्यात माझ्या पत्नीचा 'लकी' नंबर आला. हे सर्व बाबांच्या कृपेमुळेच घडले. जो बाबांची आठवण नित्यनियमाने करतो, त्याला बाबा नक्कीच प्रसन्न होतात, त्या भक्ताच्या हाकेला केव्हाही धावून येतात. अशी बाबांची अमोघ कृपा भक्तांवर असते. असाच एक अनुभव....

माझ्या मोठ्या मुलाला नोकरी नसल्यामुळे मी व माझी पत्नी नेहमी चिंतेत असू. आमच्या शेजारचा एक मुलगा दररोज सकाळी ९ वाजता कामावर जाण्यासाठी बाहेर पडायचा. तो एल्.आय.सी.त कामाला होता. त्याला पाहिल्यावर आम्हाला आपला मुलगासुद्धा एल्.आय.सी.त कामाला लागावा, असे वाटे. माझ्या पत्नीने मनात बाबांना प्रार्थना केली आणि बाबांच्या कृपेने मुलाला कॉल आला. तो परीक्षेत पास झाला. त्याला कामावर राहून एक वर्ष झाले. ही सर्व बाबांचीच कृपा. माझ्या मुलाला जिथे नोकरी पाहिजे होती तिच नोकरी बाबांनी पाठिशी राहून मिळवून दिली. आमची इच्छा पूर्ण झाली. मुलगा नोकरीवर राहिल्यानंतर आम्ही पाच नारळांचे तोरण, पाव किलो पेढे, शाल व पट्टा बाबांच्या अंगावर चढविला.... •

## थोर तुझे उपकार

थोर तुझे उपकार साई देवा,
थोर तुझे उपकार।
जन्मोजन्मीचे दुःख आमुचे
केले तू संहार ॥धृ.॥
प्रथम दर्शनी मजला कळली
तुझी थोर दिव्यता।
तुझ्या वचनांची येई प्रचिती
जगी तुझा संचार ॥१॥
साई पुजनी मनही रमते
तुझी थोर गाथा।
भवसागर तव तरून जाण्या
तुझाच रे आधार ॥२॥
श्रद्धा-सबुरी मंत्र देऊनि
पावन केली जनता।
कवने रचिता
करि रे तू अमुचा उद्धार ॥३॥

— श्री. चंद्रकांत गरगटे
सातारा.

## 'श्री साईलीला'च्या वाचकांना आवाहन

आपण 'श्री साईलीला'चे सुजाण वाचक असल्याने आध्यात्मिक, धार्मिक, पारमार्थिक, संस्कारशील, मनोविश्लेषणात्मक, विचारप्रवण वाचन, श्रवण, मनन, चिंतन करीत असाल. अशाप्रकारचे अनुभवही आपण घेत असाल. त्यामुळे आपल्या विचारांना अधिक चालना मिळत असेल. विचारांच्या कक्षा वेगवेगळ्या दिशांनी रूंदावत असतील. हे विचार कुठेतरी प्रगट व्हावेत अशी अनिवार इच्छाही आपल्याला झाली असेल. तर मग वेळ कशाला, आपले विचार आपल्या लेखणीतून लागलीच कागदावर उमटू द्या. आम्ही त्यांची मुद्देसूद मांडणी करून त्या योग्य विचारांना 'श्री साईलीला'त नक्कीच स्थान देऊ !

# मन केवढं केवढं....

– पंडित ग. रा. सावंत

## एकाग्रता

मनाला एका गोष्टीची अत्यंत जरूरी असते, ती म्हणजे भीतीमुक्त राहणे. जोपर्यंत मनात भीती राहील तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे. प्रत्येक माणसाचे मन भीतीयुक्त असते. त्याला प्रत्येक ठिकाणी भीतीच आहे, असे वाटते, म्हणून तो दुसऱ्याकडे संदेहाच्या दृष्टीनेच पाहतो. प्रथम आपण ही भीती घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समजा, आपल्यावर रात्रीच्या वेळी कुठे एकटे जाण्याचा प्रसंग आला व आपण तिकडे जाण्याकरिता निघालो. जसजसे आपण पुढे जात जाऊ तसतसे आपले मन शंका काढू लागेल की जर रस्त्यात चोर किंवा भूत दिसले तर? चोरापेक्षा मनुष्य भूतालाच जास्त भीत असतो. भूताविषयीच तो मग जास्त विचार करू लागतो. तो एकच विचार मनात पुढे दृढता उत्पन्न करतो. शेवटी त्याला खरोखरच भूत दिसते. याचे कारण असे की पिशाच एकाच ठिकाणी थांबत नाही, त्याचा आत्मा वातावरणात सतत भटकत असतो. ज्यावेळेस आपल्या मनातील भूताविषयीची भावना बळकट होते, तेव्हा तीच भावना त्या आत्म्याला आपल्याकडे ओढून आणते, कारण आपल्या अंतरात्म्यातून निघालेला तो एकच स्वर त्या क्षणी असतो. तो त्या आत्म्याला आपल्या अंतर्मनाच्या विद्युतशक्तीच्या जोरावर लोहचुंबकासारखे ओढून आणतो. ते दुसरे-तिसरे काही नसून आपल्याच अंतरात्म्याचा तो आवाज असतो. याउलट जर आपण कसलाच विचार मनात न आणता गेलो तर त्या ठिकाणी भूत जरी असले तरी ते आपल्याला दिसणार नाही.

प्रत्येकाला असे वाटते की आपल्यात काहीतरी कमतरता आहे. जसे, मी नेहमी आजारी माणसासारखा दिसतो, मला इतरांप्रमाणे सुखसोयी नाहीत, माझी परिस्थिती खूप नाजूक आहे, मला कसलीच कला अवगत नाही. अशाप्रकारच्या विचारांमुळे मनात न्यूनगंड वाढत जातो आणि अखेरीस आपण जसा विचार करू त्याचप्रमाणे होत राहते. माझ्यापेक्षा दुसरा श्रेष्ठ आहे, असे समजता कामा नये. उलट मी त्याच्यापेक्षा सर्वबाबतीत श्रेष्ठ आहे, असे समजले पाहिजे. समजा, आपल्यात कसलीतरी कमतरता असली, तर ती कशी घालवावी, याचा विचार केला पाहिजे. म्हणजे ती भीती आपल्यात राहणार नाही. मला कसलेच ज्ञान नाही, असे कधीच समजू नये. त्याऐवजी काही नवीन शिकण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नांना फळ हे अवश्य येते.

मला माझ्या बालपणातील एक गोष्ट आठवते. ती अशी....

माझ्या गुरुदेवांनी मला माझ्या वयाच्या ८-१० वर्षापासून मंत्र-तंत्र, जादू, भानामती, औषधी, प्राणायाम, योगासने शिकविण्यास सुरुवात केली होती; आणि तसा प्रसंग आला की ते मला बरोबर घेऊन जात असत. एकदा एका माणसाला साधा ताप आला होता. त्याच्याकडे कोणी लक्ष देत नव्हते. ताप वाढत गेला. शेवटी ताप जास्त झाल्यामुळे तो तापात काहीतरीच बडबडावयास लागला.... "तो पहा, तो आला, तो आला, तो मला बोलावतो आहे".... वगैरे. त्याच्या घरातील लोकांची अशी भावना झाली की तो अमावस्येच्या दिवशी शेतात एकटाच झोपला होता (शेतात तो तर तसा नेहमीच जात असे.) म्हणून त्यास भूताने धरले असावे. माझ्या वडिलांना त्या लोकांनी बोलाविले. मीही त्यांच्यासोबत गेलो. खरा आजार काय आहे, हे वडिलांनी ओळखले, परंतु त्या लोकांच्या मनातून त्या माणसास भूताने धरलेले आहे, हा समज काढून टाकावयाचा होता, म्हणून त्यांनी सर्वांना सांगितले की या भूतास हा माझा मुलगाही काढू शकतो. मी याला सर्व विद्या शिकविली आहे. त्या लोकांना फार आश्चर्य वाटले. भूत उतरवायची ही अवघड विद्या एवढ्या लहान मुलास तुम्ही कशी काय अवगत करून दिलीत? असा प्रश्न त्या लोकांनी विचारला. वडिलांनी त्यांना एक रिकामी बाटली आणावयास सांगितले व म्हणाले की या भूतास मी आता बाटलीत उतरवितो. भूत भरलेली ती बाटली जमिनीत पुरली म्हणजे पुन्हा ते याला त्रास देणार नाही. त्यांनी मग मला मंत्र म्हणावयास सांगितले. मी आपला मंत्र म्हणत राहिलो. थोड्याच वेळात वडिलांनी तेथे जमलेल्या लोकांना विचारले की पहा, त्या बाटलीत तुम्हास काही दिसते का? लोक त्या बाटलीकडे पाहू लागले. त्यांना त्या बाटलीत माणसाची लहान आकृती दिसू लागली. लोक आश्चर्य करू लागले की एवढ्याशा पोराने बाटलीत भूत कसे काय उतरविले? वास्तविक त्या मंत्राच्या आधारावर आणि लोकांची भावना अशी की माझे घराणेच मुळात याबाबतचे जाणकार आहे. परंपरागत चालत आलेल्या घराण्याच्या विद्येच्या बळावरच ते भूत या बाटलीत उतरले, अशी लोकांची समजूत झाली. माझ्या वडिलांच्या भाषाशैलीवर आणि त्यांच्या भावनेच्या बळावर ते लोक हिप्नोटाईज्ड झाले व त्यांना बाटलीत खरोखरचे भूत दिसू लागले. खरे पाहिले तर बाटली पूर्वीसारखीच रिकामी होती. वडिलांनी ब्रह्मपिंडीची जळ (मूळ) घासून त्या आजाऱ्यास पाजली. या औषधामुळे त्याचा ताप उतरला. ताप उतरल्यामुळे त्याचे बडबड करणे बंद झाले. सकाळी तो पूर्ण बरा झाला. मला त्यावेळी इतके ज्ञान नव्हतेच. एवढ्याशा वयात असताना जर मी हे करू शकलो होतो तर आपण इतरही ते करू शकता. मी इतरांपेक्षा याबाबतीत फारच मागे आहे, या त्यावेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या दुबळेपणामुळेच त्यांना भूत दिसले. मनाचा हा दुबळेपणा काढून टाकला पाहिजे. धीट झाले पाहिजे. प्रयत्न केले पाहिजेत.

आपले मन जेवढे प्रसन्न व आनंदी राहील तेवढी आपली काम करण्याची शक्ती वाढेल. समजा, आपण एका ठिकाणी नोकरी करीत आहोत. तेथे आठ तास काम करावे लागते. ह्या आठ तासांत जर आपण खुश राहिलो तर कामाचे बोझे वाटणार नाही. उलट आठ

तास कसे चुटकीसरशीं निघून गेले, हेसुद्धा समजणार नाही. परंतु आपण जर कंटाळत आणि नोकरी आहे म्हणून करावी लागते, अशा विचाराने वागलो तर ते आठ तास एका वर्षाप्रमाणे वाटतील. नेहमी आनंदी राहिल्याने मित्र आपल्याजवळ येतील. सर्वांना आपण हवेहवेसे वाटू. जर का आपला चेहरा 'रोती सुरत' असेल तर आपल्याजवळ कोणीच येणार नाही आणि आपल्याला एकलकोंडा समजून आपल्याशी बोलण्याचे टाळतील. जेवढे आपण एकटे राहू तेवढे आपल्याला जीवन अधिक कंटाळवाणे वाटेल. काम करावेसे वाटणार नाही. थोडेसे जरी काम केले तरी थकवा आल्यासारखे वाटेल. चेहरा निस्तेज होईल. निस्तेज चेहऱ्याजवळ कोण बरे उभे राहील! लहान सतेज बाळाकडे पहा, किती सुंदर दिसते ते! हा सुंदरपणा आला कोठून? सुंदर मुलाला पाहिल्याबरोबर त्याला घ्यावेसे वाटते. असे का होते? याचे कारण आनंदीत मन, हसरा चेहरा, चिंतारहित जीवन हेच होय! जेवढे आपण खुश राहू तेवढी आपली लोकप्रियता वाढेल. दिवसातून १६-१६ तास काम करणारे मी पाहिले आहेत, परंतु ज्या ज्यावेळी त्यांच्याकडे पाहिले त्या त्यावेळी त्यांचा चेहरा आनंदीत पहावयास मिळाला. थकवा कशास म्हणतात, हे जणू त्यांना माहीतच नाही. आपल्याला कोणी विचारले, ''मियाँ रोते क्यूं हो?'' आपण म्हणू, ''नहीं जी, मेरी सूरत ही ऐसी है!'' आपला चेहरा चांगला किंवा वाईट करण्यास आपणच जबाबदार असतो. हा सर्व खेळ आपल्या मनाचाच आहे. त्याकरिता नेहमीच आनंदीत राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आतापर्यंत मला आलेल्या टपालाद्वारे व प्रत्यक्ष भेटण्यास आलेल्या लोकांपैकी बहुतेक लोक असेच म्हणतात की खूप प्रयत्न करूनसुद्धा मन एकाग्र होत नाही आणि वेळही मिळत नाही. असे जर असेल तर आपले मन अश्लील पुस्तके वाचताना गुंग कसे होते? तीन तास सिनेमा पाहताना कसा कंटाळा येत नाही? हे तीन तास आले कुठून? क्रिकेटचा खेळ चालू असताना रेडिओजवळ, टी.व्ही.समोर आपण कसे शांत चित्ताने ऐकत, पाहत, बसतो? इतकेच नाही, त्यावेळेस आपण तहान-भूक सर्वकाही विसरून जातो. कॉमेंट्री ऐकण्याकरिता, मॅच पाहण्यासाठी घरी रेडिओ, टी.व्ही. नसेल तर आपण दुसऱ्याच्या घरी सर्व कामे सोडून ऐकत, पहात बसतो. हा वेळ आपल्याकडे कुठून येतो? हा वेळ आपण दुकानातून विकत आणला का? वरील कामांकरिता मन एकाग्र कसे होते? जर याबाबतीत मन एकाग्र होऊ शकते तर पूजा-पाठ, माळ जपणे याकरिता ते का होऊ नये? त्यासाठी आवश्यकता आहे ती त्याविषयीच्या गोडीची. जोपर्यंत मनात गोडी उत्पन्न होत नाही तोपर्यंत हे शक्य नाही. हा प्रयत्न रोज करून पाहिला पाहिजे. आज ना उद्या फळ अवश्य मिळते. यासाठी आपल्या गुरुने दिलेला मंत्र किंवा गायत्री मंत्र किंवा काहीच नसेल तर ''हरि ॐ''चा जप करायला हवा. हा सर्वश्रेष्ठ मंत्र आहे. म्हणूनच याला बीजमंत्र म्हटले गेले आहे. हा मंत्र रोज म्हणण्याची सवय लावून घेतली पाहिजे. मंत्र म्हणताना मन एकाग्र होत नसेल तरीही जप चालूच ठेवला पाहिजे. तो मध्येच सोडून देता कामा नये. मंत्र म्हणताना अनेक विचार जरी मनात उठत असतील तरी त्यांना उठू द्यायला हवे. आज ना उद्या विचार कमी होतातच. पोट खराब झाले म्हणजे आपण जुलाब घेतो. जुलाबाने मळ बाहेर पडतो. हा मळ आला कुठून? औषधात तर मळ नव्हता. होता तो आपल्याच पोटात. तो औषधाच्या योगाने बाहेर आला आणि पोट साफ झाले. तसेच आपल्या मनात कित्येक दिवसांपासून आजपर्यंत साचलेले विचार या मंत्राने निघत आहेत, असे समजले पाहिजे. त्याने मन शांत होईल. प्रयत्न अखंड चालूच ठेवले पाहिजेत. वेळ अधिक लागेल. एकदाची गोडी लागली की मग मात्र एक-दोन मिनिटांच्या आतच मन शांत आणि एकाग्र होते.

या इवल्याशा मनापासून ज्यावेळेस ते एकाग्र व ध्यान-धारणा समाधि ह्या अवस्थांमध्ये जाते त्यावेळेस किती लाभ होऊ शकतो, ते आता पाहू या! (१) निसर्गाचा असा विधिलिखित नियम आहे की ज्यावेळेस आपले कार्य कसे पार पडेल, याचा विचार करून बाह्यमन त्या अडचणींना तोंड देता देता थकून जाते व अशा वेळेस काय निर्णय घ्यावा, हे सुचत नाही तेव्हा बाह्यमन ते काम अंतर्मनावर सोपवून देते आणि अंतर्मन आपल्या गुप्तशक्तीच्या जोरावर त्या अडचणींना दूर करण्यास पूर्ण पाठिंबा देते. (२) आपला मित्र किंवा नातेवाईक एखाद्या वाईट कामात फसला असेल तर त्यापासून त्याला परावृत्त करता येते. (३) मनुष्य अशा रोगाने ग्रासलेला असेल की डॉक्टर, वैद्य यांपासून कसल्याच औषधाचा उपयोग होत नसेल तर असे अवश्य समजावे की त्याला जडलेला आजार हा मानसिक आहे. हा मानसिक रोग घालविण्यासाठी नुसती भावना देणे पुरेसे असते. (४) छू-छा जाणणारे लोक आपल्या मनापासून निघणाऱ्या विद्युत तरंगांच्या साहाय्याने भावना देऊन रोग्यास रोगमुक्त करतात. (५) 'क्ष-किरण (एक्स रे)' ज्याप्रमाणे सर्व वस्तूंच्या आरपार जातात त्यापेक्षा जास्त प्रमाणात शक्ती या मनातील विचारशक्तीत आहेत. त्याच्या बळावरच शरीरातील रोगग्रस्त यंत्र ठीकप्रकारे काम करते व रोगी बरा होतो. त्याच्या मानसिक भावनेत बदल घडवून आणण्याचे व त्याचे धैर्य वाढवून रोग बरा करण्याचे काम ही शक्ती करते. (६) आपल्या काही बऱ्या-वाईट इच्छा असतील त्याप्रमाणे भावना दिल्यास आपल्या इच्छेप्रमाणेच होते.

लहानपणापासून ज्या विषयाचा प्रभाव मनावर पडलेला असतो तो मनात कोठेतरी दबलेला असतो. ज्यावेळेस काम, क्रोध, मोह, अहंकार, ईर्षा व द्वेष यांचा जोर पडतो त्यावेळेस शरीरावर त्याचा परिणाम होतोच. हे षडरिपू आहेत. हे मुळात भीतीचे उत्पादक आहेत. ह्या षडरिपूंचा जोर वाढू लागला म्हणजे त्याचा शरीरावर आणि मनावर अनिष्ट परिणाम होऊ लागतो. रागात शरीरावर ताबा राहत नाही. भीतीमुळे शरीराचा थरकाप होतो. शरीरावर होणारे परिणाम आपणास दिसतात. परंतु खरा परिणाम तर मनावर होत असतो, जो दिसून येत नाही. यालाच आपण मानसिक रोग म्हणतो. असे रोग डॉक्टर किंवा वैद्यांकडून बरे होत नाहीत. मनाला कुठल्याही एका विषयावर जास्त वेळ चिंतन करणे किंवा विचार करणे पसंत नसते. ते सारखे २-३ सेकंदात बदलत राहते. याचमुळे मनुष्य आपली झोप आणि स्वास्थ्य खराब करून घेतो. याला जबाबदार आपण स्वत:च आहोत. त्याकरिताच मनाला ताब्यात

ठेवावे.

मनाला ताब्यात ठेवण्याकरिता पूजा, कीर्तन, जप, हवन, यज्ञ, नाम, ज्ञान, कर्म, तप याप्रमाणे पुष्कळ साधनं आहेत. सर्वात उत्तम साधना 'ध्यान' ही आहे. ध्यान ही मनाची चावी आहे. जेवढे ध्यान पक्के असेल तेवढे मन साफ व शुद्ध होईल. ध्यानामुळे मनाची धडपड बंद होते. त्याला आराम मिळतो. त्याची शक्ती वाढते. काही लोक असे समजतात की आपल्या मुलांना भरपूर शिकवून डॉक्टर, वकील बनवावे. आपल्याला (म्हणजेच पर्यायाने आपल्या मुलांना) काय आवश्यकता आहे ध्यान वगैरे गोष्टींची ? जर मुलगा या मार्गास लागला तर तो साधू होईल. मी तर म्हणतो, साधू होणे काहीच गैर नाही. कारण, समजा, तो डॉक्टर किंवा वकील झाला नाहीच आणि इतर वाईट गोष्टींचे वळण लागून दंगे-धोपे, चोऱ्या, लुटमार, पाकिटमारी करू लागला, तर ? यापेक्षा साधू होणे निश्चितच चांगले म्हणावे लागेल. एक चांगला साधू राष्ट्राचा पालनकर्ता होऊ शकतो. आपला धर्म वाचवू शकतो. स्वामी विवेकानंदांचेच उदाहरण घ्या ! एवढ्या कमी वयात जगात नाव कमवून हिंदूधर्म इतर धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे, हे त्यांनीच पाश्चिमात्य लोकांना पटवून दिले. वकील किंवा डॉक्टर फार तर आपल्याच गावात कीर्ति मिळवू शकतो, जगात तर निश्चित मिळवू शकत नाही. म्हणून साधूसंतांपासून चार पावलं दूर राहण्यापेक्षा त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या मुलांना काही अंशी तरी या मार्गास लावले पाहिजे. कमीतकमी त्यांचे आरोग्य ठीक राहील. डॉक्टरांना द्यावा लागणारा पैसा वाचेल. दंगे-धोपे कमी होतील. राष्ट्रउभारणीत त्यांचा अमूल्य वाटा राहील. **असे जर प्रत्येकाने ठरविले तर निश्चितच भारतात अनेक विवेकानंद तयार होतील.**

मनाला शांत व साध्य करून घेण्याकरिता आपला श्वास प्रथम साध्य करावा लागतो. ज्यावेळेस श्वास मंदावतो त्यावेळेस विचार बंद होतात. विचार बंद झाले, तर ते किती वेळपर्यंत टिकून राहतात, याकडे लक्ष द्यायला हवे. आपल्यां शरीरातील सर्व गात्रे ढिली होत आहेत, ती काहीच हालचाल करीत नाहीत, याची जाणीव झाली पाहिजे. इतकेच नव्हे, तर आपले अवयव, इकडे-तिकडेसुद्धा हलण्याची त्यांच्यात शक्ती नाही इतके ते ढिले झाले पाहिजेत. आपण श्वासाकडे फक्त एक साक्षी म्हणून पहात राहिले पाहिजे, तो चालतो की नाही याकडेच आपले केवळ लक्ष असले पाहिजे. थोड्या वेळाने अशी वेळ येईल की आपला श्वास खरोखरच हळूहळू कमी होत जाईल. शेवटी इतका कमी होईल की आपण श्वास घेत आहोत की नाही, हेही समजणार नाही. ज्यावेळेस संपूर्ण श्वास मंद होईल त्यावेळेस आपले मन एकदम विचार करणे सोडून देईल. एकही विचार आपल्या मनात उठणार नाही. त्या क्षणी आपल्या शरीरात एक वीज चमकल्यासारखा भास होईल. करंट लागल्यासारखे वाटेल. आपले मन विचार करणे बंद करील. फक्त शरीरात चेतना शिल्लक राहील. आपण त्यावेळी पूर्ण शुद्धीत (चैतन्यशील) असू. फक्त साक्षी म्हणून पहायचे– निरीक्षक म्हणून पहायचे– पंच म्हणून पहायचे. शरीर बिलकुल निष्प्राण, दगडाप्रमाणे शिथिल झाले आहे, असे वाटेल. श्वास बंद झाला आहे, असा भास होईल. विचार एकदम बंद होतील.

अशाप्रकारे पाहता पाहता एक प्रकाशवलय, फक्त प्रकाशबिंदू दिसू लागेल. ज्यावेळेस असा प्रकाश दिसेल, त्यावेळेस खुशाल असे समजावे की आपला अभ्यास योग्य मार्गाने चालला आहे. अशी स्थिती प्राप्त करून घेण्यासाठी मोठमोठे साधू, तपस्वी, योगी सर्व आयुष्यभर साधना करीत असतात. येथूनच ईश्वरापर्यंत पोहचण्याचा मार्ग (राजमार्ग) सुरू होतो. ज्यावेळेस अशी स्थिती प्राप्त होते त्यावेळेस एक धोका असतो. तो असा की स्वत:च्या प्रसिद्धीत फसून साधक पथभ्रष्ट होतो. जे पथभ्रष्ट होतात ते पुढे जाऊच शकत नाहीत. जातील तरी कसे ? त्यांचा रस्ता येथेच बंद होतो. प्रसिद्धीच्या मागे मनुष्य सारखा धावत असतो. लोकांना चमत्कार दाखवून आपल्याकडे आकर्षित करण्याकडे लक्ष जाते. फक्त स्वत:ची प्रसिद्धी एवढेच त्याला दिसते. असले लोक प्रथम खूप प्रसिद्धी कमवून घेतात. शेवटी त्यांच्याकडून काहीतरी चूक होतेच. मग मात्र त्यांना बोऱ्या-बिस्तरा बांधून पळून जाण्याव्यतिरिक्त त्यांच्यापुढे मार्गच शिल्लक राहत नाही. लोकांच्या नजरेतून ते उतरतात. एखाद्या वेळेस जीवावर बेतण्याची वेळ येते. अशी वेळ येऊ देता कामा नये. आपल्याला सिद्धपुरुष व्हायचे आहे, ईश्वरापर्यंत पोहचायचे आहे, जनकल्याणाकरिता काही करावयाचे आहे.


लक्षात ठेवण्यासारखे एवढेच की मनाला एकाग्र, शांत करणे, म्हणजे इकडे-तिकडे पसरलेल्या दुबळ्या शक्तीला एकत्रित करणे होय ! उदाहरण द्यावयाचे झाल्यास असे देता येईल.... मूठभर रेती जर एखाद्या व्यक्तीस फेकून मारली तर तिचा मार लागणार नाही. कारण फेकताना ती पसरेल. परंतु तीच रेती (वाळू) कपड्यात गुंडाळून चेंडू बनवून मारली तर जोरात मार लागून मनुष्य बेशुद्ध होऊ शकतो.

अभ्यास सुरू करण्याकरिता एकांत आणि शांत वातावरण अधिक उपयोगी पडते. खोली अशी निवडायची की जिथे अडगळ असता कामा नये. प्रकाशसुद्धा अधिक असता उपयोगाचा नाही. बाहेरील आवाज आत येणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. अभ्यासाकरिता पहाटेची वेळ फार चांगली असते. अशा वेळेस शांतता असते. रोज नियमित त्याचवेळेस अभ्यासाला सुरुवात केली पाहिजे. सूर्योदयानंतर ती करता कामा नये. जे आसन जमत असेल तेच स्वीकारले पाहिजे. शवासन जमत असल्यास उत्तम. जमिनीवर कांबळ (कंबळ) अवश्य असू द्यावे, कारण शरीरातील विद्युतशक्ती त्यामुळे वाया जात नाही. कानात कापसाचे बोळे घालावयास हवेत, जेणेकरून बाहेरील आवाज येणार नाही. बसून किंवा झोपून शरीराला ढिले सोडले पाहिजे. शरीरातील प्रत्येक ध्वनीकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे. रक्ताची गती नदीच्या प्रवाहासारखी ऐकू येईल. आपला श्वास वादळाप्रमाणे सो-सो करील. ज्यावेळेस शरीरातील प्रत्येक हालचाल स्पष्ट ऐकू येऊ लागेल त्यावेळेस असे समजावे की आपण उचित दिशेने वाटचाल करीत आहोत. काही दिवसांनी लांबचे ध्वनी ऐकू येतील. नादध्वनी ऐकणाऱ्याचे जीवन धन्य झाले, असे समजावे. त्याला गुरु करण्याची गरज नसते. अशा व्यक्तीस ग्रंथ किंवा शास्त्र काय शिकवील !

---

ग्रंथ परिचय


– साईली



## ज्ञानेश्वरीचा कथारूपी गद्यावतार

# सुबोध ज्ञानेश्वरी

सुमारे ७०३ वर्षांपूर्वी श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या हातून लिहिला गेलेला




'ज्ञानेश्वरी' हा लोकोत्तर ग्रंथ म्हणजे साहित्य विश्वातील आणि पर्यायाने अध्यात्मातील एक महान, विलक्षण आणि अपूर्व चमत्कारच आहे. हा ग्रंथ अध्यात्मावरील ग्रंथशिरोमणीच होय! तो एक वेदच आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ज्ञानेश्वरीची काव्यात्मकता विश्वात्मक आहे. हा अजोड ग्रंथ अभ्यासताना संतशिरोमणी श्री ज्ञानदेवांतील एक महान योगी, एक महान भक्त आणि एक रससिद्ध कवी असा त्रिवेणी

**ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी व 'सुबोध ज्ञानेश्वरी' याबाबत 'सुबोध ज्ञानेश्वरी'चे लेखक कै. श्री. य. गो. जोशी यांची अशी समजूत होती....**

**"माझी सुबोध ज्ञानेश्वरी, मूळ ज्ञानेश्वरीची जागा तिनें घ्यावी म्हणून, लिहिली नाही. मुळाकडे लोकांची प्रवृत्ती व्हावी म्हणून लिहिली आहे. मी माझ्या ज्ञानेश्वरीच्या शेवटी लिहिणार आहे की, माझी सुबोध ज्ञानेश्वरी वाचील व जो मूळ वाचणार नाही त्याला ज्ञानेश्वरीची शपथ आहे!"**

संगम पाहायला मिळतो. जाज्वल्य गुरुभक्ती आणि नम्रता ज्ञानेश्वरीत अगदी पानोपानी आढळते. गुरुला ते माऊली म्हणून संबोधतात आणि बालपण आपल्याकडे घेतात. ज्ञानेश्वरांच्या गुरुभक्तीचे रहस्य कळले तर ज्ञानेश्वरीच्या काव्यसौंदर्याचा खराखुरा आस्वाद घेणे सोपे जाते. गुरुभक्तीचा ओलावा स्पष्ट करताना आपल्या हृदयातील परमेश्वर हा आपला सद्गुरुच आहे, असे ते मानतात. त्यांची काव्यसृष्टी अलौकिक आहे. ज्ञानेश्वरीत प्रथमपासूनच ज्ञानेश्वर जे आपल्या हातून घडते आहे ते श्री गुरुच्या कृपेने घडते आहे, असे सांगत आहेत. गुरुभक्तीच्या विपुल प्रेमाचा हा आविष्कार आहे. ते श्रीकृष्णाच्या जागी निवृत्तीनाथांची स्थापना करून, संपूर्ण गीतामृताच्या आस्वादाचे अमर्याद सुख आपल्यासारख्या सामान्यजनांना देतात.

'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ एका वाचनात कळणारा सहजसाध्य ग्रंथ मुळीच नव्हे. कित्येक पारायणे करूनही तो महान ग्रंथ आकलन होत नसल्याचा कित्येकांचा अनुभव आहे. पारायणेच्या पारायणे केल्यानंतरही त्याचा अर्थ नीटसा कळला नाही तरी त्याची गोडी तसूभरही कमी होत नाही. वेदांचा अर्थ जरी आपल्याला कळत नसला तरी वेदघोष ऐकताना आपण तल्लीन होऊन जातो, भारावून जातो, तसेच ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या अर्थाचे पूर्णपणे आकलन झाले नाही तरीही त्याकडे आपण आकर्षिले जातो, आणि ते आकर्षण सतत वाढत जाते. नुसत्या वाचनाने, श्रवणाने जर आपल्याला एवढा आनंद मिळतो तर ज्ञानेश्वरीचे आकलन झाल्यास काय बहार येईल, हा उद्देश समोर ठेवून कै. श्री. य. गो. जोशी यांनी 'सुबोध ज्ञानेश्वरी'ची रचना केली. प्रपंचातील संकटांच्या मालिकेत पूर्णपणे अडकून पडल्यावर जेव्हा त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मनुष्याला दिसत नाही तेव्हा हे आयुष्य जगण्याचाही त्याला वीट येतो, त्याच काळात सुदैवाने जर त्याला ज्ञानेश्वरी किंवा दुसऱ्या एखाद्या प्रासादिक ग्रंथाचा आधार मिळाला तर त्याचे ते नीरस, कंटाळवाणे, दुःखद आयुष्य त्या क्षणीच सरते आणि तो पुन्हा नव्याने जगायला सुरुवात करतो. हा अप्रतिम, विलक्षण अनुभव कै. श्री. य. गो. जोशींनी स्वत: अनुभवला आणि ते भारावून गेले. ते इतके भारावले की कित्येक वर्षांपूर्वीची बारीक-सारीक वस्तूदेखील त्या क्षणापासून त्यांना नवीन वाटू लागली. वाटले, आपणही आता काही निराळेच झालो आहोत. सगळीकडे त्यांना नवीनता आणि आनंद दिसू लागला. त्या स्वानंदरसात ते न्हाऊन चिंब झाले आणि त्याच आवेगात मनाने कैक वर्षे मागे गेले. त्यांनी तेराव्या शतकात, ज्या शतकात ज्ञानेश्वर माऊलीने आपली गीतेवरील भावार्थ दीपिका लिहिली, त्या शतकात प्रवेश केला. ते नेवासे गावातील त्र्याहत्तर वर्षाचे श्रीहरि नावाचे वृद्ध बनले. गावातील श्री शंकराच्या देवळात लोकांच्या आग्रहावरून स्वत: श्री ज्ञानेश्वर माऊली आपली गीतेवरील ओवीबद्ध टीका आज श्रोत्यांना गद्यात सहजसुलभ करून सांगण्यास स्थानापन्न झाले आहेत. त्यांची इतर भावंडेही त्यांच्या आजूबाजूला बसली आहेत. ज्ञानेश्वरांच्या तेजस्वी, भव्यदिव्य मुखातून....

"ॐ नमो जी आद्या".... हे मंगलाचरण बाहेर पडते आहे. हे सर्व त्यांनी पाहिले आणि अनुभवले. श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या मुखातून त्यांनी संपूर्ण ज्ञानेश्वरी ऐकली आणि आयुष्याचे सार्थक करून घेतले. हा लोकविलक्षण अनुभव, जो त्यांनी प्रत्यक्ष 'याचि देही याचि डोळा' पाहिला, अनुभवला, ऐकला तो त्यांनी जशाचा तसा कागदावर उमटविला आणि यातूनच 'सुबोध ज्ञानेश्वरी'चा जन्म झाला. त्या काळातील वयोवृद्ध हरि हा तत्कालीन सामान्यजनांचे प्रतीक होते; असेच नव्हे, तर जोपर्यंत ज्ञानेश्वरीचे अस्तित्व आहे तोपर्यंत त्यांचेही अस्तित्व अबाधित आहे. लेखक ज्ञानेश्वरीच्या कमलरूपी अध्यायांची एकेक पाकळी हळुवारपणे उलगडून त्यातील सौंदर्यविश्व, भावविश्व अधिकाधिक खुलवून सांगत आहे, हे लक्षात येते. त्या काळात विहार करीत असताना अर्थातच ते संसारी पुरुष होतात आणि मुले, सुना, नातवंडं, शेजारी-पाजारी आणि इतर यांच्यात रमत असतानाच ज्ञानेश्वरांकडून त्यांच्या मुखातून उद्धृत होत असलेल्या ज्ञानामृताचा आस्वाद घेत असतात. त्याचवेळेस निसर्गाशी एकरूप होत असतात, ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेने अक्षरश: भारावून जातात आणि स्वप्नातही त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात.

रोज शंकराच्या देवळात ज्ञानेश्वरांचे प्रवचन ऐकायला जावे आणि त्या विश्वात देहभान विसरावे आणि भानावर आल्यावर घरची, संसाराची आठवण यावी, असे श्रीहरिचे होत असे. ज्ञानेश्वरांनी मंगलाचरणापासून ज्ञानेश्वरीस सुरुवात केली. ज्ञानाच्या मूळारंभाला, ॐ ला, विघ्नेशाला प्रथम वंदन करून आरंभ केला. ज्ञानेश्वरी सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वीचे वातावरण कै. श्री. जोशींनी इतके अप्रतिम उभे केले आहे की आपण नकळत त्या काळात, त्या विश्वात कधी जाऊन पोहोचतो ते आपले आपल्यालाच कळत नाही. प्रत्येक अध्यायात कै. श्री. जोशी यांनी ज्ञानेश्वरांच्या मुखातून निघालेल्या ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा अर्थ कधी गोष्टीरूपाने, कधी चर्चात्मक पद्धतीने, तर कधी विवेचनात्मक रीतीने सहज-सोप्या भाषेत समजावून दिला आहे. भाषा अत्यंत साधी, सोपी, सहज कळणारी आणि त्यांचे ज्ञानेश्वरीवरील प्रभुत्व सिद्ध करणारी अशी आहे. श्री. जोशींच्या साहित्याबद्दल आमच्यासारख्यांनी काय बोलावे? साहित्याचे शुद्ध, स्वच्छ, निर्मळ स्वरूप त्यांच्या लिखाणात ठायीठायी दिसून येते. मनाच्या निर्मळतेशिवाय हे शक्यच नाही. त्यामुळेच सुबोध ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्द न् शब्द आपोआपच चित्ताकर्षक बनला आहे. ज्ञानेश्वरीच्या विविधांगांचा अभ्यास करताना लेखकाने स्वत: केलेले सखोल संशोधन आणि त्यानुसार मांडलेले आपले अत्यंत समर्पक आणि बोधप्रद विचारही आपल्याला या ग्रंथात वारंवार आढळतात. उदाहरणार्थ: अर्जुनाची श्रीकृष्णाच्या ठिकाणी परमभक्ती होती आणि भक्तीच्या पोटी जी आपुलकी आणि श्रद्धा निर्माण होते, तिचे चमत्कार अलौकिक असतात किंवा अध्याय ४ मधील श्रीहरि व त्रिंबकभटांचा संवाद. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ही वाक्ये ज्ञानेश्वरीतील ओव्यांप्रमाणेच हृदयावर कोरून ठेवावी, अशी सुंदर आहेत.

ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती, त्यांचा आत्मविश्वास, कृतज्ञतेची भावना, नम्रता, आर्जव, तपश्चर्या, त्यांचे वाक्‌चातुर्य, संस्कृत आणि प्राकृत दोन्ही भाषांवरील प्रभुत्व, त्यांचा शांतरसपूर्ण शब्दविलास ह्या सर्वांचा अनुभव आपण सुबोध ज्ञानेश्वरीत जरूर घेतोच, इतकेच नव्हे, तर तत्वज्ञान सांगताना चिंतनशील शब्दप्रभू श्री ज्ञानेश्वरांचा गंभीर भावही आपल्याला सुबोध ज्ञानेश्वरीत सहज जाणवतो. पहिल्या

अध्यायातील श्री गणेशापासून शेवटच्या अध्यायातील पसायदानापर्यंत विवेकाचा महिमा ज्ञानेश्वर सांगत आलेले आहेत. ज्ञानेश्वरीतील उपमा आणि दृष्टान्त हे व्यवहारातील उदाहरणे देऊन स्पष्ट केलेले आहेत. ज्ञानेश्वरांचा सिद्धान्त समजावून देण्याकरिता जो दृष्टान्त दिलेला आहे तोही एक सिद्धान्तच होतो आणि एखाद्या सिद्धांताचा अर्थ सांगताना संसारातील काही खुणेच्या गोष्टी सांगून तो वाचकाच्या मनावर बिंबवायचा, ही लेखकाची हातोटी उत्कृष्ट आहे. ज्ञानेश्वरीत धर्म आणि नीती यांच्या संबंधांचा सुरेख समन्वय साधला गेला आहे. यात भक्तीचे माहात्म्य तर सांगितले आहेच, त्याचबरोबर त्याचे विशाल स्वरूपही उघड केले आहे. प्रेमाचा उदय झाला की परमेश्वर भेटलाच पाहिजे, असे ठाम प्रतिपादन केलेले आहे. कै. श्री. जोशींनी ज्ञानेश्वरी सुबोध करताना ज्ञानेश्वरीतील सर्व कंगोऱ्यांचा पूर्ण विचार केला आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरांना ज्ञानेश्वरीत जे काही सांगावयाचे आहे ते सर्व जसेच्या तसे सुबोध ज्ञानेश्वरीत सोप्या व समर्पक भाषेत लेखकाने मांडलेले आपल्याला आढळून येते.

शेवटचे पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीचे सर्वोच्च शिखर होय! लेखकानेही हा अध्याय सर्वांगसुंदर केला आहे. लेखकाच्या प्रतिभेचा आविष्कार आणि अध्यात्मातील अधिकार यात जागोजागी आढळतो. भक्तिमान आणि श्रद्धावान अंत:करणात प्रतिभेचे हे विलक्षण स्वरूप परमेश्वरच घडवून आणत असतो नाही का! मोजक्या शब्दांत म्हणायचे झाले तर 'सुबोध ज्ञानेश्वरी' म्हणजे लेखकाला 'ज्ञानेश्वरी' वाचताना झालेला आत्मसाक्षात्कार आहे.

'सुबोध ज्ञानेश्वरी'चे लेखक कै. श्री. य. गो. जोशी यांचे गुरुवर्य श्री. शंकर वामन (मामा) दांडेकर प्रास्ताविकात म्हणतात....

सामान्य जनापर्यंत ज्ञानेश्वरी नेण्याचे आतांपर्यंतचे प्रयत्न म्हणजे कठीण शब्दांचे कोश देणें, त्यांच्या पुढचा म्हणजे ओव्यांचा संपूर्ण अर्थ देणें, अर्थाचें विवरण करणें, गद्यांत भावार्थ मांडणे वगैरे. पण ज्ञानेश्वरीचा प्रसार करण्याचा जोशीबोवांचा एक अभिनव प्रयत्न आहे. त्यांची रीत आगळीच आहे व ती त्यांनाच श्री ज्ञानोबांच्या कृपेनें साधून गेली आहे.

'सुबोध ज्ञानेश्वरी' हा ज्ञानेश्वरीचा अर्थ नव्हे. ही एका थोर साहित्यिकाच्या बुद्धीतून अवतरलेली ज्ञानेश्वरीची कथा आहे. ती कथा असल्यामुळें तींत कथाप्रसंग दाखविणारी चित्रें आहेत. प्रापंचिकांच्या अनुभव सांगणाऱ्या घरगुती गोष्टी आहेत; श्रीहरि आहे, वहिनी आहेत, पांडोबा आहेत, मुली–मुलगे आहेत. एवढेंच नव्हे तर गीता–ज्ञानेश्वरीतील अभिप्राय वाचकांच्या मनावर उमटावेत म्हणून त्या त्या प्रसंगानुसार गीता, ज्ञानेश्वरीचा अभिप्राय व्यक्त करणारी चित्रें घातली आहेत. अहिंसा, तप, विभूतिं इत्यादि विषयक उत्तम चित्रें आहेत. गणपतीचें व निवृत्तिनाथादि चार भावंडांचे चित्र आहे. श्री. दीक्षितांच्या या चित्रांमुळे तिला एक आगळें, वेगळें रूप प्राप्त झालें आहे. 'सुबोध ज्ञानेश्वरी' म्हणजे आधुनिक पोषाखांतील ज्ञानेश्वरीचा कथारूपी गद्यावतार आहे.

मी एवढेंच म्हणतो की, जोशीबोवांनी श्री ज्ञानोबा माउलीची ही जी सेवा प्राण समर्पून केली ती माउलीला मान्य होऊन तिच्या ग्रंथराजाकडे दिवसेंदिवस जगाचें लक्ष लागो व त्याच्या वाचनश्रवणानें जग सुखाच्या राशीवर जाऊन नांदो!

"आणि ग्रंथोपजीविये। विशेषी लोकी इयें। दृष्टादृष्ट विजयें। होआवें जी॥ येथ म्हणे विश्वेशरावो। हा होईल दानपसावो। येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला॥"

'सुबोध ज्ञानेश्वरी' सुरुवातीला प्रसाद मासिकातून क्रमश: प्रसिद्ध झाली. त्यानंतर १९६२ साली तिची ग्रंथरूपाने प्रथमावृत्ती प्रकाशित झाली. त्यावेळी ती तीन वेगवेगळ्या भागांत प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रथम भागात १ ते ६ अध्याय, द्वितीय भागात ७ ते १२ अध्याय व तृतीय भागात १३ ते १८ अध्याय असा समावेश करण्यात आला होता. तत्पश्चात् सर्व, म्हणजेच १ ते १८ अध्यायांचा एकाच ठिकाणी अंतर्भाव करून ६८० पृष्ठांचा एक स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. 'सुबोध ज्ञानेश्वरी'ची अलीकडील १९९३ मधील आवृत्ती ही तिची ६ वी आवृत्ती आहे. पुस्तकाची मांडणी अभ्यासाला अत्यंत सोपी जावी अशा रीतीने केलेली आहे. त्याची बांधणी देखणी व उत्कृष्ट आहे. ग्रंथाची छपाई करतानाच्या तांत्रिक बाजू वेळोवेळी उत्तम सांभाळल्याने ग्रंथ ठाशीव व आकर्षक झालेला आहे. प्रत्येक अध्यायात त्या त्या संदर्भानुसार सुंदर चित्रेही दिलेली आहेत. ती लक्षवेधी चित्रे पाहून लहान मुलालादेखील यात काय आहे ते वाचण्याची उत्सुकता वाटावी.

कै. श्री. य. गो. जोशींसारख्या थोर लेखकाच्या हातून घडलेला हा अप्रतिम आविष्कार म्हणजे ज्ञानेश्वरीच्या अभ्यासू वाचकांसाठी एक वेगळे मोल आहे. सुरेख, सविस्तर आणि समर्पक असे संशोधन करून लेखकाने 'सुबोध ज्ञानेश्वरी'चे अभ्यासमूल्य अधिक वाढविले आहे. हा ग्रंथ सर्व स्तरातील लहान-थोरांना सहज समजण्याजोगा असल्याने तो संग्रही ठेवून त्याचे नित्य वाचन, मनन, चिंतन करावे, असे कुणाही आध्यात्मिक वाचन करणाऱ्या सुज्ञ वाचकाला नक्कीच वाटेल, एवढी अलौकिकता या ग्रंथात आहे.

ग्रंथाचे नाव : सुबोध ज्ञानेश्वरी
लेखक : कै. श्री. य. गो. जोशी
प्रकाशक : मनोहर य. जोशी
प्रसाद प्रकाशन,
१८९२, सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०.
पृष्ठे : ६८०
मूल्य : रु. २५०

## श्री साईभक्तांना सूचना

**श्री साईबाबा संस्थान, शिरडीला अर्पण करण्याची देणगी रक्कम, आपण युनियन बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत विना-बँक-आकार जमा करू शकता. आपली रक्कम श्री साईबाबा संस्थान, शिरडीकडे जमा होऊन आपणास संस्थानमार्फत पोच-पावती व उदी-प्रसाद पाठविण्यात येईल.**

– कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

**'श्री साईलीला'कडून आपल्या काय अपेक्षा आहेत? आपले मत अवश्य कळवा! योग्य सूचनांचा निश्चितच स्वीकार केला जाईल.**

## जुन्यातलं सोनं

# स्वप्नसृष्टि

स.न.वि.वि.

स्वप्नाचे दाखले अनेकांना अनेक आले असतील किंवा येत असतील; परंतु ते कोणी काळजीपूर्वक लिहून ठेविलेले नसतील; कारण स्वप्न तें स्वप्नच; म्हणजे मिथ्या, असें समजून त्याच्या खरेखोटेंपणाविषयीं कोणी विचारच करीत नसतील. नेहमीं असें पाहाण्यांत येतें कीं, स्वप्नें हीं बहुतेक आगापिछा नसलेलीं पडतात. म्हणजे त्यांचा व्यवस्थित आरंभ व शेवट नेहमीं होतोच असें नाहीं. कांहींतरी भास होऊन मध्येंच मनुष्य एकदम जागा होतो, व त्याला कोणी विचारलें कीं, ''तुला काय स्वप्न पडलें,'' तर तें त्याला सुसंगत सांगतां येत नाहीं. कांहींतरी अशा अशा तऱ्हेचें स्वप्न पडलें, एव्हढेंच तो सांगू शकतों. त्या स्वप्नाला कांहीं मेळ नसतो व अर्थही नसतो. ''मनीं वसे तें स्वप्नीं दिसे,'' अशी म्हण आहे, परंतु तीही खरी ठरत नाहीं. एखादे वेळीं कित्येक वर्षांत जें मनांत कधीं आलें नाहीं त्या संबंधाचें स्वप्न पडतें. असें जरी असलें, तरी एखादे वेळीं जें स्वप्न पडतें, तें अर्थपूर्ण असतें व त्याचा प्रत्यय आला म्हणजेच त्याला कांहीं अर्थ होता, अशी खात्री पटते आणि मग परमेश्वर साक्षात्कार तो हाच, अशी भावना होते. असे साक्षात्कार आपल्या आयुष्यांत वरचेवर येत गेल्यास परमेश्वराविषयींची भावना दृढ होऊन त्याच्या चरणीं जास्त जास्त श्रद्धा जडत जाते. त्या श्रद्धेच्या योगानें कर्ता-करविता एक परमेश्वरच आहे, असें वाटूं लागतें. असें वाटूं लागल्यावर देहाहंकार हळूहळू कमी होत जातो. देहाहंकार जसजसा कमी होत जातो, तसतसें असें वाटूं लागतें कीं, फलाशा सोडून आपलें विहित कर्म करीत राहाणें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे. अशा रीतीनें तो श्रद्धावान् मनुष्य थोडथोडा निरिच्छ होत होत मोक्षमार्गाला लागतो, अशी लेखकाची समजूत आहे.

लेखकाला अनुभवजन्य दोनतीन स्वप्नें आठवत आहेत, त्यांपैकीं एक आपल्याकडे लिहून पाठवीत आहे.

### स्वप्नाची हकीकत

लेखक १९०२ सालीं चाकरीच्या निमित्तानें पुण्यास राहात असतांना त्याला ज्वर येऊं लागला. ज्वर सारखा ५ दिवस कमीजास्त प्रमाणांत होता. त्या ज्वरांतील मुख्य दोष म्हणजे लेखकाला अतोनात तृषा लागे. पांचवें दिवशीची रात्र फारच भयंकर गेली. तृषा अतिशय वाढली. पांचपांच मिनिटांत घोटघोट पाणी प्यावें तरी घसा कोरडा तो कोरडाच. अंगाची सारखी लाही होत होती. डॉक्टरानें थोडथोडें पाणी पिण्यास सांगितलें होतें. अशा रीतीनें रात्र एकदांची केव्हां संपते हें समजण्याकरितां सारखें घड्याळ पाहात राहावें, असें करतां करतां लेखकाचा पहांटे ४ वाजण्याच्या सुमारास जरा डोळा लागला, आणि तेवढ्याच वेळांत एक स्वप्न पडलें. एक भगवीं वस्त्रें परिधान केलेला संन्यासी लेखकाच्या समोर उभा आहे, व त्याला सांगतो आहे कीं, ''तूं इतक्या काळजींत कां पडलास? पोटभर पाणी प्याल्यावांचून तहान शमन होणार नाही. गंगामाई जवळ आहे. स्वच्छ ताजें पाणी वाटेल तितकें पी! भिऊं नको.'' इतकें ऐकून लेखक जागा झाला, व त्यानें तें स्वप्न आपल्या बायकोला सांगितलें. तिला तसें करणें बरें वाटलें नाहीं; परंतु काय असेल तें असो, या स्वप्नावर लेखकाचा इतका विश्वास बसला कीं, त्या वेळीं जरी त्याच्या अंगांत ताप १०३ डिग्री होता, तरी डॉक्टरच्या सांगण्याकडे लक्ष न देतां, एकदम त्यानें बायकोला सांगितलें कीं ''परसांतील विहिरीची एक ताजी घागर भरून आण व मला वाटेल तितकें पाणी पिण्यास दे!'' त्याप्रमाणें बायकोनें ताजी घागर भरून आणली व लेखक त्यांतील सुमारें चार पंचपात्र्या पाणी प्याला. पाणी प्याल्याबरोबर त्याला जरा हुषारी वाटूं लागली, व कांहीं वेळानें दरदरून घाम येऊन सकाळीं त्याचा ताप निघाला, तो पुन्हां आला नाहीं. नंतर दोनचार दिवसांत लेखक चांगला खडखडीत बरा झाला. तेव्हां या स्वप्नामुळें लेखकाची मति गुंग होऊन गेली, व श्री दत्तमहाराज आपल्या अतर्क्य सामर्थ्यानें निजभक्तांचें ऐन वेळीं कसें संरक्षण करतात हें पाहून लेखकाच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले व अतिशय धन्यता वाटली. या स्वप्नांत पाहिलेली मूर्ति लेखकाला आठवण झाली म्हणजे अद्याप जशीच्या तशी दिसते.

वांई, ता. २६/२/३२ —श्री दत्तसेवक
बाबांचा भक्त

### साईभक्त मंडळाच्या सभासदांना निवेदन

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी साईभक्त मंडळाचे आश्रयदाता सभासद, आजीव सभासद व सामान्य सभासद यांना या निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, आपण संस्थानच्या दफ्तरी दिलेला पत्ता बदललेला असल्यास श्री साईबाबा संस्थान, शिरडी येथील कार्यालयाला आपला आश्रयदाता सभासद क्रमांक/आजीव सभासद क्रमांक/सामान्य सभासद क्रमांक नमूद करून आपला बदललेला नवीन पीनकोडसहित पूर्ण पत्ता त्वरित कळवावा. म्हणजे संस्थानला आपल्या नवीन पत्त्याची नोंद घेऊन आपल्या नवीन पत्त्यावर उत्सव-निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद, दैनंदिनी पाठविणे सोईचे होईल. बदललेल्या पत्त्याची नोंद करण्याची काळजी आपण घेतली नाही तर आपले नाव कमी होण्याची शक्यता आहे, याची सर्व संबंधित साईभक्तांनी नोंद घ्यावी, ही विनंती.**

**– कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

**पुढील अंकापासून खास वाचकांसाठी आम्ही 'विचार-मंथन' हे सदर सुरू करीत आहोत. या सदरात वाचकांनी विचारलेले आध्यात्मिक विषयासंबंधीचे प्रश्न प्रसिद्ध करण्यात येतील. त्यावर वाचकांनीच आपले विचार मांडायचे आहेत. योग्य विचारांना प्रसिद्धी देण्यात येईल. जानेवारी ते डिसेंबर अशा वर्षभरात 'विचार-मंथन'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या प्रश्नांपैकी एका उत्कृष्ट प्रश्नाला व त्यावरील समर्पक विचाराला दरवर्षी साईप्रसादाच्या रूपाने पारितोषिक देण्यात येईल. येथे विशेषकरून विचारला जाणारा.... 'सबुरी' म्हणजे नेमके काय?.... हा प्रश्न देत आहोत. याबाबतचे विचार वाचकांनी लवकरात लवकर 'श्री साईलीला'कडे पाठवावेत.**

**जो दीनदुबळ्यांची, गोरगरीबांची, दरिद्रीनारायणाची, अनाथ-अपंगांची निरलस सेवा करतो, तोच खरा 'साईभक्त', तीच खरी 'साईभक्ती'.**

# कुरवपूर

–श्री. सुहास जोशी
शिरूर, पुणे.

'कुरवपूर' हे दत्तक्षेत्र 'कुरुगड्डी' या नावाने प्रसिद्ध आहे. आंध्रप्रदेशातील 'कृष्णा' स्थानकापासून सुमारे ३० कि.मी. अंतरावर कर्नाटकात ते एका बेटावरच वसलेले आहे. श्रीपाद श्रीवल्लभ या दत्तावताराचे हे तप:स्थान असून येथील एका गुहेत त्यांच्या पादुका व शिवलिंग आहे. गुरुद्वादशीला येथे मोठी यात्रा भरते. प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी आपला एक चातुर्मास येथे केला होता.

रायचूर जिल्हा व तालुका यांतील हे एक खेडे आहे. पूर्वी हे बरेच मोठे गाव होते. ३ कि.मी. रूंद अशा कृष्णाप्रवाहात १॥ कि.मी. लांब व पाऊण कि.मी. रूंद अशा या बेटात एका टोकास श्री श्रीपाद दत्तमंदिर व दुसऱ्या टोकास गाव व मध्ये शेतं आहेत. वल्लभेशाने सहस्त्रजणांना इच्छाभोजन देण्याचा आपला नवस श्रीपाद-अवतार-समाप्तीनंतरही केला, यावरून हे गाव बरेच मोठे असावे. (प्रा. डॉ. प्र. न. जोशी)

या क्षेत्रात प्रतिदिन पहाटे, दुपारी व रात्री नौबत व चौघडा यांचे वादन होते. नौबतखान्याचे बांधकाम इंदूरच्या महाराणी सौ. इंदिराबाईसाहेब होळकर यांनी करविलेले आहे. त्याच्या कायम खर्चाचीही व्यवस्था त्यांनी केलेली आहे.

प. पू. श्री वामनराव गुळवणी यांनी प्रकाशित केलेले प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्बेमहाराज यांचे सर्व ग्रंथ येथील ग्रंथालयास भेट दिलेले आहेत. येथील ग्रंथालयाचे नाव आहे 'श्रीपाद श्रीवल्लभ ग्रंथालय'.

येथे प्रमुख असे १० उत्सव संपन्न होतात. (श्री. वि. के. कुलकर्णी हत्तरवाटकर)

येथील कृष्णेचे पात्र अत्यंत खडकाळ व प्रचंड शिळांनी परिपूर्ण असे आहे. पूर्वी तर ही यात्रा फारच कठीण असे.

आगगाडीने रायचूर येथे आल्यावर तेथून कुरुगड्डीस जाण्यास बसेस मिळतात.

रायचूर-गद्वाल बसने यापलदिन्नी गावालगत उतरावे लागते. तेथून अतकूर खेड्यात यावे लागते. तेथे उत्तरादी मठाच्या स्वामींच्या समाध्या आहेत. येथून चार फर्लांगांवर कृष्णाकाठ आहे. रायचूर अलीकडील कृष्णा स्थानकावरूनही येथे येता येते. त्यासाठी जवळच्या वसुपल्ली खेड्यातून जावे लागते.

भागानगर किंवा हैद्राबाद येथूनही या तीर्थक्षेत्री येता येईल. त्यासाठी देवरकद्र या स्थानकावर उतरावे लागेल. तेथून मुदव्तल, तेथून पंचदेव-पाट वा पंचपाड व तेथून कृष्णा पार करून कुरवपूर!

वाटेत जवळच श्रीपादगुण्ड म्हणून ओळखली जाणारी एक मोठी शिळा आहे. तेथेच पादुका आहेत. भोवती सुंदर मंदिर आहे. पुढे सभामंडप आहे. वल्लभेशाला चोरांनी ठार केले व श्रीपाद श्रीवल्लभांनी प्रगट होऊन चोरांना मारून वल्लभांना जिवंत केले, तेच हे ठिकाण होय! (आधार– श्री दत्तात्रेय ज्ञानकोश– प्रा. डॉ. प्र. न. जोशी), श्री. वि. के. कुलकर्णी हत्तरवाटकर, भारतीय संस्कृतिकोष– पं. महादेवशास्त्री जोशी, दत्तसंप्रदायाचा इतिहास– डॉ. रा. चिं. ढेरे)

---

**संत भाऊराव कुंभार यांना शिरडीतील लोक 'भाऊ' किंवा 'भावड्या' म्हणत असत. हे गुप्त संत होते. त्यांची वृत्ति निरिच्छ होती. मनास आल्यास अन्न, कपडा किंवा दक्षिणा मागत. कोणी दिल्यास घेतच असें नाहीं. दिलेले पदार्थ कांहीं वेळ स्वत:कडे ठेवीत व नंतर कुत्र्यास, गाढवास, भिकाऱ्यास वाटून टाकीत असत.**

---

काही अपरिहार्य कारणांमुळे 'श्री साईलीला'चे गेले काही अंक आपल्याला उशिरा मिळत आहेत, याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. आपल्याला ते लवकरच वेळेवर मिळावेत यासाठी आम्ही आपणा सर्वांच्या सहकार्याने प्रयत्नशील आहोत. 'श्री साईलीला' हे नियतकालिक आपलं आहे, आपणा सर्वांचं आहे. त्याच्या व्यापकतेसाठी आपण सर्वांनी हातभार लावू या!

---

अनेक साईभक्तांनी 'श्री साईलीला'चे पाच व पाचपेक्षा अधिक वर्गणीदार बनवून 'श्री साईलीला'तील आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

---

ज्यांना आध्यात्मिक लिखाणाचा अनुभव आहे व जे आध्यात्मिक लिखाण करू इच्छितात, त्या सर्व साईभक्तांच्या लेखनाचे स्वागत आहे.

---

कधी कधी आपण अशा काही विलक्षण घटना अनुभवतो, पाहतो, ऐकतो, वाचतो ज्या केवळ मती गुंग करणाऱ्या असतात, अतर्क्य असतात, तर्काच्या पलीकडील असतात. अशा वेळी आपल्या तोंडून नकळत सहज उद्गार निघतात....

काय हा चमत्कार! याला म्हणावे तरी काय!.... अशा घटनांना 'तर्कापलीकडे' या सदरांतर्गत 'श्री साईलीला'त प्रसिद्धी दिली जाणार आहे. वाचकांनी त्यांनी अनुभवलेल्या, पाहिलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या घटना 'श्री साईलीला'कडे जरूर पाठवाव्यात.

# ''नामरूपाने झाले अवतीर्ण जगी।
# साई स्वयं श्री भगवान-अवतारी॥''

-श्री. वि. म. हटवार
नागपूर.

परमात्म्याचे स्वरूप सत्य, शिव व सुंदर आहे. जीवनाचे लक्ष सत्य-दर्शन करण्याचे आहे, हे जाणून प्रपंच व परमार्थ विचार, वाणी आणि व्यवहाराने सत्य असावा. असे आचरणाने बुद्धी शुद्ध, वाणी प्रेमळ आणि दैवीवाणीप्रमाणे सत्य होते. सत्य केवळ चिन्मय आत्मतत्वाची ओळख करून देणारे असून शक्तिदायक तत्वांनाही प्रेरक आहे, देहभावाचे निरसन करून आत्मभावाने आत्मानुसंधान करणारे आहे, तेच एकमेव सत्य आहे.

आत्मज्ञानी कोणाचाही दोष पाहत नाही. दुसऱ्यांचे दोष पाहून सांगणे यापेक्षा स्वत:चे दोष दुरुस्त करणे हितकारक आहे. सर्वांवर सारखे प्रेम करणे फार कठीण असले तरी त्यामुळे वेळप्रसंगी आपल्या कार्यास चांगले वळण मिळते. श्री साईनाथ कधी कधी उग्ररूप धारण करीत, पण अंतस्थ हृदयात सर्वांचे भले व्हावे, हा भाव शेवटपर्यंत कायम राहिला, कधीही दुजाभाव दिसला नाही. लोकांचा भ्रम घालवून, देवाविषयी श्रद्धाभाव उत्पन्न करून शिरडी क्षेत्र जागविले. मशिदीत व देवळांतून दिवे लावणे, हे कार्य जरी सर्वसाधारण असले तरी त्याचे महत्त्व असाधारण व समतेचे होते. सत्य जाणल्याशिवाय या आध्यात्मिक क्षेत्रात समभाव निर्माण होत नाही. ह्या दिव्यांसाठी घरोघरी व दुकानात जाऊन तेल मागताना अवलिया समजून बाबांना लोकांनी काही दिवस तेल दिले. व्यवहारी माणसे नेहमीकरिता कोणतीही वस्तू देताना विचारच करतात. एक दिवस सर्वांनी श्री साईबाबांस तेल नाही, असे सांगितले. विवेक बुद्धी असेल तर खरे वा खोटे जाणण्यास वेळ लागत नाही. श्री साई महाराजांनी नित्यक्रम चालू रहावा, या एकाच उद्देशाने सत-चित्-आनंद परमेश्वरास स्मरून, पणत्या एकत्र गोळा करून त्यांत तेलाऐवजी पाणी घातले आणि आश्चर्यचकित होऊन सर्वांनी पाहिले की अग्नीचा स्पर्श करताच दिव्यांच्या ज्योती पेटू लागल्या. रात्रभर प्रज्वलित राहिलेले दिवे पाहून लोकांच्या भावना दोषविरहित होऊन, सत्यास सर्वजण शरण आले. महाराजांस आमची चूक झाली, क्षमा करा, असे विनवू लागले. भाविक सज्जनांच्या मनातील अंध:कार दूर होऊन ज्ञानाचा प्रकाश पडला. त्या प्रकाशाने जे मोलाचे कार्य केले त्याचे फळ आपण सर्व साईभक्त चाखतो आणि शिरडीस्थळी जावून समाधीसमोर नम्र होतो. या सत्यदर्शनास जाणणाऱ्या भक्तांना अपकार करणाऱ्यांचीही उपेक्षा करावयाची आजपर्यंत गरज भासली नाही. जो मनुष्य दुसऱ्यांची उपेक्षा करतो त्याच्याकडून कोणतीही अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाही, कोणाचेही भले होणार नाही, उलट असे दांभिक लोक इतरांच्या नैतिकतेला आव्हान करतात आणि समाजात सर्वांसमोर आपले अज्ञानाचे प्रदर्शन करतात.

श्री साईरामाची लीला मोठी विचित्र आहे. भगवंताचा साईबाबा अवतार, 'सर्वधर्मसमभाव' आणि 'सबका मालिक एक' ह्या विचारांनी सर्व जगातील भाविक भक्त मोहित झालेत. भगवंताचे देहधारी साईरूप पूर्णानंदमय आहे. साईप्रेमी साईभजनात नित्य तल्लीन झालेले दिसतात. श्री साईरामाच्या आरतीला असंख्य स्त्री-पुरुष जमतात.

परमपिता श्री साईरामाने जगतावर परम अनुग्रह करण्यासाठी स्वयंप्रकाशी, भक्तांच्या कल्याणाकरिता मोहक रूप धारण केले. आपण देहधारी अवतारातील वाणीचे अगोचर परमपुरुष भूत व भविष्य जाणणारे आहात. स्वत: एकटेच बहुरूपमयी मायेच्या आश्रयाने कार्य, कारण, कर्तृत्व, फल व साधना यांच्या भेदाने अनेक रूपांत भासमान होतात. आपण निर्मल, नित्य, शुद्ध व सत्यस्वरूप आहात. साईभक्तगण अनन्यभावाने आपणास विनम्र नमस्कार करतात. आज आपण कर्ता नाही, तरी आपणच कर्ता प्रतीत होता. आपण चालत नाही, तरी शिरडीच्या पवित्र प्रांगणातून चालताना प्रतीत होता. न पाहताही आपण आपल्या मोहक डोळ्यांनी पाहताना दिसता. आपला साक्षात्कार सुबुद्धीच्या व शुद्ध अंत:करणाच्या निष्ठावंतानांच होतो.


मुमुक्षू लोक श्री साईनाथाचे प्राण, बुद्धी, इंद्रिये व मनाने नित्य चिंतन करितात, त्या आपल्या चरणांस नमन असो. आपल्या समाधीमंदिरातील प्रतिमेच्या दर्शनाने भाविकांच्या अंत:करणातील दोषांचा नाश होतो. संसारग्रस्तांना आजच्या बिकट परिस्थितीतही साईनिष्ठेने समाधान प्राप्त होते.

मायेने जखडलेल्या कौटुंबिक जगातील विषयांच्या आसक्तीतून मनात वेगळा भाव निर्माण झाल्यास वैराग्याने मनुष्य दोषांतून मुक्त होतो व सत्यदर्शनाकडे दृष्टी वळते. देव, पितर व मानवतेच्या सेवेत दुर्लक्ष झाल्यास त्याचा अनिष्ट परिणाम भोगावा लागतो.

भक्तांचे श्रद्धापूर्वक जीवन आणि जगातील माननीय साधुसंतांचे आचरण यांचे अध्ययन केल्यास आध्यात्मिक ज्ञानप्राप्ती, हा भगवंताचा प्रसादच आहे. अध्यात्मयोग हे कल्याणाचे प्रमुख साधन आहे. मन प्रापंचिक कलहांतून मुक्त होऊन ऐहिक सुख-दु:खाची निवृत्ती झाली, तरच साधक आत्मज्ञानाने परमार्थाकडे वळतो. श्री साईबाबा - अवतारी संताने कित्येकांना भक्तिमार्ग दाखविला, पण स्वत:कडे कधीही मोठेपणा घेतला नाही. ''अल्ला भला करेगा'', असे म्हणताना मी परमेश्वराची, माझ्या परमपित्याची आठवण करतो, असे ते सांगायचे. श्री साई भक्तांना बोध व आनंद नित्य देत असत. साधकाची

(पृष्ठ क्र. ४४ वर)

# साकुरीच्या विश्ववंद्य परमपूज्य
# श्री गोदावरीमाताजी



बालपणी श्री उपासनी बाबांच्या सोबत गोदावरीमाताजी


शिरडीचे सुप्रसिद्ध संत श्री साईबाबा यांचे पूर्णकृपापात्र सत्शिष्य श्री उपासनीबाबा यांनी स्थापन केलेला श्री उपासनी कन्याकुमारीस्थान, साकुरी (जि. अहमदनगर) हा आश्रम शिरडीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर आहे. श्री उपासनीबाबा यांनी सत्शील महिलांना दीक्षा देवून वेदविद्या, यज्ञयाग या आपल्या पुरातन संस्कृतीची मोलाची ठेव जपून ठेवून, पुढे ती उत्तमरीतीने जोपासली जावी, या तळमळीने या स्थानाची स्थापना केली. श्री उपासनीबाबा सन १९४१ मध्ये समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या परमशिष्या श्री गोदावरीमाताजी श्री उपासनीबाबांच्या आज्ञेनुसार कारभार पाहू लागल्या.

श्री गजानन महाराज (शेगांव) यांच्या पूर्वसंकेतानुसार २४ डिसेंबर, १९१४ रोजी श्री. हातिवलेकर कुटुंबामध्ये श्री क्षेत्र शेगांव येथेच पूज्य माताजींचा जन्म झाला. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी त्या आपल्या मातोश्रींसह प्रथमच श्री उपासनीबाबा यांच्या दर्शनार्थ साकुरी येथे आल्या. या प्रथम भेटीतच आपल्या नियोजित सद्गुरूची खूणगांठ पटून त्या अविचल श्रद्धेने 'श्री-सेवा' करीत कायमच्याच तेथे स्थिरावल्या. अनेक अंगमेहनतीची, कष्टाची कामे करून सदैव प्रसन्न चित्ताने श्री सद्गुरुआज्ञेनुसार या स्थानाच्या कार्याशी त्या एकरूप झाल्या. योग्य ती साधना पूर्ण होताच श्री उपासनीबाबांनी त्यांना आपणाप्रमाणेच सद्गुरुपदी बसवून इतरांस त्यांचा अधिकार ते स्वमुखानेच सांगू लागले.

पूज्य श्री गोदावरीमाताजी यांनी संपूर्ण देशभरातून आलेल्या विविध प्रांत, भाषा व जातीजमातींच्या अनेक साधक महिलांना ब्रह्मचर्य, व्रतदीक्षा देवून वैदिक कार्यांत पारंगत केले. आश्रमातील सुमारे ५० ब्रह्मवादीनी कन्यांसह पूज्य माताजींनी देशाच्या विविध भागांत व परदेशांतही यज्ञयाग, वेदमंत्रपठण याद्वारे आश्रमाचे कार्य मोठ्या नेटाने सर्वत्र पोहोचविले.

आश्रमाचे हे उज्ज्वल कार्य सर्वजणांच्या कौतुकास पात्र ठरले. त्यावेळचे सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. नाथमाधव यांनीच सर्वप्रथम श्री उपासनीबाबांचे सत्यचरित्र लिहून जनतेस त्यांची खरीखुरी ओळख पटविली.

पूज्य श्री उपासनीबाबा, श्री गोदावरीमाताजी व कन्याकुमारीस्थान ह्या त्रयींविषयी अनेक संत-महंत व नामवंतांनी मोठ्या प्रेमाने प्रशंसोद्गार काढले आहेत. यांत प. पू. श्री शिवानंदस्वामी (हृषिकेश), स्वामी रामदास (कन्हानगड), श्री रंगावधूत (नारेश्वर), श्री संत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ति गाडगेबाबा, स्वामी स्वरूपानंद (पावस), श्री धर्मभास्कर पांचलेगांवकर महाराज, श्री गजानन महाराज (अक्कलकोट), श्री शंकराचार्य पीठाधीश (ज्योर्तिमठ व संकेश्वर), स्वामी चिन्मयानंद, ब्र. श्री डोंगरे महाराज,



श्री उपासनी कन्याकुमारीस्थान

श्री. पांडुरंगशास्त्री आठवले वगैरे अनेक अनुभवी जिज्ञासूंचा समावेश करता येईल.

पूज्य गोदावरीमाताजींचा व्याख्याने, प्रवचने यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतूनच इतरांस मार्गदर्शन घडविण्यावर विशेष भर होता. परस्परांशी प्रेमाने वागून, सदैव ईश्वराचे नामस्मरण करीत, आपापले कर्तव्यकर्म निष्ठेने पार पाडावे, देशाविषयी प्रेम ठेवून त्यानुसार आचरण करावे, हीच त्यांची शिकवण असे. नागपूर, सुरत, हैद्राबाद, सटाणा इत्यादी ठिकाणच्या आश्रमाच्या शाखांद्वारे वरील कार्याचा प्रसार केला जातो. साकुरीस्थानातील गो-रक्षणाचे कार्यही विशेष उल्लेखनीय असेच आहे.

साडेचार वर्षांपूर्वी पूज्य माताजींच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झाल्याने त्यांचा अमृतमहोत्सव ठिकठिकाणी मोठ्या आनंदाने सर्वत्र साजरा करण्यात आला होता. यानिमित्तानेच दिल्ली येथे पूज्य माताजींच्या प्रमुख नेतृत्वाखाली या स्थानातील कन्यामंडळींद्वारा विश्वकल्याणार्थ एका भव्य चंडीयागाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्यावेळचे भारताचे माननीय राष्ट्रपती श्री. वेंकटरमन् व उपराष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांनी आपापल्या निवासस्थानी पूज्य माताजींना खास निमंत्रित करून या स्थानाचा परिचय करवून घेतला. तसेच अतीव तळमळीने समक्षच वेदमंत्रपठणासंबंधी जिज्ञासा दाखवून प्रत्यक्ष त्या श्रवणाचा मोठ्या आस्थेने लाभ घेतला. साकुरीसारख्या खेड्यात कोणतीही धन-कीर्ति वगैरेंची अपेक्षा न ठेवता वैदिक संस्कृतीचे इतक्या उत्तमरीतीने संवर्धन होत असल्याबद्दल त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली.

परमपूज्य श्री गोदावरीमाताजींची भगवान श्रीकृष्णाच्या ठायी अत्यंत प्रीति होती. गोपीगीतासमवेत प्रेमपूर्वक चाललेली श्रीकृष्णाची नित्य पूजा, रूद्र-पवमान पठण करीत श्री सद्‌गुरुसमाधीस भावुकतेने चाललेला अभिषेक, तुलसीपूजन, गोपूजन व सूर्यनारायणास अर्ध्यप्रदान वगैरे प्रसंगी त्या महन्मंगल ईशतत्वाशी एकरूप झालेल्या पूज्य माताजींचे दर्शन कुणाही सत्साधकांचे मन मोहवून टाकणारे असेच असे. आश्रमामध्ये संक्रांत व गुरुपौर्णिमा फार मोठ्या प्रमाणात साजरी होते. गोकुळाष्टमी, रामनवमी, दत्तजयंती व इतर अनेक धार्मिक सण मोठ्या श्रद्धेने साजरे होतात. याप्रसंगी दरवर्षी नियोजनानुसार श्री गणेशयाग, चंडीयाग, सूर्ययाग, रुद्रयाग, रामयाग, विष्णुयाग व श्री गुरुयाग इत्यादी यज्ञविधी यथासांग संपन्न केले जातात. इतरत्र दुर्मिळ होत चाललेले भरीव विश्वोद्धाराचे कार्य येथे सुरळीतपणे चालूच आहे.

दिनांक ११ ऑगस्ट, १९९० रोजी प. पू. माताजींचे महानिर्वाण झाल्यावर शेकडो भक्तगणांच्या साक्षीने श्री क्षेत्र साकुरी येथील आश्रमातील पूज्य श्री सद्‌गुरु उपासनीबाबा यांच्या परमपवित्र समाधीस्थळाशेजारीच त्यांच्या या परमप्रिय सहशिष्या श्री गोदावरी माताजी यांनाही समाधिस्थ करण्यात आले. विद्वत्ता, नम्रता, गुरुभक्ती, मितभाषी, सौम्य, पण अत्यंत शिस्तप्रिय अशा सुवर्णकांती लाभलेल्या, सदैव स्मितमुखी, दैवीगुणसंपन्नशील, परमपूज्य श्री गोदावरीमाताजी यांचे चिरस्मरणीय अक्षरकार्यास नम्रभावे अभिवादन.

श्रीसाईनाथं तत्‌शिष्यं श्रीउपासनी सद्‌गुरुम्।
देवी गोदावरीं चैव वंदे गुरुपरंपराम्॥

— कुमार संजय वाघ
कोल्हापूर.



परमपूज्य गोदावरीमाताजी

**आपण सर्रास ऐकतो, किंबहुना आपणही त्यातील एक असतो की.... जगात आता माणुसकीच शिल्लक राहिलेली नाही.... परंतु कधीतरी अशी घटना घडते, अशी व्यक्ती भेटते की आपल्याला म्हणावेच लागते, अजून माणुसकी शिल्लक आहे! 'त्या' व्यक्तीशी आपला पूर्वी कधीही संबंध आलेला नसतो, तरीही ती व्यक्ती आपल्याला ऐन अडचणीच्या वेळी, बिकट संकटप्रसंगी अशी काही धावून येते, अशी काही मदत करते की आपल्याला जणू देव भेटल्यागत वाटते. तुम्हाला असा 'देव' भेटला आहे का? त्या घटनेचा सविस्तर वृत्तांत कळवा! उचित वाटल्यास 'श्री साईलीला'त ''मला 'देव' भेटला'' या सदरात स्थान मिळेल.**

# श्री साईबाबा अण्णांच्या घरी जेवायला जातात....

–श्री. शं. ग. सारंगधर
कांदिवली (प.), मुंबई.

१९१७ सालची ही घटना. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेचा दिवस. पहाटे अण्णांना (श्री साईसच्चरितकार हेमाडपंत यांना) एक स्वप्न पडले. स्वप्नात पाहिलेल्या गोष्टीची स्मृती जागृतावस्था येताच विरून जाते, त्याची आठवण राहात नाही; पण अण्णांना स्वप्नातल्या गोष्टी केवळ आठवतच नव्हत्या, तर त्यांनी अण्णांना उत्साहित केले होते. असे म्हणतात की पहाटेची स्वप्ने सत्य होतात. स्वप्न असे होते:

स्वप्नात आलेले श्री बाबा अण्णांना म्हणाले,

''आज होळीपौर्णिमा आहे. आज मी तुझ्याकडे जेवायला येतो.''

अण्णांनी साईबाबांच्या सहवासात अनेक वर्षे काढली होती. श्री बाबा शिरडी सोडून कुठे जात नाहीत, हे अण्णांना पक्के ठाऊक होते. कधीमधी बाजूच्या रूई, राहाते व नीमगांव ह्या तीन गावांना जात, तेवढाच अपवाद.

अण्णा उठले ते आनंदी वृत्तीतच; कारण आज श्री बाबा अण्णांकडे जेवायला येणार होते. अण्णांनी पत्नीला थोड्या जास्त पोळ्या करायला सांगितले. कोण पाहुणे येणार आहेत म्हणून पत्नीने चौकशी केली. अण्णांच्या सांगण्याने तिचे समाधान झाले नाही. तिने अण्णांना खोदून खोदून विचारल्यावर अण्णा तिला म्हणाले,

''आज पहाटे श्री बाबांनी स्वप्नात येऊन सांगितले की मी तुझ्याकडे आज जेवायला येतो. म्हणून तू आज जरा अधिक पोळ्या कर!''

पत्नी हसून म्हणाली,

''मनी वसे ते स्वप्नी दिसे. एकाच गोष्टीचा तुम्ही सतत विचार करता म्हणून तुम्हाला अशी स्वप्नं पडतात, दुसरं काही नाही. अहो, बाबा शिरडी सोडून कुठे जात नाहीत. मग इतक्या दूरवर ते आपल्याकडे कसे येतील?''

यावर अण्णा तिला सांगू लागले....

तुझं म्हणणं खरं आहे; पण बाबांचे बोल खोटे होणार नाहीत.

**देहे वावरत शिरडीत। परी संचार त्रैलोक्यांत॥**

असे आहे बाबांचे.

अग, ते स्वत: आले नाहीत, तरी कुणाच्या रूपात येऊन जातील त्याचा आपल्याला पत्ताही लागणार नाही. माझा तसा विश्वास आहे.

**मग तू मनी कैसेही मान।**
**मी त्या मानीन साई समान।**
**किंबहुना प्रत्यक्ष साई न आन।**
**अन्वर्थ स्वप्न होईल मज॥ १२९/४०**

डहाणूच्या बाळासाहेब देवांकडे घडलेली घटनाच तुला सांगतो. बाळासाहेब देवांकडे बाबा येऊन गेले; पण देवांना त्याचा पत्ताही लागला नाही; आणि मग कळल्यावर मात्र ते हळहळले. त्याची हकीकत तुला सांगतो, ती ऐक:

देवांच्या आईने बरीच व्रते केली होती; पण तिची उद्यापने करायची राहून गेली होती. उद्यापनाशिवाय व्रताची सांगता होत नाही व त्याचे फळ पदरात पडत नाही. आईने मुलाच्या कानावर ही गोष्ट घालून उद्यापनानिमित्त ब्राह्मणभोजन घालण्याची आपली इच्छाही त्यांना सांगितली. बाळासाहेबांनी त्यासाठी एक सोयीचा दिवस नक्की केला; आणि इथेच श्री बाबांच्या लीलांना सुरूवात झाली.

बाळासाहेबांच्या मनात विचार आला की श्री बाबा जर उद्यापनाच्या भोजनास आले तर– दुधात साखर पडेल.

* * * *

पण त्याआधी एक घटना घडून गेली होती. एक संन्यासी गोसेवक एक दिवस डहाणूच्या स्टेशनमास्तरांकडे येऊन आपल्या येण्याचा उद्देश त्याने स्टेशनमास्तरांना सांगितला व गावातल्या प्रतिष्ठीतांची नावे व त्यांचे पत्ते त्यांना विचारले. तोच एक टांगा स्टेशनवर आला. टांग्यातून उतरलेले देव मामलेदार स्टेशनमास्तरांकडेच गेले. मास्तरांनी देवांना संन्यासी – गोसेवकाचा परिचय करून देऊन त्याच्या येण्याचा उद्देश सांगितला. यावर संन्याशाला उद्देशून देव म्हणाले,

''गावात सध्या नगरशेठ दुसऱ्या एका कार्याकरिता निधी गोळा करीत आहेत, तेव्हा आपल्या कार्यासाठी लोकांकडून देणग्या मिळण्याला हा काळ अनुकूल नाही; म्हणून आपण तीन महिन्यानंतर आलात तर आपले काम होईल; कारण एका चांगल्या कामासाठी आपण देणग्या गोळा करीत आहात.''

''ठीक आहे'' म्हणून संन्यासी निघून गेला.

* * * *

देवांनी शिरडीला जोगांना एक पत्र लिहून श्री बाबांना उद्यापनाच्या ब्राह्मणभोजनासाठी आपल्यावतीने आमंत्रण देण्याची विनंती केली. पत्रात देवांनी श्री बाबांना उद्देशून लिहिले होते:

**पहा आपण आलियावीना।**
**नाही सांगता या उद्यापना।**
**तरी मान्य करूनि ही प्रार्थना।**
**करावे या दीना आभारी॥ २७/४०**

कामाच्या जबाबदारीमुळे इतक्या दूरवर स्वत: येऊन आमंत्रण देणे आपल्याला शक्य नाही.

जोगांनी पत्र श्री बाबांच्या पायावर ठेवले.

''कोणाचं पत्र? वाच तरी!'' श्री बाबा जोगांना म्हणाले. जोगांनी पत्र वाचले.

**शुद्ध भावाचे आमंत्रण।**
**बाबांनी ऐकूनि घेतले संपूर्ण।**
**म्हणती जया माझे स्मरण।**
**निरंतर आठवण मज त्याची॥ ३१/४०**

मला जायला गाडी-घोडी नको. मला आवडीने हाक मारणाऱ्याच्या घरी मी विनाविलंब हजर होतो. लिही त्याला:

तू मी आणि तिसरा एक।
तिघे मिळूनि जाऊं देख।
पाठवूनि दे ऐसा लेख।
पावेल हरिख लिहीणारा॥ ३३/४०

जोगांचे पत्र वाचून देवांना खूप आनंद झाला. ब्राह्मणभोजनाचा दिवस उजाडला. देव गडबडीत होते. श्री बाबा येणार म्हणून देवांना तो दिवस सोनियाचा होता. त्या आनंदात श्री बाबा शिरडी सोडून कुठे जात नाहीत, याचे त्यांना विस्मरण पडले. इतक्यात देवांच्या दारासमोर टांगा उभा राहिला. दहा वाजायची वेळ होती. तो पूर्वीचाच संन्यासी-गोसेवक टांग्यातून उतरलेला पाहून, तीन महिन्यांनी ये म्हणून सांगितले असताना एक महिना नाही झाला तोच हा का आला म्हणून देव मनी शंकित झाले. देवांच्या चेहऱ्यावरील भाव वाचून संन्यासी देवांना म्हणाला:

आया हूं न पैसे के लिये।
आज तो हमकू भोजन चाहिये॥
६४/४०

त्यावर देव म्हणाले,

''या, आनंद आहे. घर आपलंच आहे, असं समजा!''

यावर तो गोसेवक-संन्यासी देवांना म्हणाला,

''माझ्याबरोबर माझे आणखी दोन साथी आहेत. किती वाजता येऊ ते सांगा! त्याप्रमाणे येतो.'' देव म्हणाले:

अच्छा बच्चे लेके साथ।
बारा घंटे होने के बखत।
आवो भोजन पावो संत।
ऐसे तव वदत देव तया॥ ६८/४०

संन्यासी ठीक बारा वाजता आपल्या दोन साथींसह येऊन, भोजन करून, विडा-दक्षिणा घेऊन निघून गेला. जोगांच्या पत्राप्रमाणे श्री बाबा आले नाहीत म्हणून देव नाराज झाले.

जोगांच्या पत्राप्रमाणे तिघेजण जेवून गेले; पण ते तिघे कोण याची देवांना शंकासुद्धा आली नाही. अशाप्रकारे श्री बाबांनी पसरलेल्या मायेने देवांना चकवले. देवांनी शिरडीला जोगांना पत्र लिहिले,

''श्री बाबा आणि आपण उद्यापनाच्या ब्राह्मणभोजनाला येणार म्हणून मी मोठ्या आशेने आपली वाट पाहिली; पण आपण माझी निराशा केलीत.''

जोगांनी देवांचे पत्र श्री बाबांना वाचून दाखविले. त्यावर श्री बाबा जोगांना म्हणाले....

लिही त्याला की मी एकटाच आलेला पाहून पैसे मागायला आलो आहे, असे तुला नाही का वाटले? पण नंतर:

येईन केवळ जेवावयास।
सवे घेऊनिया दोघांस।
ऐसे सांगूनिया वेळेस।
नाही का दोघांसह जेवलो॥ ९०/४०

तू मला ओळखले नाहीस. मग मी तुला फसविले, असे तू कसे म्हणतोस?

पहा मी माझिया वचनाकारणे।
मरोन जाईन जीवें प्राणे।
परी माझिया मुखींची वचनें।
अन्यथा होणें नाही कदा॥ ९१/४०

पत्र वाचून, श्री बाबांना दोष दिल्याबद्दल देवांनी स्वत:चाच धिक्कार केला. असे हे देवांच्या घरचे उद्यापनाचे ब्राह्मणभोजन!

अण्णा पत्नीला पुढे म्हणाले,

''श्री बाबांच्या लीलांचे असे असंख्य दाखले मी तुला सांगेन; पण आज नको, पुढे केव्हातरी.''

अण्णांनी पूजा-अर्चा इत्यादी आपले दैनंदिन कार्यक्रम उरकले. पत्नीही स्वयंपाकाच्या गडबडीत होती. माध्यान्हसमयी होलिकापूजन होऊन भोजनासाठी पंक्ती वाढल्या. मुलींनी त्याभोवती रांगोळ्या काढल्या. अण्णांच्या सांगण्यावरून मध्यभागीच्या पाटापुढे सुंदर रांगोळ्या काढून चांदीची ताट-वाटी, तांब्या-पात्र मांडले. श्री बाबा येणार म्हणून सर्वांची उत्कंठा शीगेला पोहचली होती. सर्वांच्या नजरा दाराकडे लागल्या होत्या. प्रत्येकजण आपापल्या पात्रावर (पाटावर) बसले. मधल्या रित्या पात्रावाचून त्यात काहीच न्यून नव्हते. आता कोणी येण्याचे चिन्ह नाही म्हणून दाराला कडी लावून भोजनास प्रारंभ करणार, इतक्यात जिन्यावर कुणाचीतरी पावले वाजली. पुन्हा सर्व उत्कंठीत नजरा दाराकडे वळल्या. अण्णांनी उठून कडी काढून दार उघडले. दारात दोन व्यक्ती उभ्या होत्या. अण्णांनासुद्धा अपरिचित. त्यातील एक अली महमद व दुसरा इस्मू मुजावर.

मंडळी जेवणाच्या पंक्तीवर बसलेल्या पाहून अली महमद क्षमा मागत व हातातली कागदात बांधून आणलेली वस्तू जवळच्या टेबलावर ठेवीत म्हणाला,

''मंडळी खोळंबली आहेत. ही वस्तू आपल्याकडे ठेवा! नंतर येऊन खुलासा करीन. चालू द्यात आपली जेवणं.''

दोघेही निघून गेल्यावर अण्णांनी कागद सोडला, अन् अण्णांच्या डोळ्यांत प्रेमाश्रू दाटले.

पाहता साईंची तसबीर।
रोमांच उठले शरीरावर।
चरणावरी ठेविले शिर।
जहाले अंतर सद्गदित॥ १४७/४०

सर्वांनाच तो मोठा चमत्कार वाटला. अण्णांच्या पत्नीच्या उचंबळून आलेल्या भावना शब्दांत कशा वर्णन करणार! बोलल्याप्रमाणे आज श्री बाबा तिच्या घरचे पुरण-पोळीचे जेवण जेवायला आले होते. अण्णांनी ती तस्बीर श्री बाबांसाठीच्या रित्या पाटावर ठेवली.

सुखावले अवघ्यांचे मन।
अतर्क्य साईंचे विंदान।
एणे मिषें करूनि आगमन।
स्वप्नींचे वचन सत्य केले॥ १५५/४०

---

(पृष्ठ क्र. ४० वरून)

अवस्था वेड्यासारखी असते. त्याचे दर्शन परमहंस अवतारी संत दर्शवितात– **फाटके तुटके नेसतो। मन मानेल तेथे बसतो। वेड्या फकिरापरि दिसतो। परी ब्रह्मांड गिळूनी असतो।** शिरडीवासियांचा भ्रम दूर झाला व साईची योग्यता सर्वांना कळली. दयाळू संत, तसेच विदेही संत अपकार करणाऱ्यांचीही अपेक्षा पूर्ण करतात, कधीही कोणाची उपेक्षा करीत नाहीत. व्यवहारी संतांना स्वार्थापोटी आपली चूक कळत नाही म्हणूनच ते गरीब, पण श्रद्धाळू भाविकांना आपल्याजवळ येऊ देत नाहीत आणि त्यांची उपेक्षाही करतात. अशा उपेक्षित भाविकजणांस श्री साईरामाचा आधार वाटतो. याचसाठी, लोकांच्या उद्धारासाठीच तर साईअवतार झाला.

---

# अकरा हनुमान

– पंडित ग. रा. सावंत

तात्पर्य, हे रामसख्या ! या जीवनरामाला शांति-विरहानें दीर्घकाल दुःख देणारा व हताश करून सोडणारा राजयक्ष्म्यासारखा एखादा दुर्धर रोग हाच या शरीरांतर्गत राम-रावण युद्धप्रसंग दिसतो. रुधिराभिसरणादि शरीरयंत्रातील नियमित हालचालीस होणाऱ्या हरकतींचे प्रकार निरनिराळे असतील; व म्हणून या मानवांच्या शत्रूंचीं नांवेंहि निरनिराळीं पडली असतील. प्राणघातक रोगजंतूंना असूर म्हणतात. न कळू देतां मारणारे ते राक्षस. सुईच्या अग्रासारखे दंशक टोंक पुढें असलेले ते यातुधान. विषाची पिशवी असलेले विषधान. शरीरांत शिरून आम-मांस वगैरे खाणारे ते क्रव्याद किंवा क्रविष्णु असें कोणी म्हणतात. असे हे शत्रू शरीरयज्ञांत विघ्ने आणतात, इंद्रियदेवतांना त्यांचे हविर्भाग वेळच्यावेळीं पोंचत नाहींसें होऊन त्या देवता दुर्बल व परतंत्र बनतात. व्याधींचीच सत्ता शरीरावर सुरू होते, आणि असा तो बलिष्ठ दशग्रीव व्याधी आरंभीं चोरटे रूप घेऊन जीवनरामाच्या सीतारूप शांतीला पळवून नेतो व कैदेंत टाकतो. तेव्हां त्यामुळें जीवनराम हताश व बेचैन होतो.

ही माहिती अनेकांस असेल. अशा वेळीं रोगजंतुरूप राक्षसांशीं युद्धाचा तापदायक प्रसंग येतो. याचा विचार करतां करतां राजयक्ष्मा या रावणाबरोबर असेंच दीर्घकाल होणारें एक युद्ध माझ्या नजरेपुढें दिसूं लागलें. त्या युद्धांत त्या रोगजंतुरूप राक्षसांशीं टक्कर देण्याकरितां जीवनरामाचा मित्र यत्नरूप राजा सुग्रीव चारहि बाजूंनीं आपले सेनानी व सैन्य बोलावितो आहे, असें मीं अंतरिंद्रियांनीं जाणलें. सुग्रीव हा सूर्याचा अंश आणि जीवनराम त्याचाच अंश. ते दोघे सूर्यवंशी रोगजंतुचे कट्टे हाडवैरीच दिसले. विद्युदग्निरूप जो रुद्र त्याचा अंश तूंहि तसाच. तुझ्याठिकाणच्या वायुचा अंशहि रोगजंतूंना मारकच दिसला. मैंद आणि द्विविद हे अश्विनीकुमारांचेच अंश. ते रोगजंतूंच्या मर्मीच घाव घालणारे म्हणून प्रसिद्धच होते. सुषेण वैद्य हा वरूणाचा अंश. तो आपली प्रतिकाररूप औषधी परमाणूंची सेना घेऊन पुढें सरसावला. प्रतिक्रियारूप पर्जन्याचा अंश शरभ याची आपल्या अविकारी जीवाणूंच्या फौजेसह सिद्धता होतीच. लसिकागोल, मोठे श्वेतकण, चंचल श्वेतकण, बहुशक्ति श्वेतकण, स्थिर श्वेतकण, कणदार सजीव परमाणू, सूक्ष्म श्वेतकण यांच्या पलटणीच्या पलटणी निरनिराळ्या ठिकाणांहून जमा झाल्या. सर्वांच्या आघाडीला रोगभक्षक जंतूंची खास पलटण तयार होती. ह्या घोर युद्धांत अविकारी जीवाणूंची मर्कट सेना नद्यांतील व सरोवरांतील स्फटिक शिलांचा वर्षाव त्या राक्षसांवर करीत होती. रोगभक्षक श्वेतजंतू तर आपलीं मायावी रूपें वाढवून त्या रोगासुरांना आपल्या वेंगेंत धरून नखें व दंष्ट्रा यांनीं फाडून टाकीत होते. हे महाबलवान प्राणेश्वरा! तूं तर वायुकोश (फुप्फुसें) नामक वृक्षच हातीं घेऊन त्या राक्षसांना झोडपून ठार करून लांब भिरकावून देत होतास! इकडे जीवनराम आणि भजंगीभूषण लक्ष्मण यक्ष्मनाशनसूक्त व रोगनाशनसूक्त अभिमंत्रून योगाने व मानसोपचाराचे अमोघ बाण फेंकीत होते ! या संग्रामांत विषानेंच विष मारावें हाहि इलाज बिभीषण नामक जंतूच्या लसीचे फवारे फेंकून उपयोजावा लागला. अशा दीर्घ प्रयत्नानें अखेर त्या व्याधिरूप रावणाचा ससैन्य नाश झाला ! असा हा समरयज्ञ मीं मनश्चक्षूंनी पाहिला.

ह्या जीवन-राम आणि रोग-रावण यांच्या युद्धांत अनेक देवतांच्या अंशांनी अनेक पराक्रम केले असले, तरी सर्व देवतांना प्राणशक्तिचा हवि देणारा हे हनुमंता ! तूंच होस. निरुत्साहानें व भीतीनें पळणाऱ्या सैनिकांना धीर देऊन प्रोत्साहन देणारा तूंच, इंद्रजितरूप रोग असाध्य व अजिंक्य होणार असा बिंकट समय प्राप्त झाला असतां, त्याचा अभिचारप्रयोग उधळून लावणारा व त्यास हतवीर्य करणारा तूंच. या उरोद्धींतील हृत्कमळावर अधिष्ठित असलेला प्राणाग्नि तूंच. मनुष्याच्या या देहरूप गेहांत तूं लोकसंरक्षक अग्नि जेव्हां भक्तिभावनेचा हवि देऊन प्रज्वलित केलेला असतो, तेव्हां तूं सर्व विकाररूप राक्षसांचा नाश करतोस.

मीं पाहिलेल्या या तुंबळ युद्धाच्या घाईगर्दींत सारे मार्ग रोखले गेले होते! सारे व्यवहार-व्यापार बंद पडलें होते ! शरीरांतील वाहिन्या शुष्क पडल्या होत्या ! पण अखेर हनुमंता ! तुझ्या अतुल वीरश्रीनें साऱ्या नद्या वाहूं लागल्या. सप्तशीर्पाण ऋषि, इंद्रियदेव वगैरे सारे संतुष्ट झाले; आणि हरपलेली शान्ति पुन्हां प्राप्त झाली. तेव्हां, या शरीरांतर्गत उघड आणि गुप्त चालणाऱ्या व्यवहारांचे जाणत्या ! हे रक्षोघ्न अतुल रणयोद्धया ! हे जीवरूप लक्ष्मण प्राणदात्या ! हे वैश्वानरा ! तुला माझे शतशः नमस्कार असोत. तूं आमचें सदैव असेंच रक्षण कर, आणि अग्निनें सीता शुद्ध आहे असें सांगून ती रामास स्वीकारण्यास भाग पाडलें, त्याप्रमाणें आमचें तनमनधन शुद्ध व पवित्र आहे, अशा तुझ्या आशीर्वादयुक्त अनुमोदनासह तें जनताजनार्दनसेवेसाठींच आमचेजवळ असू दे.

## संकीर्ण विचार

हे हनुमंता ! बुद्धि आणि मन ह्या दोन अरणी आहेत व त्यांचा संयोगरूप अग्नि तूं आहेस. वनवासी हें अग्निदेवतेचें प्राथमिक स्वरूप आहे, तसाच तूं आहेस. सूर्य-विद्युत- अग्नि अशी त्रिविधतेनें सर्वांस सदा प्रत्यक्ष असून तेजस्वी दिसणारी दुसरी देवतांच नाहीं. तुझ्या एका उडींत हीच तेजस्वी त्रिविधता दिसून येते. ह्या दृश्य जगांत क्रियात्मक व्यक्त तत्व अग्नि हेंच आहे. तसाच समस्त बालगोपाळांत व्यायामरूप क्रियात्मक व्यक्त देव तू आहेस. अग्नि हें केवळ भौतिक तत्व नव्हे, ती देवता-विभूति आहे. तसा तूं केवळ देहधारी जीव नव्हेस, तर ईश्वरांची विभूति आहेस. एक ज्योत आपल्या तेजानें ज्याप्रमाणें दुसरी आत्मरूप ज्योत निर्माण करते त्याप्रमाणें तुज रामदूताच्या कृपेच्या प्रभावानें दुसरें तेजस्वी रामदास निर्माण होतात. वानरवेष धरी देव। भाग्यें लाधला केशव। दास म्हणे ते देवाचे। आवडते रघुनाथांचे ॥५॥

हे हनुमंता! अग्निच्या प्रचंड ज्वालेस महावीर हें तुझें नांव देतात. देव या शब्दांचा अर्थ तेज असा होतो. त्याचीं नांवें अनेक संभवतील. इंद्र, मित्र, वरुण, आदि अनेक नांवें जर एका गरुडाचींच संभवतात, तर नल,

नील, जांबवान, सुग्रीव, हनुमान, हीं नांवें गरुडानामक तुज अग्निचींच कां संभवणार नाहींत! ऐतरेयब्राह्मणांत अग्नि हा होता, आदित्य अध्वर्यु, पर्जन्य उद्गाता, इत्यादी वर्णन आहे. मग तूं हनुमान, सुग्रीव, शरभ, त्याहून कोण वेगळे आहांत?

अग्निला पुरोहित म्हणतात, तसा सुग्रीवाचा पुरोहित तूंच नव्हेस काय? पुरुहूताय नमः। असा तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत स्पष्ट नामोल्लेख आहे. वसिष्ठ, अत्रि, हीं रामायणकालीन नांवें जर अग्निचीं मानतात, तर तुला मीं अग्नि मानण्यास हरकत काय? तुझींहि वसिष्ठ, आंगिरस, इत्यादी नांवें सहस्त्रनामावलींत आहेतच. त्रेतायुगांतील याज्ञिकांचा मित अथवा त्रेताग्नि हा जो त्या युगाचा मार्गदर्शक, त्याचेंच भक्तिमार्गातील नांवरूप हनुमान असें मीं कां मानूं नये?

वेदांत मधुच्छंदांनीं अग्निचें रत्नपोषक असें वर्णन केलें. बाकीचें रत्नसाधक (सीतादेवीनें टाकलेले दागिनें घेणारा) व रत्नभेदक (तिनें दिलेला रत्नांचा हार फोडून पाहाणारा) असें तुझें वर्णन रामायणकारांनीं केलें. भार्गव-आंगिरस आणि इंद्रजित यांच्या यज्ञाचा तूं भेद केलास व प्रभु रामचंद्राचा समरयज्ञ तूं पुरा केलास. यास्तव तुझें स्वरूप हरिहरात्मक दिसतें.

स्थूल, सुक्ष्म, कारण, महाकारण, हे चतुर्विध देह, अथवा अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय, असे पंचविध कोश, हे ज्याप्रमाणें एकाच जीवात्म्याचे संभवतात, त्याप्रमाणें आधियज्ञ, आधिदैव, आधिभूत, इतिहास, अध्यात्म, इत्यादी भिन्न दृष्टींनीं, हे मारूते! तुझींच अत्यंत भिन्न भासणारीं रूपें कां संभवणार नाहींत?

अग्नि अव्यंक्त स्थितींत जसा शांत असतों, तसाच तूं एकान्तीं आत्मचिंतन करीत असतां शांत दिसतोस, उलट व्यक्त दशेंत अग्निच्या प्रतिकार शक्तिप्रमाणें तुझी निरोध संघर्षणानें मात्र जागृत होणारी संहारशक्तीहि जाज्वल दिसते!

आकाश आणि वायु या अदृश्य भूतांचे ठिकाणी पहिलेंच साकारलेलें महद्भूत जें तेज, तेंच पंचमहाभूतांतील मध्यस्थ भूत होय. ''नभासारखें रूप या राघवाचें'' असें ज्याप्रमाणें रामाचें वर्णन आहे, त्याचप्रमाणें वायूद्भव तेज हेंच तुझें रूप होय, असें मला वाटतें. तुझ्या पाठच्या जल आणि पृथ्वी या महद्भूतांचा तुजपुढें काय पाड? तूं द्रोणागिरी एका हातावर घेऊन, दक्षिण महासागर एका उडीसरसा उल्लंघून जावेंस, हें सहज आहे.

याज्ञिकांना गृहपति जसा अग्नि, तसा ग्रामस्थांचा ग्रामरक्षकहि तूंच नव्हेस काय? प्रतिग्रामस्थिताय नमः असें म्हणतात. आदित्यमधूच्या उपासनेंत जे कार्य अग्निकडून होतें, तेंच रामोपासनेंत तुझ्याकडून होत असतें, असें रामभक्त मानतात; व सप्तसामाय नमः। उद्गीथाय नमः। वन्हये नमः॥ इत्यादीप्रकारें तुझा सहस्त्रनामपाठ म्हणतात.

अग्निच्या संयोगानें जड धातूहि जोडतात, त्याप्रमाणें तुझ्या संयोगानें देव-भक्तांची मनें जोडतात. अग्निच्या संयोगानें ज्याप्रमाणें सुवर्णहि अशुद्धाचें शुद्ध होतें, फार काय, शेणीचीहि विभूति बनते, त्याप्रमाणें तुझ्या प्रसादानें अंजना निरंजन झाली! तुझ्या उपासनेनें अवखळ नारोबा समर्थ रामदास झाले! विषयी तुलसीदास संत कवि बनले! फार काय, ऐवट पाषाण जलावर तरले. इतकेच काय, ते तुझ्या मूर्तिरूपांत देवतारूपहि पावले.

हे मारुते! वनांत जन्मलेला पवनसुत अग्नि, ज्याच्या साक्षीनें सुग्रीव व श्रीराम यांची मैत्री जमली असा सख्य जोडणारा अग्नि, लंकादहन करणारा अग्नि, सीताशुद्धि करणारा अग्नि, तो तूंच नव्हेस काय? कालाग्नेये नमः असें तुला म्हणतात.

हे त्रेतायुगांतील दिव्य देवा! तुला मी त्रेताग्निच मानतों. तुझें शरीर, तुझें जीवस्वरूप, आणि तुझा विवेक, हीं तीन तत्वें अग्निप्रमाणें दिव्य वाटतात. पुराणांतरीं अग्निचें अनेक अवतार आणि प्रकार वर्णिले आहेत, त्यापैकींच तूं एक आहेस.

हे रामदूता! तुझ्या अतुल त्यागाकडे पाहिलें कीं तूं साक्षात् यज्ञमूर्तीच आहेस असें वाटतें. स्वाहाकाराय नमः। स्वधाकाराय नमः। हवित्रे नमः। हव्याय नमः। पावकाय नमः। असें सहस्त्रनामावलींत तुझें वंदन केलें आहे. हे याज्ञिकांच्या हनुमंता! तुझ्यामध्यें व अग्निमध्यें जें हें विलक्षण साम्य दिसतें, याचा अर्थ काय! हें तूं मला सांग.

देवभक्तांमधील हे मध्यस्थ तेजोनिधे! निरनिराळ्या देव-देवतांचीं नामरूपें अग्निमूलक आहेत असें म्हणतात. मला हें परमार्थ-साधनरूप तुझें विभूतिरहस्य पुरें समजावून दे. जाज्वल, रक्तशिख व रक्तकूर्च असें अग्निप्रमाणें लालभडक व सिंदूरचर्चित तुझें रूप पाहिलें, कीं कोणत्या रूपावर कोणत्या रूपाची भावना केली आहे, तूं अग्निचें रूप घेतलेंस, किंवा अग्निनें तुझें रूप धारण केलें, यासंबंधीं मोह पडतो! सहसः सूनुः असें तुझें रूप प्राचीन व अर्वाचीन या उभयतांस आश्चर्यवत् दिसतें! नाभिः हें अग्निचें नांव तुलाहि उत्तम शोभतें.

रुद्र, अग्नि आणि तूं तिघेहि एकच नव्हे काय? अग्निचाच प्रसादरूप तूं! त्याचप्रमाणें रुद्राचाच अवतार तूं! श्री तुकोबाराय तुझें स्तवन करतांना म्हणतात: ''तुका म्हणे रुद्रा। अंजनीचिया कुमरा॥'' तें आणखी पुढें म्हणतात: ''हनुमंत महाबळी। रावणाची दाढी जाळी॥ तया माझा नमस्कार। वारंवार निरंतर॥ करोनि उड्डाण। केलें लंकेचें शोधन॥ जाळियेली लंका। धन्य धन्य म्हणे तुका॥'' याप्रमाणें रावणाची वाढलेली अहंमन्यतेची दाढी व रावणाची देहबुद्धीची लंका जाळण्याबद्दल, हे मारुताग्ने! संतांनी तुझे धन्यवाद गायिलें, तसेंच भवारण्यांतील गुंतागुंतीच्या जाळ्या जाळून तूं भक्तिच्या वाटा मोकळ्या केल्यास म्हणूनहि तुझे धन्यवाद संतांनीं गायिलें. चुलींतील, यंत्रातील व भट्टींतील नियोजित पार्थिव अग्निप्रमाणें व जठराग्निप्रमाणें ''स्वामिकाजी तूं सादर'' म्हणून व्यावहारिकांनींहि तुझें स्वागत केलें. हवनीय कामास जाळणारा खरा कामारि तूं, म्हणून विरक्तांनीं व होळकरांनींही तुझें माहात्म्य गायिलें. हें सर्व लक्षांत घेतां, हे मध्यस्था! तुझा स्वरूपनिश्चय आम्हीं कसा करावा? तुझ्यासंबंधीं काय भावना करावी? काय धारणा धरावी? हें तूंच मला सांग, जेणेंकरून तूं मला सुलभ साधनरूप होऊन तुझ्या साह्यानें मी प्रभु रामचंद्राशीं अथवा शिवरूपाशीं आत्मरूपानें समरस होईन.

हे याज्ञिकांच्या हनुमंता! अग्ने! तुलाच मी 'बुद्धिमतां वरिष्ठं' समजतों. हे वातात्मजा! या साकारस्वरूप जगाचा तेजस्वरूप आद्य प्रकाशक तूंच! म्हणून तुला मी पुराणपुरुष म्हणतों. या शरीरसंस्थेत जडरूपदेह व चैतन्यरूप जीवन यांचा सांधा जोडणारा जसा वैश्वानर, त्याचप्रमाणें जीवकोटीत जडजीवरूप वानर आणि चैतन्यरूप राम यांचा संधि जोडणारा तूं मध्यस्थ मला अत्यंत महत्त्वाचा वाटतोस. रामायणांतील अग्निप्रमाणें जाज्वल अशी प्रतिकारशक्ति तूंच. ''मेणाहुनि

मऊ आम्हीं विष्णुदास। कठीण वज्रास भेदूं ऐसे!'' असेंच तुझें अव्यक्त आणि व्यक्त, सौम्य आणि उग्र स्वरूप आहे. निष्प्रभ झालेल्या आम्हांला तुझ्यांतील प्रतिभा, तुझ्यांतील तेज, तुझी प्रतिकारशक्ति यांची फार गरज भासत आहे.

हे पावका! तुझ्या पवित्र्याची ही अपूर्वता आहे कीं, त्या ठिकाणीं एखादा अत्याश्रमी, विदेहमुक्त, श्रीकृष्णासारखा अवतारी पुरुष, अथवा चोखामेळादि जीवन्मुक्त संत, यांच्या ज्ञानाग्निप्रमाणें शुद्ध आणि अशुद्ध हे भेदभाव उरतच नाहींत. हे हनुमंत! अन्यथा भासशत्रूचा नाश असें ज्ञानाग्निरूप तुझें स्वरूपलक्षण रामीरामदास यांनी वर्णिलें आहे. पण केवलज्ञान व त्रिपुटीज्ञान, विदेहमुक्त व जीवन्मुक्त, अव्यक्त अग्नि आणि व्यक्त अग्नि, यांत निरपेक्ष, सापेक्ष ह्या दृष्टीनें फरक आहे. स्पृश्यता आणि अस्पृश्यता हे भाव अग्निच्या व्यक्ततेंत प्रथम प्रत्ययास येतात असें वाटतें. ज्या ठिकाणीं शुचितेची परमावधि आहे, त्या ठिकाणीं केवल अस्पृश्यता ही भावना अपरिहार्यच आहे. व्यक्त अग्निच्या ठिकाणीं शुचिता व अस्पृश्यता हे दोन्हीं भाव सापेक्ष आहेत. तुझें परम पवित्र भक्त जें रामकृष्ण परमहंस त्यांना अशुचि अन्नपाणी – फार काय, जडद्रव्य अथवा कोणतीहि अपवित्र आचारविचाराची व्यक्ति – यांचा स्पर्शहि सहन होत नसे, ही सापेक्ष भावना होय. याच रामकृष्णांच्या साधकावस्थेंत लज्जा, घृणा, भय, कुल, शील, जाति, मान व अभिमान (अहंकार) या अष्ट पाशांचा त्याग करण्यासाठीं मुद्दाम हट्टानें शौचकूप हातानें झाडणें, मस्तकींच्या केशभारांनी अस्पृश्याच्या घरच्या जमिनी झाडणें, भिकाऱ्यांच्या उच्छिष्ट पत्रावळी शिरीं ग्रहण करणें व ते उच्छिष्ट सेवन करणें, अशा मार्गांचा अवलंब त्यांनी केला, तोहि अन्यथा भासशत्रूचा नाश या अपेक्षेनेंच केला. उलट परपुरुषाचा अपवित्र स्पर्श या दोषास्तव सीतेला अग्निदिव्य करावें लागलें! तात्पर्य, व्यावहारिक दृष्टीनें शुचिता व अशुचिता, श्रेष्ठ व निकृष्ट इत्यादि भेदांस अनुसरून यथायोग्य वागावें लागतें; व उलट अद्वैतानुभुतीच्या अलौकिक अस्पर्शयोगांत हे सारे भेदभाव प्रथम अभ्यासानें व नंतर अद्वैत चिंतनानें निरस्त करावे लागतात. पण अद्वैतानुभुतीचें तें एक तात्पुरते दिव्य साधन आहे, तो व्यवहार नव्हे. अर्थात् तें साधन सिद्ध झाल्यावर त्या सिद्धपुरुषासहि देहभानावर असतां अपवित्राची अस्पृश्यता पाळावीच लागते. तत्वत: इंद्रियें व इंद्रियार्थ यांचा संस्पर्शच दु:खात्मक आहे. मग त्यातहि ते इंद्रियार्थ अपवित्र असतील तर ते अस्पृश्यच वाटावे, हें योग्यच आहे. परीट व लोणारी यांचे व्यवहार एकत्र करें जमतील! अग्नि आणि संत यांच्या अस्पर्श-शुचितेंत जे अंतर आहे, तें महत्त्वाचें आहे. अग्निचें अंतस्थ व अव्यक्त शिवस्वरूप अस्पर्श असून व्यक्त घोर स्वरूप प्रतिकारक्षमतेनें अस्पर्श होऊ पाहात असतें. संतांचें निर्विकल्प आत्मरूप स्वभावत: शिवरूप, म्हणजे अस्पर्श असतें. पण त्यांचें सविकल्प स्वरूप सहसा घोर, म्हणजे अग्निप्रमाणें प्रतिकारक्षम नसतें, सहनशील असतें. यामुळें श्रीरामकृष्णांसारख्या संतांकडून अशुचि स्पर्शाचा प्रतिकार अथवा नाश न होतां तज्जन्य दुष्परिणाम त्यांस सहन करावे लागत. सिद्धपुरुषांची अन्त:शुचिता ही सीतादेवीप्रमाणें सहनशील असते, किंवा क्वचित् तुज अग्निमारुतिप्रमाणें प्रतिकारक्षमहि असते. पण सामान्यत: जीवन्मुक्तांच्या ज्ञानाग्निनें अन्यथा भासरूप शत्रूचा बाध होतो, नाश होत नाहीं. वस्तुत: अग्नि कोणताच स्पर्श सहन करीत नाहीं. तो द्वैतास जाळून टाकतो, पण तो जाळून टाकीपर्यंत तरी द्वैतदोषाचा ताप त्यास सहन करावाच लागतो. उलट अव्यक्त अग्नि शीतल व शिवरूप असतो. तात्पर्य, अद्वैतदर्शनाचा, विदेहमुक्ताचा अव्यक्त अग्निरूप तात्विक अस्पर्शयोग वेगळा व जीवन्मुक्ताचा अन्यथा भासाचा बोध करणारा ज्ञानाग्नि योग वेगळा. तसेंच भेदात्मक सृष्टीची सत्यता मानून देह-बुद्धीनें वागणाऱ्यांचा अस्पृश्यता निवारणात्मक सबगोलंकार त्याहून वेगळा! या अनर्थावह सबगोलंकाररूप असुरापासून शुचितेचें रक्षण करण्यासाठी तुज अग्नि-मारुतिच्या प्रतिकार-सामर्थ्याची फार गरज आहे. कारण शुचितेचे ठिकाणीं ज्यावेळीं अस्पृश्यांस दिपवून सोडणारे उघडें तेज नसतें, त्याच वेळीं तिच्या संरक्षणासाठी प्रतिकाररूप तुझी विशेष गरज भासते.

भ्रष्टाचार, अपावित्र्य, दु:ख, ही सारीं संस्पर्शज आहेत. प्रतिकार हाहि संस्पर्शजच आहे. संस्पर्श हें वायूचें लक्षण आहे. यास्तव हे वायुसुता! संस्पर्शज भ्रष्टाकार, मालिन्य, बलात्कार, दु:ख इत्यादि अनिष्ट आपत्तीपासून सत्वसंरक्षणासाठीं, संस्पर्शज प्रतिकाररूप जो तूं, त्या तुझ्या सामर्थ्याची आम्हांला गरज आहे. अग्निला लोक अस्पर्श मानतात. तुझ्या वानरत्वाला अस्पृश्य लेखतात. पण तत्वत: अस्पर्श आणि अस्पृश्य यांतील गैरमेळाचा विरोधी भाव एकच आहे. ब्रह्म हें एकच सम व निरपेक्ष आहे. सारे भेद सापेक्ष व विरोधात्मकच असणें अपरिहार्य आहे. असें असून भेदांत साम्य पहाणें हा अव्यवहार आहे. हा व्यभिचार आहे. यास्तव येथें सत्वरक्षणासाठीं प्रतिकाराची गरज आहे.

हे अग्निमारुते! शुचिता जर आपल्या परम तेजानें अस्पर्श ठरेल तर तिच्या प्रभावानेंच आजच्या लौकिक अस्पृश्यतेचा वाद सहज मिटेल. यासाठीं आपल्या ब्रह्मचर्याच्या तेजानें केवळ कामिनिकांचनच विषय काय, सर्वच इंद्रियार्थांना दूर लोटणाऱ्या हे जितेंद्रिय अग्निस्वरूप पुरुषा! ज्वालाग्राही विषय जातांकडून तुजवर आरोपित झालेली अस्पर्शता ब्रह्मनिष्ठेच्या तेजानें आज आम्हांस प्राप्त होवो! व असें होईपर्यंत अद्वैतदर्शनरूप, विदेही मुक्तांचा अस्पर्शयोग व व्यवहारांत आज पुरस्कृत होणारा सबगोलंकाररूप अस्पृश्ययोग यांतील अंतर जनतेस व तिच्या पुढाऱ्यांस कळूं दे. तात्पर्य, हे मारुतेग्ने! तुझा वानरदेह हा उपाधिभूत प्रदीप्त काष्ठाप्रमाणें निकृष्ट व भेदात्मक आहे. त्यानें रामाच्या पायांशींच बसावें हें योग्य आहे. पेटलेल्या लांकडांतील अग्नि ज्याप्रमाणें भेदाचा अंगिकार त्याचा समूळ नाश करण्यासाठींच करीत असतो, त्याप्रमाणें प्रतिकारक्षम असें तुझें रक्षोघ्न हें रुद्रावतार रूप आहे आणि लांकूड जळल्यानंतर जसा अग्नि शांत होतो, तसें तुझें कृतार्थ झाल्यानंतरचें आत्मरूप अथवा शिवरूप आहे. हें रहस्य आम्हीं लक्षांत घेऊन योग्यतेनुसार यथायोग्य वागावें हेंच इष्ट आहे.

तसेंच, हे वानरयूथमुख्या! संततिनिरोधापेक्षां तुझ्यासारखी दिव्य स्वाधीन संतति प्राप्त करून घेण्याचें तुझ्या मातेचें व्रत जसें आदर्शवत् आहे, त्याचप्रमाणे उलट नैष्ठिकी ब्रह्मचर्याच्या संयमांत अव्यक्त अग्निप्रमाणें शांति आणि सामर्थ्य कसें असतें, तें तूं आजच्या तरुणांना शिकव. अंगीं परपीडक दाहकता नसून रात्रीं निबिड अरण्यांतहि प्रकाश मात्र देणाऱ्या चंद्रम्याप्रमाणें, हे रामभक्ता! तुझें मन शीतल आहे. ''चंद्राय नम:'' असें तुझ्या सहस्त्रनामावलींत तुझें मंगल नांव अन्वर्थक आहे. हे महारुद्रा! तूं आम्हांला या भवारण्यांतील अज्ञानांध:कारांत गडदलेल्या

भक्तिच्या वाटा दाखव.

तेजगति ही प्रगतीची परमावधी आहे. त्या तुझ्या प्रगतीचा संचार आमच्यामध्यें होऊ दे. हे हनुमंता! वानरी पळतांना तिचीं पिलें तिला बिलगतात, तसा तूं आमच्या निर्धारावरच विसंबून न राहतां आम्हांस जवळ घेऊन आपल्या आधारानें विहंगममार्गानें ध्येयाकडे लवकर ने.

हे हनुमंता! त्या याज्ञिक गुरुजींच्या तोंडून मीं जें अग्निचें माहात्म्यवर्णन ऐकलें व तुझ्याहि गुणांचें सूक्ष्म चिंतन मीं जें करीत होतों, त्यांचा संयोग होऊन माझ्या मनांत तुज अग्निमारुतीची भावना उभी राहिली! माझ्या मनांत असें आलें कीं, जग अग्निषोमात्मक आहे, असें शास्त्र सांगतें. प्रत्येक पदार्थाच्या पोटांत असलेला अग्नि परमाणूंच्या विनिर्गमनद्वारा बाहेर पडत असतो. गति, क्रिया, हें अग्नितत्व आहे. जगांत क्रियाहीन असें कांहींच नाहीं. क्रिया ही जगाची जागरूकता आहे. जागरूकता हें अग्निचें लक्षण आहे. याप्रमाणें उष्णता सतत बाहेर फेकण्याची क्रिया करणारा सूर्य ही जागरूकतेची मूर्ति आहे. सूर्याच्या पोटांतील उष्णता कधींतरी संपेल, त्यानंतर अखिल पदार्थमात्रांतील उष्णता त्याच न्यायानें संपेल, आणि साऱ्या ब्रह्मांडाचा अंत होईल, असा भौतिकशास्त्रांस धाक वाटतो! पण आपल्या शास्त्रप्रणालीप्रमाणें या अग्निंत सोमाची अखंड आहुति पडत असल्यामुळें तसें होण्याचा संभव नाहीं. क्रियात्मक अग्निला सोमामुळें चिरंजीव स्थिति प्राप्त झाली आहे.

हे हनुमंता! हें जें सृष्टीचें मूलग्राही तत्वज्ञान, तें तुझ्याठिकाणीं मूर्त स्वरूपांत दिसतें. तुझी तेजस्विता, तुझें दासभक्तिंतील क्रियाशीलत्व, तुझीं निरोधक शक्ति, तूं केलेले लंकादहन, तुझी शीघ्र गति, हीं सारी अग्नितत्वाचींच लक्षणें आहेत. तसेंच तूं जन्मतांच अंजनामातेचेजवळ व पुढें अशोकवनांत जगन्मातेच्याजवळ मागितलेला फलाहार व ब्रह्मदेवानें तुला दिलेला भाद्रप्रकाशक चंद्र ह्या सर्व कथानकांवरून तूं अग्निषोमात्मक देहानें चिरंजीव कसा आहेस, त्याचा उलगडा होतो व या जगांत स्वयम्भू जागतें दैवत, म्हणजे तूं अग्नि मारुति आहेस, हे उघड होतें. या तुझ्या तात्विक स्वरूपाचें चिंतन करीत असतां तुझ्यांतील तेज आणि प्रकाश, तुझी जागरूकता व ईशसेवारूप क्रियाशीलत्व, तुज मारुताग्निची विकसनशील प्रवृत्ति आणि निरोधसामर्थ्य, ह्या दिव्य गुणधर्मांनीं तूं आमचेठिकाणीं प्रादुर्भूत व्हावेंस, हीच आमची श्रेष्ठ मनोकामना आहे, ती तूं आमच्या हृदयांत प्रविष्ट होऊन पुरी कर, अशी माझी पुन: पुन्हां प्रार्थना आहे.

हे हनुमंता! या विश्वाच्या अग्निषोमात्मक विभागांत अग्नि हे पुरुषतत्त्व आहे आणि सोम ही प्रकृति आहे. यांच्या विरल, तरल, धन, अवस्था ह्यांचे त्रिवृत्करण, व कालकृपा या भेदानुसार (१) द्यु - दिव्य - विरलाग्नि - आदित्य (२) पर्जन्य अन्तरिक्ष - तरलाग्नि - वायु (३) पृथ्वी - पार्थिव - घनाग्नि अग्नि (४) पुरुष - अग्निमय संयोगजन्मा - वैश्वानर (५) योषित् - ऋतुकालीं व्याप्तऋत्वग्नि, याप्रमाणें अग्निचें पर्व असून श्रद्धा, सोम, वर्षा, अन्न, रेत, हे प्रकृतिचे पर्व आहेत. असें हें विरल-तरल प्राणतत्वाचें अवतरण अथवा उत्पत्तिक्रम लक्षांत घेतला म्हणजे तूं मारुताग्नि आमच्याठिकाणीं वस्तुत: कसा अनुस्यूत आहेस, हें ध्यानीं येतें. पण या आमच्या दिव्य स्वरूपाची तुझ्याप्रमाणें आम्हांलाहि विस्मृति पडली आहे. ती स्मृति जागृत होण्यांतच तुझ्या स्वरूपाच्या चिंतनाची सार्थकता आहे.

हे हनुमंता! केन्द्रीभूत असलेला जो प्राणाग्नि तो अमर आहे व त्यामुळेंच मूर्तरूप जो भूताग्नि तो मर्त्य असूनहि त्याला स्थिति प्राप्त झालेली आहे. या भूपिंडाच्या केन्द्रीभूत असलेला जो अमृताग्नि त्याची सूक्ष्म प्रभा जेथवर बाहेर पसरत आहे, त्या पृथ्वीच्या महामंडलाचे घन-तरल-विरल असें एकूण पन्नास विभाग मानलें आहेत. या एकूण पन्नास प्राणाग्निचें शिरोभूषण तूं आहेस. तसेंच या महामंडलाचे अग्नि, वायु, आदित्य असें तीन विभाग कल्पून त्यांतच आठ वसु, अकरा रुद्र व बारा आदित्य व दोन– (१) वसु - रुद्र यांमधील व (२) रुद्र - आदित्य यांमधील सांध्यप्राण मिळून तेहतीस प्राणात्मक देवता मानल्या आहेत. याप्रमाणें भूपिंडाचा जो अंतर्बाह्य व्यापक प्राण, तो तूं आहेस. तें तुज अग्निमारुतीचें महिमामंडळ आहे व यांतच सर्व देवतांचा समावेश होत आहे.

हे हनुमंता! अग्निला अग्नि न म्हणतां त्यावर तुझी धारणा करण्यांत काय स्वास्थ्य आहे? असें कोणी म्हणतील. त्यास माझें उत्तर असें आहे कीं तूं अद्याप परोक्ष आहेस. अग्नि हा प्रकाश आणि उष्णता या दोन दिव्य गुणांनीं प्रत्यक्ष व प्रसिद्ध आहे. दिव्य गुण हा देवशोधनाचा मार्ग आहे. अग्नि हा देवाकडे जाण्याचा दरवाजा आहे. अग्निचे प्रकाश आणि उष्णता हे दोन दिव्यगुण, क्रियेचे परिणामरूप आहेत. प्रत्येक पदार्थमात्र म्हणजे क्रियेची कर्मांत परिणती आहे. प्रत्येक पदार्थ प्रकृतीच्या साच्यांत घडविला जाऊन तो आपले प्रभाणू सतत बाहेर फेंकीत आहे. पदार्थाची विद्यमानता हें त्याच्या पोटांतील क्रियात्मक अग्निचें स्वरूप आहे. ती क्रिया मग द्रव्यपरमाणूंच्या पोटांतील विद्युत्कणांची असो, किंवा त्याहून सूक्ष्म ज्ञानक्रिया असो, क्रिया हा वायुचा धर्म आहे. 'वायु नसतां कैंची जाणिव' असें समर्थ म्हणतात. नव्याजुन्या गुणसंस्कारांचे एकीकरण हेंच ज्ञानप्रक्रियेचें लक्षण दिसतें. पदार्थमात्र ही विचाराची शींव आहे व त्या शीवेंवरच हे हनुमंता, तुझी वस्ती आहे. हनुमान हा तेथील संकेत आहे. प्रत्येक पदार्थमात्र हा क्रियात्मक अग्निरूप वायुसुत आहे. छांदोग्याप्रमाणें तेज हें प्रथमज आहे. तो सृष्टीचा जीवनारंभ आहे. त्या ठिकाणीं तुझी धारणा करण्यांत स्वारस्य असें आहे कीं, तूं अग्निरूप वायुसुत जड नाहींस, सहृदय आहेस, आणि तुझ्या हृदयांत राम आहे, तेंच अंतिम ध्येय आहे व तेंच माझेंहि स्वरूप आहे. हें परोक्ष चिंतनानें अपरोक्ष व्हावें; यासाठींच हे मारुताग्ने! माझी अशी प्रार्थना आहे कीं, 'भद्रं नो अपि वातय मन:।' हे अग्निदेवा! तूं आमचें मन शुभ विचारानें युक्त कर.

हे हनुमंता! असें उत्कृष्ट विचार माझ्या मनांत वावरत असतां, ते वृद्ध याज्ञिकहि प्रेमभराने अग्निचा स्तव करीत होते. ते म्हणत होते कीं: "हे अग्ने, तुझी पूजा करणारे आम्ही तुझा धांवा करीत आहोंत. तुझे अर्चन करणारे आम्ही मदतीकरतां तुला प्रज्वलित करीत आहोंत. हे अग्ने, ज्ञात्या अंत:करणाच्या तुला आम्ही भक्त लोक साहाय्याकरितां बोलावीत आहोंत; आणि श्रेष्ठ असा तूं प्रसन्न व्हावेंस म्हणून, स्तवन करीत आहोंत. हे अग्ने, ज्याप्रमाणें बाप मुलाची हौस पुरवितो, त्याप्रमाणें तूं आम्हांला इष्ट पदार्थ दे, आणि आमच्या कल्याणाची तजवीज कर."

ही त्या वृद्ध याज्ञिकाची सहृदय प्रार्थना ऐकून माझें मन क्षणभर तन्मय झालें, व मी कोठें आहे याचें भान सुटून सद्‌गदित अंत:करणानें पुढील अभंग मोठ्यानेंच म्हटला, अथवा हा अभंग माझे तोंडून सहज मोठ्याने बाहेर पडला! मी म्हणालो:

येई येई (रे) हनुमंता।

माझे अंजनीच्या सुता॥
तुझी पाहातों मी वाट।
प्राणसखया मजला भेट॥
तुजवांचोनी मज आतां।
कोण संकटीं रक्षिता॥
नको लावूं तूं उशीर।
दास बहू चिंतातुर॥१॥

हा अभंग मीं मोठ्यानें म्हटलेला ऐकून त्या अग्निहोत्र्यांना मी बाहेर बसलों आहे याची आठवण झाली व त्यांनीं आपला एक शिष्य बाहेर पाठवून मला आंत बोलावून घेतलें. तेव्हां हे कपींद्रा! मीं त्यांस नम्रपणें विचारलें कीं, वेदोनारायण हो! सुग्रीव आणि चंद्रसेना, भरत आणि सीता यांची प्रभु रामचंद्राशीं भेट करून देणाऱ्या, लंकेच्या होमकुंडांत राक्षसांच्या रुधिराचे हवन करणाऱ्या, देवांस इष्ट असणारा हवि देऊन त्यांचें निष्ठापूर्वक दूतकर्म करणाऱ्या, आमच्या वानरप्रमुख हनुमंताप्रमाणें, तुम्ही आतांच ज्याची स्तुति केलीत तो देवतामुख अग्नि, तुमचा याज्ञिकांचा मध्यस्थ, यज्ञांतील होता व देवदूत दिसतों. तर हे तपोनिधे, तुम्हां याज्ञिकांचा अग्निदेव व आम्हां भक्तांचा मारुतिदेव यांच्यातील या विलक्षण साम्याचें रहस्य काय बरें असावें! माझा हा प्रश्न ऐकून ते वेदोनारायण किंचित् विस्मित होऊन हांसले व म्हणाले, ''परमार्थ-साधकांनी असली शाब्दिक चिकित्सा करीत न बसतां, आपल्या उपास्याची शास्त्रोक्त विधीप्रमाणें उपासना करून कृतार्थ व्हावें, हेंच योग्य होय. वेदविद्या ही परम गूढ आहे. मंत्रमय शब्दांची अनधिकाऱ्यानें भलतीच चिकित्सा करूं नये, व अध्यापकानें त्यास कांहीं सांगूं नये, अशी शास्त्रमर्यादा आहे. श्वेताश्वतर श्रुति (६/२२) काय सांगते तें ऐका:

वेदान्ते परमं गुह्यं पुराकल्पे प्रचोदितम्।
नाप्रशान्ताय दातव्यं नापुत्रा या शिष्याय वा पुन:॥

''ज्याची देवाच्याठिकाणीं परमभक्ति आहे, आणि जशी देवाच्याठिकाणीं तशी गुरुच्याठिकाणीं आहे, त्याला ह्या महान् आत्म्याच्या गोष्टी सांगितल्या तर कळतात. शिवाय आम्ही वैदिक, आम्हांला तुमच्या पुराणोक्त हनुमानाशीं काय कर्तव्य आहे! मंत्र हाच आमचा देव होय.''

हे हनुमंता! हें त्या वृद्ध अग्निहोत्र्यांचें भाषण जरी निराशाजनक होतें, तरी त्यांत कांहीं तथ्य असेल काय? हा मी विचार करूं लागलों, पण साधनमार्गांतील त्यांनीं जे मुद्यांचे रहस्य सांगितलें होतें, तिकडे माझें सहज दुर्लक्ष होऊन ''मंत्र हाच आमचा देव'' हेंच त्या याज्ञिकाचें वचन माझ्या चित्तांत आश्चर्यवत् घोळूं लागलें! मंत्र म्हणजे शब्द, दुसरें काय? मग या शब्दांच्या खेळांत कांहीं अर्थ हाती लागेल काय? तुला ठाऊक! हे हनुमंता! वैदिक वाङ्मयांत अग्निची असलेली परोपरीची स्तुति व त्याहूनहि भारतादि पुराणांत असलेलें अग्निचें विस्तृत आणि विलक्षण वर्णन वाचलें म्हणजे सारें वाङ्मय लाक्षणिक, परोक्ष व गूढ आहे, हें उघडच दिसून येतें. अग्नि म्हणजे विस्तव एवढीच कल्पना त्यांत नाहीं. तसेंच हनुमान म्हणजे वानर एवढीच कल्पना तुझ्या उपासनादि शास्त्रग्रंथात दिसत नाहीं. दिव्य आणि तेजस्वी विभूति ह्या लक्षणांत तुमचें ऐक्य दिसतें. मग ज्या शब्दांनीं तुमचें उभयतांचे वर्णन केलेले आढळतें, त्या शब्दसादृश्यांत कांहींच रहस्य नसेल काय?

हे हनुमंता! जे शब्द आणि अर्थ परस्परांपासून दूर नसतात, किंबहुना एकरूप असतात, असें म्हणतात, ते शब्द कोणते? ज्या शब्दांत प्रकाशक धर्म असतो व ज्यांत शक्तिपात असतो, अशाच शास्त्रांतील दिव्य शब्दांना मंत्र म्हणत असतील. अग्निमारूति या नाममंत्रात नामी प्रकाशित करण्याचा अग्निचा धर्म आहे. तशीच अन्य देवांच्या नामस्मरणांत अमोघ आणि अपूर्व शक्तीहि असावी, असें अनुभवी संतांच्या वाङ्मयावरून दिसतें! वटबीजांत वटविस्तार अव्यक्त असतो. तसा तुझ्या नाममंत्रात तुझा चरित्रविस्तार व तुजसंबंधी तत्वज्ञान सामावत असलें पाहिजे, असें माझ्या मनास त्यावेळीं वाटूं लागलें.

हे मारुते! आकाशरूप महद्योनींत वायुप्रसादानें उत्पन्न होणारे तेज आणि शब्द हे सख्खे भाऊच दिसतात. धूमांतून अग्नि प्रगट होतो, त्याप्रमाणें तुझ्या अंजनारूप धूमांतून तूं जन्मलास, आणि धूमांतून जन्मत:च अग्नि जसा भु:भु:कार करतो, तसाच तूं ध्वनि करीतच प्रगट झालास. म्हणून तुला आई मा-रूत असें म्हणाली असावी, **ही** कल्पना माझ्या मनांत स्फुरली. हे सच्चिदानंद पुरुषा! चिद्रूप जें ज्ञान तें जसें प्रकाशरूप असतें, तसें शब्दरूपहि असतें. अग्नि हा जसा व्यक्ताव्यक्त रूपांत असतो, तसाच शब्दहि असतो. विचार म्हणजे अनुच्चारित शब्दच. शब्द हा तुझ्याप्रमाणें कामरूप आहे. येणेंप्रमाणें विचार माझ्या मनांत प्रभावी होऊं लागले.

हे मारुते! प्रकृताला अनुसरून बोलावयाचें तर त्या अग्न्युपासक याज्ञिकानें मंत्र हाच आमचा देव असें सांगितलें, तेव्हां वायुसुत अग्नि तोच तूं, असें जे माझ्या मनांत घोळत असलले विचार, ते किंचित् परिवर्तन पावून वायुसुत मंत्र, म्हणजे शब्द तोच तूं असें मला वाटूं लागलें. नाम आणि नामी एकरूपच असल्यामुळें तुझा सारा महिमा तुझ्या नामांत असला पाहिजे. पण नाम केवढें व नामीचा महिमा केवढा! तेव्हां नामी आपल्या महिम्यासह नामांतून प्रगट होणे कसें संभवावें? अशी माझ्या चिकित्सक बुद्धीस सहजच शंका आली! पण पुढें असेंहि मनांत आलें कीं, नामांतून अथवा शब्दांतून दिव्य नामीची अथवा अर्थाची सुटका होण्यास व्युत्पत्ति ही सुईण किंवा भक्ति ही दाई लाभेल तर कदाचित् हें संभवतहि असेल! पण दुर्दैवानें मला ह्या दोन्ही विदुषींची अनुकूलता नाही, या जाणिवेनें मी निराश होत असतां, आशेनें मला सुचविलें कीं, असें आहे तरी अयोनिसंभव जो तूं, तो तूं मनांत आणशील तर शब्दमातृकेचें उगाच निमित्त करून स्वयंभूच प्रगट होशील! आणि त्याच आशेच्या सूचनेवरून ''अग्नि-मारुति'' या दिव्यनाममंत्राकडे मी लक्षपूर्वक पाहात असतां, तुज अंजनोद्भवाचें निरंजन माधवानें स्त्रग्विणी वृत्तांत केलेलें स्तोत्र मी मनांत म्हणूं लागलों, तें असें:

ऐहिकामुष्मिकीं ते सुखें भोगिती।
जे यया अंतरीं सादरें चिंतिती॥
'श्रीहनुमंत' हें नाम वाणी जपे।
तो तरे भवाब्धींत पैं साक्षपें॥१०॥
वंदिजे पूजिजे ध्यायिजे पाहिजे।
''मारूती'' ''मारूती'' नाम हें गाइजे।
वातपुत्रा महावीर्यवंता हरी।
अंजनी संभवा सद्भटीं केसरी॥१८॥

पण इतक्यांत त्या याज्ञिकांनीं व त्यांच्या सर्व शिष्यांनी अखेरच्या भरतवाक्याप्रमाणें किंवा अलीकडील 'वंदे मातरम्' या सुप्रसिद्ध राष्ट्रीय गीताप्रमाणें अग्निची प्रार्थना म्हणण्यास

सुरवात केली. त्याबरोबर मी भानावर येऊन नम्रभावानें हात जोडून उभा राहिलों व त्या वेदोनारायणांच्या प्रार्थनेंत एकचित्तानें समरस झालों. त्या प्रार्थनेचा भावार्थ असा होता: हे अग्ने! आम्हीं आमच्या शक्तिप्रमाणें व ज्ञानाप्रमाणें जें हें स्तोत्र गायलें आहे, त्याच्या योगानें तुझी थोरवी वृद्धिंगत होवो. तसेंच तूं आमचे श्रेष्ठ प्रतीचें कल्याण कर व आम्हांला समृद्ध करणारी बुद्धि दे!

---

तात्या महाभाग्यवान। म्हाळसापतीचेंही पुण्य गहन। बाबांचे समागमाचा मान। समसमान भोगीत॥११६॥ तात्या आणि म्हाळसापति। मशिदींतचि शयन करिती। बाबांचीही अनुपम प्रीती। दोघांवरती सारखी॥११७॥ पूर्वपश्चिमे उत्तरेस। डोया तिघांच्या तीन दिशांस। पाय परस्परांचे पायांस। मध्यबिंदूस भिडविती॥११८॥ ताणूनि ऐशिया पथाऱ्या। गोष्टी वार्ता चालती साऱ्या। एकास येतां निद्रेच्या लकेऱ्या। तयास दुसऱ्यानें जागवावें॥११९॥ तात्या घोरूं लागतां। उठावें बाबांनीं अवचितां। करोनि तयांसी उलथापालथा। दाबावा माथा तयांचा॥१२०॥ घेऊनि समवेत म्हाळसापती। बिलगती दोघे तात्यांप्रती। आवळूनि धरिती पाय दाबिती। पाठही रगडिती तयांची॥१२१॥ ऐशीं सबंध चवदा सालें। बाबांसवें तात्या मशिदींत निजले। काय भाग्याचे ते दिवस गेले। स्मरणीं राहिले अखंड॥१२२॥ घरीं ठेवूनियां मायबापें। बाबांच्या आवडीं मशिदीं झोंपे। प्रेम तें मापावें कवण्या मापें। मोल या कृपेचें कोण करी॥१२३॥ पुढें वडील पंचत्व पावले। तात्या घर-संसारांत पडले। झाले घरधनी स्वयें दादुले। निजूं लागले निजगृहीं॥१२४॥ असो ऐसा निष्ठावंत भाव। तयासीचि साईचा अनुभव। अनाहूत उभा स्वयमेव। भक्त नवलाव पाहूं ये॥१२५॥

–अध्याय ८, श्री साईसच्चरित

इतुक्यांत तात्या पाटील येत। घेऊनियां मंडळी समवेत। बाबांपाशीं येऊनि बैसत। निघाया उद्यत बाबांसवें॥१२८॥ बाबा जरी तयार असत। तात्या पाटील येईपर्यंत। जागचे जागीं बैसूनि राहत। वाट पाहत तात्यांची॥१२९॥ जेव्हां खाकेंत घालूनि हात। तात्या पाटील बाबांस उठवीत। तेव्हांच बाबा निघाया सजत। चावडीप्रत तेथुनी॥१३०॥ तात्या बाबांस म्हणत मामा। ऐसा परस्पर तयांचा प्रेमा। ऐशा तयांच्या आप्तधर्मा। नाहीं उपमा द्यावया॥१३१॥

–अध्याय ३७, श्री साईसच्चरित

चावडीस अवघे तीन खण। आग्नेयी कोण बाबांचें ठिकाण। चहूं बाजूंनीं फळ्यांचें वेष्टण। करिती शयन तैं बाबा॥१५५॥ अवघी रात्र बत्त्या तेवती। सदैव उजेडांत निजती। फकीर फुकरे बाहेर बैसती। बाह्य प्रदेशीं अंधार॥१५६॥ अमीर जणूं त्यांतचि एक। आजूबाजूस इतर लोक। तेही लवंडती तेथचि देख। ऐसे कैक ते असती॥१५७॥ तेथेंच बाबांचे पश्चाद्भागीं। सरसामान कोठीचे जागीं। भक्त अबदुल परम विरागी। सेवेस निजांगीं तत्पर॥१५८॥

–अध्याय २२, श्री साईसच्चरित

अब्दुलभाई हा मूळचा नांदेडचा राहणारा; परंतु महाराजांचे समाधीचे आधीं नऊदहा वर्षांपासून शिर्डीसच सेवेसाठीं येऊन राहिला होता. समाधीनंतरही कांहीं मुशाहिरा न घेतां फक्त अन्नवस्त्र घेऊन सेवा करीत असे. महाराज देहधारी असतांना त्याजवर अत्यंत काम पडत असे व तें सर्व तो मोठ्या प्रेमानें करीत असे. पूर्वी नेहमीं चावडींत रहात असे व त्यानंतर मृत्यु होईपर्यंत द्वारकामाईजवळ रहात होता. रात्रींसुद्धां विश्रान्ति न घेतां कुराण पढण्यांत बराच वेळ घालवीत असे. घरीं त्याची आई, बायको व मुलगा इतकी मंडळी आहेत, पण त्यांना सर्वांना सोडून तो शिर्डीस राहिला होता. त्याची आई व मुलगा कधीं कधीं शिर्डीस येतात. बायकोही एकदां आली होती, पण तो त्यांपैकीं कोणाचेही मोहांत पडला नाहीं. त्याच्या मुलाच्या लग्नाची काळजी त्याच्या आईला फार वाटत असे व तिनें एके ठिकाणीं जुळविण्याची शिकस्त केली. पण अब्दुलभाई फकीर झाला आहे, त्याच्या येथें आमची मुलगी द्यावयाची नाहीं असा रोकडा जबाब मिळाला. त्यानंतर ती बाई येथें आली व महाराजांजवळ गाऱ्हाणें केलें. महाराज म्हणाले, सबुरी धर. घाबरूं नको. मुलाला चांगली मुलगी मिळेल व तें आपोआप जमून येईल. अर्थात् महाराजांचे म्हणण्याप्रमाणें घडून आलें.

एकदां अब्दुलभाईची आई व मुलगा एका गांवाला गेलीं असतां तेथें एका गृहस्थाची गांठ पडली व त्यानें आपण माझी मुलगी करा असा आग्रह धरिला. त्याला कांहीं मंडळींनीं सांगितलें कीं, मुलाचा बाप फकीर झाला आहे. त्यावर तो म्हणाला, मीही फकीर झालों तरी हरकत नाहीं. माझी मुलगी मी या मुलालाच देणार. त्याप्रमाणें तें लग्नही ताबडतोब उरकून घेतलें. त्या गृहस्थाची एक मोठी मुलगी लग्नाची होती, तिचें लग्न जुळलें होतें; पण तें लग्न व्हावयाला अवकाश होता. तरीही त्यानें न थांबतां धाकट्या मुलीचें लग्न अब्दुलभाईच्या मुलाशीं ताबडतोब करून टाकलें.

–तळटीप, अध्याय ३४, श्री साईसच्चरित

नानावल्ली म्हणून एक पिशाच्च वृत्तीनें राहणारे धष्टपुष्ट गृहस्थ बरीच मुदत शिर्डीत राहिले होते. त्यांनीं तेथें असल्या मुदतींत अतोनात स्वैरवर्तन केलें. श्रीसाईबाबांच्या दरबारचा बंदोबस्त ठेवण्याकडे त्यांचें फार लक्ष असे. लहर आल्यास कोणास कवटाळीत तर कोणाच्या थोबाडींतही भडकावीत. कधीं सर्वांग चिखलांत माखवून, कधीं वानरवेष घेऊन व गांवातील पोरांस वानरवेष देऊन सभामंडपांत येत व खूप गडबड करीत असत. श्रीसमर्थांवर त्यांचें व त्याचेवर श्रीसमर्थांचें फार प्रेम असे. एकदां लहरींत येऊन साईबाबांचा हात धरून त्यांजला यांनीं गादीवरून उठविलें व एक मिनिटभर आपण त्यांचे गादीवर बसले आणि लगेच त्यांना अत्यादरपूर्वक गादीवर बसवून त्यांना साष्टांग नमस्कार घातला. हे गृहस्थ साईबाबांस काका म्हणून हांक मारीत व साईबाबांनीं देह ठेवल्यापासून त्यांनीं जें दुखणें घेतलें त्या दुखण्यानें साईबाबांच्या देहावसानाच्या तेराव्याच दिवशीं त्यांनीं काका काका म्हणून आपला देह ठेविला. त्यांचें स्मारक म्हणून शिर्डीस त्यांचे देहावर समाधि बांधण्यांत आलेली आहे.

–तळटीप, अध्याय १०, श्री साईसच्चरित

# श्री साईनाथ व श्री ब्रह्मचैतन्य

– श्री. माधवराव भागवत
ठाणे.

'विश्वगुरू' श्री साईनाथांचे आज जसे अनेक तऱ्हेचे भक्त आहेत तसेच ते त्यांच्या देहावताराच्या वेळीही होते. श्री साईनाथांनी त्यांना योग्य मार्ग दाखविला. तेच भक्त पुढे त्यांचे कायमचे 'सत्शिष्य' बनले व त्यांनी आपल्या नरजन्माचे सार्थक करून घेतले. असे होते श्री साईनाथ किमयागार, जादूगार, नटनाटकी. जो किया, सो अल्लामिया ने किया। असे म्हणून मोठेपण आपल्याकडे न घेणारे. त्यांच्या सत्शिष्य भक्तांपैकी एक 'गांजेकरी' होता. त्याचीच ही मनोवेधक कथा....

एकदा एक गांजाचे व्यसन असणारा मनुष्य श्री साईनाथांच्या दर्शनासाठी आला. तसा तो प्रत्येक साधूच्या दर्शनास जात असे. दर्शन घेतल्यावर त्याचे मागणे ठरलेले असे, मला दहा कोट रुपये पाहिजेत. तुम्ही लक्ष्मीपतीला वश करून घेतले आहे. म्हणून त्याच्याकडून तुम्ही ते मला मिळवून द्यावेत. त्या काळच्या सर्व प्रसिद्ध सत्पुरुषांकडे तो जाऊन आला. कोणी गोड शब्दांत, तर कोणी कटु शब्दाने त्या गांजेकरीला वाटेला लावले होते. शेवटी तो शिरडीच्या साईबाबांकडे आला. त्यांनी त्याला चार दिवस ठेवून घेतले आणि नंतर सांगितले,

''अरे, हे बघ! मी बोलून-चालून फकीर; माझ्यापाशी तुला काय बरे मिळणार! तू गोंदवल्यास जा! ते साधू फार श्रीमंत आहेत. प्रत्यक्ष 'राजाराम' त्यांच्या घरी सेवा करतो. तिथे तुला पाहिजे ते मिळेल; पण माझे नाव त्यांना सांगू नकोस हं!''

असे बोलून ते हळूच त्याच्या कानात म्हणाले,

''पैसे मिळाले तर त्यातले एक कोट माझे बरे कां! म्हणजे मी ही फकिरी एकदाची सोडून देईन.''

त्या गांजेकरीला हे बोलणे अक्षरश: खरे वाटून त्याने एक कोट रुपये साईबाबांना देण्याचे कबूल केले आणि तो गोंदवल्यास गेला.

त्याने नमस्कार केल्यावर कोण, कोठले, केव्हा आले, याची चौकशी करून श्री महाराज त्याला म्हणाले,

''आता फार उशीर झाला आहे, उद्या सकाळी मला भेटा, मग आपण विचार करू.'' यारीतीने पहिल्या दिवशी त्याची बोळवण झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता स्नान करून भस्माचे पट्टे ओढून तो मंदिरात आला. श्री महाराज मागे हात धरून फेऱ्या घालीत होते व कोणाशीतरी शेतीसंबंधी काही बोलत होते. त्याला पाहिल्यावर त्याच्याकडे वळून ते म्हणाले,

''बोला! कोणत्या कामासाठी इतक्या लांब आपण आला आहात?''

तो म्हणाला,

''महाराज! काम दुसरे काही नाही, मला फक्त दहा कोट रुपये पाहिजेत; म्हणून मी आपल्याकडे आलो आहे.''

हे ऐकून श्री महाराज म्हणाले,

''हात्तिच्या! एवढेच ना! दहा कोट रुपयांची काय किंमत! माझ्याकडे लागले तुमचे काम! तुम्हाला दहा कोट रुपये देतो. पैशाची व्यवस्था होईपर्यंत तुम्ही अगदी स्वस्थ असा!''

हे शब्द श्री महाराज इतके ठासून बोलले की त्याचा त्यांच्या बोलण्यावर शंभर टक्के विश्वास बसला आणि तो म्हणाला,

''बस्स! याला म्हणतात सत्पुरुष! मी इतके साधू बघितले; पण यांच्यासारखा 'श्रीमंत' साधू एकही आढळला नाही. सगळे आपले भिकारी! प्रत्येकाची भिक्षा मागण्याची तयारी! अरे, 'हे' कसले साधूपण! साधूच्या पायी लक्ष्मी दास होऊन राहिली पाहिजे!''

याप्रमाणे त्या गांजेकरीला बनविल्यानंतर एकेक दिवस जाऊ लागला. रोज तो श्री महाराजांना पैशाबद्दल विचारी आणि तेदेखील मोठ्या आपलेपणाने त्याला सांगत,

''हो! हो! मी त्या मार्गातच आहे. बहुतेक उद्या रक्कम नक्की देईनच.''

एक आठवडा असा गेल्यावर एके दिवशी दुपारी एक वाजता मंदिरातील सर्व मंडळी पानांवर बसली होती आणि श्री महाराजांनी त्याला जेवणासाठी चार बोलावणी पाठविली; परंतु तो काहीकेल्या जेवायला येई ना.

तो म्हणे,

''मला पैसे दिल्याशिवाय मी जेवायला उठणार नाही.'' शेवटी श्री महाराज स्वत: उठले आणि त्याच्याकडे गेले. त्यावेळी त्याने आपली गांजाची चिलीम निखारा वगैरे ठेवून तयार केली होती. तो आता छाती लावून दम मारणार, इतक्यात श्री महाराजांची स्वारी तेथे त्याच्यासमोर उभी राहिली.

त्याने ती भरलेली **दगडाची** भली मोठी चिलीम तशीच ''जय भोलेनाथ!'' म्हणून श्री महाराजांच्या पुढे केली. त्यांनीही एकही शब्द न उच्चारतां ती घेतली आणि इतक्या जोराने दम लावला की सबंध गांजाची राख झाली. दगडाची चिलीम आधीच जड, त्यात ती मोठी असेल तर मुरलेल्या माणसालादेखील दम लावणे कठीण जाते, मग नवख्या अभ्यासूची गोष्टच राहू द्या! ज्या पद्धतीने श्री महाराजांनी दम लावून गांजाची राख केली, ते पाहून तो आश्चर्याने उद्गारला,

''अरे बाप रे! आप तो मुझसे भी बढ़कर निकले, महाराज! आपला किती वर्षांचा अभ्यास आहे?''

श्री महाराज म्हणाले,

''चला, चला, आधी जेवायला चला! सगळी मंडळी खोळंबून बसली आहेत.''

तो मुकाट्याने जेवायला उठला. सर्वांची जेवणे आटोपली.

त्यानंतर दोन दिवस गेले. त्याची पुन्हा तक्रार सुरू झाली. आता पैसे मिळाले नाहीत, तर आपण येथे राहावयाचे नाही, अशा निश्चयाने तो श्री महाराजांकडे गेला व म्हणाला,

''महाराज! पैशाचे शेवटी काय झाले?'' त्यावर श्री महाराज एकदम म्हणाले,

''अरे हो! मी तुम्हाला सांगायचेच विसरलो! मी काल रात्रीच सर्व पैसे तयार करून ठेवले आहेत. तुम्ही नेण्याची व्यवस्था

(पृष्ठ क्र. ५२ वर)

# मनुष्य-जन्माचे महत्त्व

-श्री. प्रशांत सन्याशिव
गोरेगाव (प.), मुंबई.

कधी कधी माणसाच्या आयुष्यात असा काही प्रसंग येतो की त्यावेळी त्याला सर्व ऐहिक सुखे तुच्छ वाटू लागतात व तो आत्मिक सुख शोधू लागतो. आत्मिक सुख शोधण्याच्या प्रयत्नात मनुष्य परमेश्वराची निस्सीम भक्ती करू लागतो व परमेश्वराने देणगीदाखल दिलेल्या मनुष्यजन्माचा उद्धार करून घेतो.

महाराष्ट्रात अनेक संत-महात्मे होऊन गेले. त्यांनी आपल्या सद्‌विचारांनी, आपल्या सत्कर्माने व आपल्या परमेश्वरावरील भक्तीने मनुष्य-जन्माचे सार्थक करून घेतले. ह्या संतांच्या मांदियाळीत संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा, संत माणकोजी बोधला, संत गोरा कुंभार आदी संतांचा समावेश आहे. ह्या सर्व संतांनी संसारात राहून परमार्थ साधला. त्यांनी काम, वासना, क्रोध, लोभ, द्वेष, मत्सर, अहंकार ह्या सर्व षट्‌विकारांवर विजय मिळवून आत्मज्ञान साधले. त्यामुळेच तर ते नराचे नारायण झाले. त्यांच्या निस्सीम भक्तीमुळे खुद्द पंढरीच्या विठ्ठलालादेखील त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे लागले.

परमेश्वराने माणसाला जन्म दिला तो स्वत:चा उद्धार करून घेण्याकरिता. दुसऱ्याच्या सुखात जसे आपण सहभागी होतो तसेच त्याच्या दु:खातही सहभागी होऊन आपण त्या व्यक्तीची दु:खे दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हाच खरा मानवधर्म आहे. खुद्द श्री साईबाबांनीदेखील आपल्या भक्तांना निक्षून सांगितले आहे,

**''प्राणिमात्रांवर दया करा! भोजनाची वेळ असेल व तुमच्या दारी जर कोणी भुकेला प्राणी आला असेल तर त्याला हडहड न करता त्या प्राण्याला भोजन द्या! कारण अन्नदान करणे, हा मानवजातीचा सर्वात मोठा धर्म आहे. गोरगरीबांना मदत करा! दुसऱ्याची निंदा-नालस्ती कधी करू नका!''**

मानवजातीला जर आपला उद्धार करून घ्यायचा असेल तर ह्या नियमांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. तरच परमेश्वर प्रसन्न होईल व मानवाचा उद्धार होईल.

मनुष्याने आपला वेळ व्यर्थ न दवडता परमेश्वराच्या भक्तीत व नामस्मरणात घालवावा. श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना, तुम्ही कामधंदा सोडून फक्त माझीच पूजा करीत रहा, असे कधीच सांगितले नाही. उलट तुम्ही कुठेही असा किंवा कुठलेही चांगले कार्य करीत असा, ते करीत असताना आपल्या आराध्यदेवतेचे नामस्मरण करा, असेच ते सांगत असत. याचा अनुभव ते देहरूपात असताना व त्यानंतरही कैक भक्त घेत आहेत. आपण सत्कर्म करीत असताना नामस्मरण केले तर येणाऱ्या सगळ्या संकटांचा, विघ्नांचा आपोआपच नाश होतो; आणि आपले कार्य निर्विघ्न पार पडते. परमेश्वराने इतर प्राण्यांनादेखील जन्म दिला असला तरी त्यांना मनुष्यासारखी विचार करण्याची, चांगले-वाईट समजून घेण्याची शक्ती प्रदान केलेली नाही. त्यामुळे त्यांना आपला उद्धार करून घेता येत नाही. म्हणूनच मनुष्यप्राणी हा इतर सर्व प्राणिमात्रांहून श्रेष्ठ मानला जातो.

मानव हा सतत सुखाच्या, म्हणजेच ऐहिक व क्षणभंगुर आनंदाच्या पाठी पळत असतो. असे सुख नेहमीच मनुष्याच्या पुढे पुढे पळत असते. खरं म्हणजे आपण ज्या सुखाच्या मागे लागतो ते खरेच शाश्वत सुख आहे का, याचा आपण साकल्याने विचार केला पाहिजे. मनुष्य गैरसमज करून घेतो की सुख हे काम, वासना, लोभ, द्वेष, मत्सर, अहंकार ह्या षट्‌विकारांत आहे; कारण ह्या षट्‌विकारांपासून मिळणाऱ्या क्षणिक आनंदालाच तो सुख मानत असतो. क्षणभंगुर सुखाच्या मागे धावल्यामुळे त्याच्या मनाला कधीही शांतता लाभत नाही. तो सतत दु:खाच्याच खाईत लोटला जातो. यामुळेच त्याचा उद्धार न होता विनाशच ठरलेला असतो.

श्री साईबाबांचा अवतार हा भक्तांची संकटे दूर करण्याकरिता, त्यांचा उद्धार करण्याकरिताच झाला होता. श्री साईबाबा हे परमेश्वराचे अवतार होते, असे भक्त मानत व मानतात; परंतु श्री साईबाबा नेहमी स्वत:ला ''मी परमेश्वराचा सेवक आहे'', असे म्हणत. यातच त्यांचे ईश्वरत्व दिसून येते. श्री साईबाबांना स्वत:विषयी कधीही अहंकार नव्हता. त्यांनी सगळ्या षट्‌विकारांवर विजय मिळवला होता. श्री साईबाबांनी मनुष्य-जन्माचे महत्त्व पटवून देण्यासाठी भक्तांची अनेक प्रकारे परीक्षा घेतली. बाबांनी आपल्या भक्तांवर येणाऱ्या संकटाचे निवारण केले व आजही ते आपल्या भक्तांचा सांभाळ करीत आहेत, त्यांची संकटे दूर करीत आहेत. कलीयुगात नामस्मरणाला किती महत्त्व आहे, हे बाबांनी पटवून दिले. श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना अकरा वचने दिली. त्याचा प्रत्यय आजही भक्तांना येत आहे. त्याचप्रमाणे आपण भक्तांनीदेखील श्री साईबाबांनी दिलेल्या उपदेशाचे काटेकोरपणे पालन करून आपल्या मनुष्यजन्माचा उद्धार करून घेतला पाहिजे. तरच श्री साईबाबांचे अवतारकार्य सफल झाल्यासारखे होईल.

---

(पृष्ठ क्र. ५१ वरून)

करा! पैसे तयार आहेत. तळघरात रुपयांच्या थैल्या भरून तयार आहेत.''

ते ऐकल्याबरोबर त्याला मोठा आनंद झाला. तो म्हणाला,

''अहो! त्यात काय एवढेसे! पैसे बैलगाड्यांमध्ये घालून घेऊन जाऊ!''

त्यावर श्री महाराज म्हणाले,

''न्या! पण दहा कोट रुपयांच्या थैल्या कितीतरी झाल्या आहेत! त्यांना शंभर बैलगाड्या तरी नक्कीच लागतील. तुम्ही बैलगाड्या आणा! माझे पैसे तयार आहेत.''

पैशांच्या थैल्या तळघरामध्ये आहेत, हे ऐकून त्या गांजेकरीला जितका आनंद झाला, तितकाच थैल्या नेण्यासाठी शंभर बैलगाड्या कोठून आणायच्या, याची चिंता लागून राहिली आणि तो गप्पच बसला. नंतर एक-दोन वेळा त्याने पैशाबद्दल बोलणे काढले; पण श्री महाराजांनी बैलगाड्यांचा प्रश्न पुढे मांडला. अखेरीस कंटाळून तो परत जाण्यास निघाला, तेव्हा श्री महाराजांनी त्याला 'नाम' देऊन पैशांचा नाद सोडण्यास सांगितले.

---

# श्री साईबाबांची अमृतवाणी

–श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

परमपूज्य श्री साईबाबा श्री क्षेत्र शिरडी येथून देहाने निघून गेल्याला आता सुमारे पाऊणशे वर्षे झाली. असे असूनही त्यांच्या सान्निध्याचा गोड स्मृति-सुगंध आजही आपण अनुभवतो. याचे इंगित म्हणजे त्यांची अमृतवाणी आजही वातावरणातून स्वत:चे शाश्वत अस्तित्व भक्तांना दर्शवीत असते. बाबा देहधारी असताना त्यांच्या अमृतवाणीचा ओघ पवित्र अशा गंगाजलाप्रमाणे अखंड वाहत असे. अवतारी पुरुषांच्या अमृतवाणीतील प्रत्येक अक्षर हे खऱ्या अर्थाने अजरामर असते, यात तिळमात्र शंका नाही. आपली स्पंदन-शक्ती, म्हणजेच प्राण-शक्ती, हिला चैतन्यशक्तीचा पुरवठा आत्म्याच्या चेतना-शक्तीद्वारे होत असतो. ही वस्तुस्थिती आहे. व्यक्तीचा प्राण देहातून निघून गेला तरी आत्म्याचे अस्तित्व संपुष्टात येत नाही; देह मात्र प्राणाच्या गमनामुळे विनाश पावतो. सर्वसामान्यांच्या बाबतीतील हे सत्य होय! परंतु श्री साईबाबांसारख्या महामानवांच्या बाबतीत त्यांच्या देहाच्या विनाशाबरोबर त्यांची अमृतवाणी नष्ट होत नाही. अर्थात, त्यांच्या या अमृतवाणीतील मोजके शब्द जरी आपल्यासारख्या सामान्यजनांना ऐकू आले तरी आपले व्यक्तिगत जीवन पावन झाले, असेच मानावे लागते. परम भाग्यानेच असे सद्भाग्य व्यक्तीला लाभत असतें.

कै. अण्णासाहेब दाभोलकर (हेमाडपंत) यांचे सद्भाग्य थोर होते. म्हणूनच बाबांची सत्संगती त्यांना लाभली आणि ती अखेरपर्यंत टिकून राहिली. दयाशील अंत:करणातून त्यांच्या सिद्ध लेखणीद्वारे बाबांची अमृतवाणी जगाच्या बाह्य प्रांगणात आजवर घुमत राहिली आहे आणि यापुढेही ती अमृतवाणी भक्तांचे अज्ञान दूर करून त्यांना ज्ञानामृत पाजीत राहील. हे ज्ञानामृत प्राशन केल्याने व्यक्तीच्या ज्ञानाची कवाडे उघडी होतात व त्यांना या अमृतवाणीचे श्रवण करणे शक्य होत असते. इंद्रियांच्या स्वाधीन गेलेल्या व्यक्तींना अर्थातच असे सद्भाग्य लाभणे शक्य होत नाही. भक्त आणि भगवान बाबा यांच्यातील अतूट प्रेमानेच बाबांची अमृतवाणी श्रवण करणे शक्य होत असते. अमृतवाणी ही हृदय भाषेतून स्त्रवत असल्यामुळे ती श्रवण करणाऱ्या भक्ताचे हृदय शुद्ध आणि पवित्र असावे लागते. हृदयाची भाषा हृदयच जाणू शकते; तेथे मन, बुद्धी वगैरेंना वाव मिळत नाही. हृदय शुद्ध व पवित्र केल्याने अमृतवाणीचा अमृतानुभव घेता येतो.

एक अमृतानुभव येथे देवून हे सत्यकथन संपवितो. सुमारे पन्नास वर्षापूर्वीचा हा स्वानुभव आहे. श्री साईबाबांवरील काव्य मनात आकार घेत असता ''चाल मज घेऊन विश्वासात!'' हे बाबांचे अमृतबोल श्रवणात आले. कातरवेळी श्री साईबाबांचे पुण्य-स्मरण अत्युत्कटतेने होत असतानाच वरील अमृतबोलाची गोडी अनुभवास आली. अमृतानुभवाचे हृदयस्पर्शी काव्य खालीलप्रमाणे आहे:

हवा मज माझाच साईनाथ।
नको मज अन्य काही जीवनात॥धृ०॥

मी असता बालपणात।
चाले माझ्यापाठोपाठ॥
मी पडता धरूनि हात।
दिधली मज प्रेमळ साथ॥१॥

मी येता तारुण्यात।
वाट न मज दिसे अंधारात॥
बोल मग हळूच येति कानी।
चाल मज घेऊनी विश्वासात॥२॥

ठेवूनि बोधामृत ध्यानात।
वाट मी चाले संसारात॥
उणे मज काही न आयुष्यात।
भेटही दिधली प्रत्यक्षात॥३॥

---

## साई– माझी मायमाऊली

निघूनी गेली देवाघरीं जव,
जन्म देती माझी आई
उरला नाही आधार मजला
जगतामध्यें कांहीं॥१॥

पांहू कुणाच्या मुखाकडे मी
कुणा म्हणूं मी आई
प्रेमपान्हा कोण पाजील
बालहट्ट कोण पुरवील॥२॥

पाठीवरतीं कोण फिरवील
मायेचा तो हात
लाडे लाडे कोण भरवील
मुखी मज इवलासा तो घास॥३॥

ठेच लागतां पायाला मम
रक्तस्त्राव जव होई
पदर फाडून कोण येईल
बांधण्यास करी घाई॥४॥

रात्रंदिन ती छायेसम हो
उभी पाठीशी आई
लांब जरा मी कुठेही जातां
हांका मारीत येई॥५॥

आज पोरका मी हा झालो
आधार मजला नाहीं
जगीं आता उरली नाहीं
थोर, प्रिय ती माझी आई॥६॥

मातेचि ही थोर महती
तुलाच ठाऊक देवा
एक 'मागणे' म्हणून मागतो
तव चरणांजवळीं देवा॥७॥

हात जोडितो, पदर पसरितो
विनवितो तुला मी कांहीं
साईनाथा, जगतीं आतां
तूच माझी आई॥८॥


असूनि स्वामी तिन्हीं जगाचा
तयांस नाही परि आई
म्हणूनि फिरतो हाका मारीत
आई! आई!! आई!!!॥९॥

**–गंगाधरसुत**
**ठाणे.**

# ।। अथर्ववेद ।।




—साईली




अतिप्राचीन आणि अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेल्या वेदांच्या मालिकेतील 'अथर्ववेद' हा चौथा व शेवटचा वेद होय! ऋग्वेद किंवा यजुर्वेदानंतर याची रचना झालेली असल्यामुळे अथर्ववेद हा वरील वेदांइतका प्राचीन मानला गेलेला नाही. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्याइतकाच अथर्ववेदही समृद्ध असला तरी प्राचीन परंपरेत जो मान अन्य तीन वेदांना दिला गेला आहे त्यामानाने या वेदाचा गौरव कमी आहे.

अभ्यासाच्या सुलभतेकरिता महर्षी व्यासांनी या अतिविस्तीर्ण अशा वेदांच्या ज्ञानसागराचे चार भाग केले. त्यापैकी अथर्ववेद सुमन्तूकडे दिला. ब्रह्मसंप्रदायाप्रमाणे शौनक ऋषी या वेदाचे प्रवर्तक मानले जातात.

अथर्ववेदाचे 'अथर्व' हे नाव सुपरिचित आहे, तरी अन्य सात नावांनीही या वेदाचा गौरव केला जातो.

(१) **अथर्ववेद** — या वेदातील सर्वाधिक ऋचा अथर्वण नावाच्या ऋषींच्या आहेत. त्याशिवाय ब्रह्म व भृग्वंगिरस यांच्या मिळून निम्म्यापेक्षा अधिक ऋचा ह्या तिघांच्याच